
महाराष्ट्राचे

# शिल्पकार

# ना. ग. गोरे



Raja Badsal

## ग. प्र. प्रधान

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# महाराष्ट्राचे शिल्पकार

## ना. ग. गोरे

ग. प्र. प्रधान

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती : १ मे २००६
महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. २७
प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
प्रमोद भोगटे,
स्नेहेश प्रिंटर्स,
३२०-ए, शाह अँड नाहर इंड. इस्टेट अ-१,
धनराज मिल आवार, सीताराम जाधव मार्ग,
लोअर परळ, मुंबई-१३. (दूरध्वनी : २४९४ ५६१५)

मुखपृष्ठ : राजा बडसल
किंमत : रु. ३५/-

या पुस्तकाल व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे "महाराष्ट्राचे शिल्पकार" या नावाची एक ग्रंथमाला प्रकाशित होत असते. त्या ग्रंथमालेतून विसाव्या शतकामध्ये विविध क्षेत्रातील ज्या महनीय व्यक्तींनी महाराष्ट्र घडविला, त्यांची व्यक्तीचित्रणे नामवंत लेखकांकडून लिहून घेण्यात येतात आणि ती प्रकाशित होतात. विसावे शतक केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर संपूर्ण देशाच्या दृष्टीने अनेक अर्थाने परिवर्तनाचे शतक म्हटले पाहिजे. या शतकाचा पूर्वार्ध स्वातंत्र्यप्राप्तीमध्ये गेला आणि उत्तरार्ध स्वातंत्र्याचे संवर्धन, लोकशाही हक्कांचा विकास आणि नवनिर्मित भारताची सर्वांगीण प्रगती यांच्या विविध दिशा शोधण्यामध्ये गेला. महाराष्ट्र राज्याच्या सुदैवाने या शतकामध्ये राजकारण, अर्थकारण, कृषीउद्योग, साहित्य, ललितकला, ज्ञान आणि विज्ञान अशा मानवी जीवन उन्नत करणाऱ्या विविध क्षेत्रामध्ये उत्तुंग कर्तृत्वाची माणसे महाराष्ट्रात जन्माला आली आणि त्यांनी नवा महाराष्ट्र घडविला. एकप्रकारे आजच्या सुविकसित, समृद्ध, लोकशाही प्रधान व सुसंस्कृत महाराष्ट्राचे भव्य शिल्प निर्मिण्यामध्ये त्यांचा मोठा हातभार लाभलेला आहे. कै. नानासाहेव गोरे हे महाराष्ट्र राज्याच्या अशा थोर शिल्पकारांपैकी एक अतिशय महत्त्वाचे व्यक्तिमत्व. स्वातंत्र्यापूर्वी त्यांनी स्वातंत्र्यलढ्यामध्ये संघर्षाचे दिवस व्यतीत केले, स्वातंत्र्यासाठी देहदंड सोसला, तुरुंगवास सहन केला, कुटुंब आणि संसार यापासून दूर राहण्याची पाळी त्यांच्यावर आली. विलक्षण संघर्षमय जीवन त्यांनी त्या काळात अनुभवले.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी पुण्याच्या एका ब्राह्मण कुटुंबामध्ये जन्म घेतलेल्या नानासाहेब गोरे यांनी आपली वैचारिक वाटचाल तरुण वयातच निश्चित केली. त्याकाळात त्यांचे व्यक्तिमत्व प्रगल्भ राजकीय आणि पुरोगामी सामाजिक विचारांनी घडत गेले. गोरे हे जसे थोर स्वातंत्र्यसेनानी, तत्त्वचिंतक आणि सामाजिक परिवर्तनांनी भारलेल्या विचारांचे नेते होते, त्याप्रमाणेच एक उत्कृष्ट ललित लेखकही होते. त्यांनी केलेले ललित लेखन ("सीतेचे पोहे", "डाली") माझ्यासारख्या ललित लेखकाला तरुण वयापासून भुरळ घालीत आलेले आहे. त्यांच्या लेखणीतील सौंदर्यवाद, संवेदनशीलता आणि निसर्ग आणि माणूस यांच्या उत्तुंग दर्शनासाठी आतुरलेले त्यांचे मन, यांचा नेहमीच मला मोह पडलेला आहे. माझ्या पिढीच्या ललित लेखकांवर नानासाहेबांच्या लेखनशैलीचा मोठा प्रभाव होता व आहे. पण केवळ ललित लेखनापुरताच तो प्रभाव होता असे नाही, तर त्यांचे राजकीय विचार, पुरोगामी सामाजिक दृष्टी, सत्वशीलतेचा आग्रह आणि एकूणच जीवन सत्य, शिव आणि सौंदर्य यांनी परिपूर्ण असावे ही त्यांची वृत्ती, आमच्या

पिढीवर संस्कार करणारी ठरली.

अशा या बहुआयामी व्यक्तीचे चरित्रलेखन “महाराष्ट्राचे शिल्पकार” या ग्रंथमालेमध्ये घडून यावे, असे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाला वाटले आणि हे महत्त्वाचे लेखनकार्य, नानासाहेब गोरे यांना जवळून ओळखणारे, त्यांचा प्रदीर्घ सहवास लाभलेले जेष्ठ समाजवादी नेते आणि साहित्यिक प्रा. ग. प्र. प्रधान यांच्यावर सोपविण्यात आले. त्यांनी ते केवळ अगत्यानेच नव्हे तर कर्तव्यबुद्धीने तात्काळ स्वीकारले. याचा महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाला अतिशय आनंद होतो. महाराष्ट्राच्या एका थोर शिल्पकाराचे चरित्र लिहिण्यासाठी तेवढाच थोर लेखक उपलब्ध व्हावा, याचा आम्हांला सर्वार्थाने अभिमानही वाटतो. खरे तर नानासाहेब गोरे यांच्यासारख्या समृद्ध जीवन जगलेल्या नेत्याचे विस्तृत स्वरूपाचे चरित्र लिहिले जाणे आवश्यक आहे, परंतु, “महाराष्ट्राचे शिल्पकार” या ग्रंथमालेची मर्यादा ध्यानात घेऊन आम्ही प्रा. प्रधान यांना नानासाहेबांचे एक आटोपशीर; परंतु त्यांच्या कर्तृत्वाची सर्व वैशिष्ट्ये प्रगट करणारे पुस्तक लिहिण्याची विनंती केली आणि स्वतःचे वय, प्रकृती याचा मुळीसुद्धा विचार न करता प्रधानसरांनी अत्यंत आत्मीयतेने हे पुस्तक आम्हाला लिहून दिले, याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच होतील. प्रधानसरांनी लिहिलेले हे चरित्र पृष्ठसंख्येने लहान वाटले तरी नानासाहेब गोरे यांच्या व्यक्तिमत्वाचे सर्व पैलू व्यक्त करणारे एक महत्त्वपूर्ण पुस्तक आहे. हे पुस्तक प्रकाशित करण्याचा सुयोग नानासाहेब गोरे यांच्या जन्मशताब्दीच्या प्रारंभी येत आहे व या पुस्तकानेच त्यांची जन्मशताब्दी सुरू होत आहे याचाही मंडळाला साभिमान आनंद वाटतो. असे योग वरचे वर येत नसतात. त्यासाठी आदरणीय प्रधानसर यांना मी कृतज्ञतापूर्वक धन्यवाद देतो.

**मधु मंगेश कर्णिक**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

ठिकाण : मुंबई

## प्रकरण १

## विद्याभ्यास आणि स्वातंत्र्यलढ्यातील कारावास

गणेशपंत ऊर्फ अण्णासाहेब गोरे हे कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील देवगड तालुक्यामधील हिंदळे या गावचे राहणारे. मुंबईला मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यावर त्यांना शिक्षणखात्यात नोकरी लागली आणि ते पुण्याला आले. त्यांना दोन मुले. थोरली गंगू आणि तिच्या पाठचा नारायण. नारायणला घरात नानू म्हणत. नानूचा जन्म १५ जून १९०७ रोजी झाला. गोरे कुटुंब अनेक वर्षे पुण्यातील शनिवार पेठेत, अप्पा बळवंत चौकाकडून फुटक्या बुरुजाकडे जाणाऱ्या हमरस्त्यावरील एका वाड्यात राहात असे. नानू जन्मापासून कॉलेजचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत इथेच वाढला. रहदारी विरळ असल्यामुळे मुले रस्त्यावरच खेळत. गणपती, नवरात्र हे सण सगळ्याच मुलांना आवडत. नानूला त्रिपुरी पौर्णिमेला देवळादेवळांतून काढलेले रांगोळीचे सुंदर गालिचेही फार आवडत असत. गोरे कुटुंब दर दोन-तीन वर्षांनी त्यांच्या हिंदळे या गावी जात असे; तेथे जाताना देवगडला थांबावेच लागे. देवगडला समुद्रकाठाच्या पुळणीवर बसून लाटांच्या येरझाऱ्या पाहणे नानूला फार आवडत असे आणि पुळणीवर पसरलेले शंखशिंपले गोळा करण्यातही त्याला गंमत वाटे. हिंदळे हे लहानसे खेडेगाव. पण पुण्याला जे पाहायला, करायला मिळत नसे ते तेथे पाहायला, करायला मिळे. सुरंगीची, भुईचाफ्याची, नागचाफ्याची आणि सोनटक्क्याची फुले, त्यांचे रूप आणि वास यांनी नानूचे मन वेडावून जात असे. आंब्याच्या, फणसाच्या वासाने घर भरून जायचे आणि आंबे खाऊन तोंडाला मिठी बसायची. फणस पिकला की गरे काढायचे आणि खायचे. जाती-जातींमधील भेद तीव्र होते आणि तरीही गावगाडा चालूच होता. नानूला एकच थोरली बहीण होती. लहानपणी ही भावंडे एकत्र खेळली, वाढली आणि पुढे गंगूचे लग्न झाले. दुर्दैवाने ती सतराव्या-अठराव्या वर्षीच वारली.

गोरे कुटुंब जुन्या वळणाचे. घरात देव, पूजाअर्चा होती. अण्णांचा देवधर्माकडे विशेष कल होता. लहानपणी नानूच्या मनातही भक्तिभाव होता. नानू प्रथम सदाशिव पेठेतील ट्रेनिंग कॉलेजच्या आवारातील सरकारी प्राथमिक शाळेत गेला आणि चौथी पास झाल्यावर तो शनिवार पेठेतीलच रमण बागेतील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये जाऊ लागला. या शाळेत त्याला, गोपीनाथ तळवलकर, र. के. खाडिलकर, तारकुंडे, शिखरे आणि पुढे एस. एम. जोशी हे मित्र भेटले. येथेच त्याच्या मनाची आणि शरीराची घडण झाली. अभ्यासात हुशार असलेला नानू खोखो, हुतूतू उत्तम खेळत

असे. घरचे वातावरण जुन्या वळणाचे. परंतु नानू वाचू लागला; त्याच्या बुद्धीला आणि मनाला पंख फुटले. नानूच्या भोवतालचे जग तसे संकुचित होते. ते कारकुनांचे, शिक्षकांचे, भटाभिक्षुकांचे, बेकारांचे, सटरफटर उद्योग करून, जाते घडी ती आपली, म्हणून जगणाऱ्या आणि महत्त्वाकांक्षा मेलेल्या लोकांचे जग होते. मात्र ते अल्पसमाधानी जग होते. मर्यादित सामाजिक चौकटीत बारीक-सारीक हेव्यादाव्यांत गुरफटलेले ते जग होते. नानूच्या भोवतालच्या लोकांना लो. टिळकांच्याबद्दल अभिमान वाटे. 'केसरी' अनेक घरात वाचला जाई. गणपती उत्सवात मेळे निघत. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचा आवाज उमटत असे. पण एकूण समाजजीवन संकुचित, चाकोरित चालणारे, परंपरेला चिकटून राहणारेच होते. स्त्रियांची अवस्था दयनीय होती. नानूच्या बहिणीच्या-गंगूच्या लग्नसमारंभातील रुसवे-फुगवे पाहून नानूचा विरस झाला. गंगू आणि नानूचे एका काळचे एकत्र राहणे, खेळणे संपले. नानूने एका ठिकाणी लिहिले आहे, 'माझी बहीण गंगू सासरच्या कृपण, निर्घृण घरात वाढली; आणि एक दिवस हे जग सोडून निघून गेली. आमचे दोघा भावंडांचे समुद्राकाठच्या पुळणीवरील सहजीवन खलास झाले. जागेवर फक्त हौसेने जमवलेले शंख-शिंपले उरले.'

नानू शिकत असलेल्या न्यू इंग्लिश स्कूलमधील शिस्तशीर वातावरणामुळे त्याला अभ्यास करण्याची सवय लागली आणि अभ्यासात गोडीही वाटू लागली. अक्षराला वळण येऊ लागले आणि शुद्धलेखनातील सौंदर्य जाणवू लागले. हातानेच कपडे स्वच्छ धुण्यात आणि हातानेच इस्त्री करून ते नीटनेटके घालण्यात नानूला आनंद वाटे. अभ्यासाव्यतिरिक्त इतर वाचन करण्याचीही आवड त्याच्या मनात निर्माण झाली. शाळेच्या वाचनालयातून पुस्तके मिळत आणि घरी अण्णाही नानूला भरपूर पुस्तके देत. टिळक मंडालेहून सुटून आले त्यावेळी लोकमान्यांचे दर्शन घेण्यासाठी एस. एम. जोशी, शिरुभाऊ लिमये, खाडिलकर आदी मित्रांसोबत नानूही गायकवाडवाड्यात गेला होता. नानूचे वडील अण्णा सरकारी नोकरीत होते. पण त्यांना लोकमान्याबद्दल मोठा आदर वाटे. याचाही संस्कार नानूच्या मनावर झाला. संस्कृत, मराठी आणी इंग्रजी हे नानूच्या आवडीचे विषय होते. लेलेशास्त्रींच्या रसाळ वाणीतून संस्कृत ऐकताना नानूला फार आनंद वाटे. लेलेशास्त्रींच्यामुळेच संस्कृत भाषा आणि साहित्य यांचे सौंदर्य त्याला समजले. इंग्रजी आणि मराठी साहित्याबद्दलही ओढ वाटू लागली. ते साहित्य वाचताना मानवी स्वभावातील विविध छटा समजू लागल्या आणि स्त्रीच्या सौंदर्याची अभिरुचीसंपन्न कल्पना मनात आकार घेऊ लागली. मॅट्रिकच्या परीक्षेत चांगले यश

मिळविल्यानंतर नानू, एस. एम. जोशी, शिखरे, तारकुंडे हे मित्र फर्ग्युसन कॉलेजमध्ये जाऊ लागले. ते १९२३ साल होते. फर्ग्युसन कॉलेजचे ग्रंथालय पाहून या सर्व हुशार, ज्ञानोत्सुक विद्यार्थ्यांचे मन हरखून गेले. या समवयस्क मित्रांचे आपापसांत सतत वादविवाद होत. नानू आणि एस. एम. या दोघांची विशेष मैत्री जमली. एस.एम. चे लहानपण खूप हालअपेष्टांत गेले. नानूला तशी परिस्थितीची झळ लागली नव्हती. सुखवस्तू मध्यमवर्गीय कुटुंबात तो वाढला होता पण तो आत्मकेंद्रित नव्हता. एस. एम. कडून त्यांच्या गावात झालेल्या विधवेच्या विटंबनेची कहाणी ऐकून नानूचे मन खिन्न झाले आणि हे का, असा तो विचार करू लागला. एस. एम. चा स्वभाव अधिक भावनाप्रधान होता आणि नानूचे मन अधिक विचारप्रवण होते. परंतु या दोघा मित्रांची दोस्ती अधिकाधिक दृढ होत गेली, कारण दोघांनाही कृतिशील जीवनाबद्दल ओढ होती.

कॉलेजमध्ये गेल्यानंतर नानूने जे ग्रंथ वाचले, जे विचार ऐकले, समवयस्क मित्रांशी ज्या चर्चा केल्या, त्यामुळे त्याचे मन विचारप्रवण बनले. पारतंत्र्यामुळे समाजात निर्माण झालेली जी लाचारी सभोवताली दिसर असे, त्याची त्याला चीड येई. स्वाभिमानाने जगण्यात सौंदर्य आहे आणि गुलामगिरीत कुरुपता आहे. असे त्याला तीव्रतेने वाटे. रूढींच्यामुळे समाजजीवन आणि व्यक्तिजीवनही खुरटले आहे, हा आगरकरांचा विचार नानूला मनोमन पटला. पारतंत्र्याच्या बेड्या आणि सामाजिक रुढींचे पाश तोडल्याशिवाय समाजपुरुष सतेज, बांधेसूद होऊ शकणार नाही, हे विचार या तरुण विद्यार्थ्यांच्या मनात दृढ होत चालले, बंडखोर विचार मनात उसळून येऊ लागले आणि ध्येयाच्या प्रकाशकिरणांनी मन उजळून जाऊ लागले. लोकमान्यांची भाषणे ऐकली नसली, तरी त्यांचे लेख वाचल्यावर त्यांच्या देशभक्तीपर विचारांशी या नवयुवकाचा परिचय झाला आणि त्यांनी दिलेल्या स्वराज्याच्या चैतन्यदायी मंत्राने त्याचे मन भारले जाऊ लागले. म. गांधींचा संदेश सतत कानावर येऊ लागला. क्रांतिकारकांच्या समर्पित साहसी जीवनातील पराक्रमाच्या भव्यतेमुळे मन मोहून गेले. पुरुषार्थी ध्येयासक्त जीवन जगण्याचा निर्धार होऊ लागला. एस. एम., शिरुभाऊ, खाडिलकर यांच्यासारख्या मित्रांमुळे मन भराऱ्या घेऊ लागले. जुन्या वळणाच्या ब्राह्मण कुटुंबातील एकुलत्या एक मुलाला ही झेप घेणे सोपे नव्हते. आई-वडिलांना आपल्या वागण्याने दुःख होईल, हा विचार मनाला अस्वस्थ करीत होता, परंतु जीवनाचा प्रवाह मागे वळणे शक्य नव्हते. चौफेर वाचन आणि भरपूर अभ्यास करताना नानूची वैचारिक भूमिका स्पष्ट होत चालली होती आणि साहित्याच्या अभ्यासामुळे मुळातील रसिकतेला चिकित्सक अभिरुचीची

जोड मिळत होती. इंटरच्या वर्गात असताना कालिदासाची सर्व नाटके तसेच कुमारसंभव आणि रघुवंश वाचताना संस्कृत भाषा आणि साहित्य यांच्याबद्दल या तरुण विद्यार्थ्यांच्या मनात प्रेम निर्माण झाले.

एस. एम. जोशी आणि गोरे हे इंटरमिजिएट आर्टस् पास झाल्यावर बी. ए. ला मात्र दोघांनी वेगवेगळे विषय घेतले. नानूचे इंग्लिश (ऑनर्स) व संस्कृत हा ग्रुप घेतला. तर एस. एम. ने अर्थशास्त्र (ऑनर्स) आणि इतिहास हा ग्रुप घेतला. नानूला पहिल्यापासून साहित्याची आवड होती. एस. एम. त्याला म्हणाले, "मला प्रो. व्ही. जी. काळ्यांचे शिकवणे फार आवडते. इकॉनॉमिक्ससारखा विषय शिकवताना ते आपल्या भोवतालच्या परिस्थितीचेही फार मार्मिक विवेचन करतात." नानू म्हणाला, "मला वाटतं की बी. ए. ला आल्यावर आपण स्वतंत्र बुद्धीनं अभ्यास केला पाहिजे. आमच्या संस्कृतच्या प्रोफेसरांपेक्षा मला आपल्या शाळेतले लेलेशास्त्रीच अधिक चांगले शिक्षक आहेत असं वाटतं." बी. ए. साठी इंग्रजी हा विषय घेतल्यावर नानूने इंग्रजी साहित्यही मनसोक्त वाचले. शेक्सपिअरची नाटके, शेले, बायरन, कीटस् आणि ब्राउनिंग यांचे काव्य तसेच रस्किन आणि कार्लाइल यांचे विचारप्रधान गद्य यांचे वाचन करताना त्याला जीवनाचे एक आगळेच दर्शन झाले. डिकन्सच्या कादंबऱ्यांतील गरिबांच्या शोषणांच्या, वेदनांच्या चित्रणाचाही नानूच्या मनावर खूप परिणाम झाला; परंतु सर्वांत नानूवर अधिक प्रभाव पडला तो मराठीतील आगरकरांच्या निबंधांचा. आगरकरांचे 'सुधारक' मधील लेख वाचताना नानूला आपल्या समाजातील दोषांची तीव्र जाणीव होऊ लागली. परंपरावादी ब्राह्मण कुटुंबात संस्कारक्षम वयात झालेल्या संस्कारांमुळे पूर्वी ज्या गोष्टी त्याच्या मनाला फारशा बोचत नव्हत्या, त्या आता असह्य वाटू लागल्या. त्यावेळी ब्राह्मण कुटुंबात केशवपन केलेल्या अनेक पोक्त वयाच्या विधवा स्त्रिया नानूच्या अवतीभोवती वावरत असत. त्यांच्या दुःखाची, केशवपनामुळे झालेल्या विटंबनेची, घरादारात त्यांच्या होत असलेल्या उपेक्षेची जाणीव झाल्यावर नानूचे मन रूढीविरूद्ध बंड करून उठू लागले. आगरकरांच्या तर्कसंगत विवेचनाचा, समाजातील दोषांवर त्यांनी केलेल्या प्रहारांचा नानूच्या मनावर खूप परिणाम झाला. जातीभेदांमुळे आपल्या समाजाच्या चिरफळ्या झाल्या आहेत, हे तो सभोवताली पाहात होता. पुण्यात आणि त्यापेक्षाही हिंदळ्याला दलितांना अस्पृश्य म्हणून कसे वागविले जाई, हे त्याने पाहिले होते. जन्माधिष्ठित विषमता नष्ट झाली पाहिजे, असे त्याला वाटे. नानू आणि एस. एम.फर्ग्युसन कॉलेजच्या मागच्या टेकडीवर फिरायला जात. त्या वेळी या दोन ध्येयवादी मित्रांच्यामध्ये सतत चर्चा चालत. एकदा नानू म्हणाला, 'टिळक आणि

आगरकर डेक्कन कॉलेजमध्ये असताना त्यांच्यात आधी राजकीय की आधी सामाजिक असा वाद होत असे. दोघेही पुढे आपापल्या मार्गाने गेले. पण मला वाटतं की आता हा वाद कालबाह्य झाला आहे. आपल्याला स्वराज्यासाठी चळवळ करतानाच समाजही सुधारला पाहिजे. हे गांधींनी टाकलेले पुढचे पाऊल आहे.' एस. एम. म्हणाला, 'पारतंत्र्यामुळे आपला समाज लाचार, स्वाभिमानशून्य झाला आहे. ही लाचारी पाहून मला फार संताप येतो.' नानू म्हणाला, 'एकीकडे लाचार असलेले आपण पांढरपेशे, इतर जातींना तुच्छतेने वागवताना मात्र कमालीचे उर्मट असतो. ब्रिटिश सत्तेपुढे आपण नांगी टाकतो पण अस्पृश्यांना वाईट वागवताना आपण अरेरावी करतो, या विसंगतीवर आगरकरांनी नेमके बोटे ठवले आहे,' एस. एम. म्हणाला, ' हे खरेच आहे. महारांना आपण शिवतदेखील नाही. ती माणसं नाहीत का, असादेखील आपण विचार करीत नाही, याची मला शरम वाटते. तसंच पुरुषाने व्यभिचार केला तर तो चालतो, पण बाईच्या हातून चूक झाली, की तिचे मात्र धिंडवडे निघतात.'

नानू म्हणाला, 'समाज सुधारल्याशिवाय स्वराज्याची चळवळ आपण एकजुटीने करू शकणार नाही आणि आपण परक्यांच्या गुलामगिरीमुळे स्वतःच्या दोषांकडे डोळेझाक करतो, असा हा गुंता आहे.' एस. एम. म्हणाला, 'आपल्या देशातील दारिद्र्याचा प्रश्न मला आपल्या प्रोफेसर काळ्यांच्यामुळे समजला. ब्रिटिशांनी आपली सतत लूट चालविली आहे.' नानू म्हणाला, 'हे तर खरेच आहे. पण आपल्या खेड्यांतील दारिद्र्य तर फारच भीषण आहे. या सगळ्या आघाड्यांवर आपल्याला लढावे लागणार आहे.' एस. एम. म्हणाला. '१९२० साली गांधीनी असहकाराची चळवळ केली, त्यावेळी आपण शाळेत होतो; परंतु त्या चळवळीच्या काळात एक वेगळेच वातावरण आपण पाहिले. लोक खूप निर्भय झाले होते.' नानू म्हणाला, 'गांधीनी चळवळ मागे घ्यायला नको होती, त्यामुळे लोकांचा तेजोभंग झाला असे मला वाटते.' त्यावर एस. एम. म्हणाला 'पण गांधी स्वस्थ बसले नाहीत, त्यांचे काम चालूच आहे. ब्रिटिश राजवटीत आपण सगळेच होरपळून निघतो आहोत, त्यामुळं लोक अस्वस्थ आहेत. काँग्रेसने बरोबर नेतृत्व केलं तर पुन्हा चळवळ उभी राहील.' नानूने मत व्यक्त केले, 'जवाहरलाल नेहरू, सुभाषबाबू यांनी नेतृत्व केले तर स्वातंत्र्य चळवळीला योग्य दिशा मिळेल असे मला वाटते. अहिंसा ही स्ट्रॅटेजी म्हणून मला मान्य आहे, पण गांधी अहिंसा हे तत्त्वज्ञान मानतात हे मला पटत नाही.' एस. एम. म्हणाला 'क्रांतिकारकांच्या बलिदानामुळे तरूणांचे मन पेटून निघते हे खरे, परंतु या मार्गाने जाणे सोपे नाही.' नानू म्हणाला, 'आपल्याला दोघांना स्वातंत्र्य

चळवळ व्हावी असे वाटते तसे अनेक तरूणांना वाटत असणारच. त्यांची संघटना आपण केली पाहिजे.' एस. एम. ने सांगितले, 'काल मी आणि खाडिलकर बोलत बसलो होतो. तेव्हा तोही हेच म्हणाला. आपण आता या कामाला सुरुवातच केली पाहिजे.'

नानूला आगरकरांच्या सुधारकी विचारांबद्दल आकर्षण वाटे, त्याचप्रमाणे लोकमान्य टिळकांच्या कृतिशील जीवनाबद्दलही आकर्षण वाटे. तो एकदा खाडिलकरला म्हणाला, 'मी गेल्या आठवड्यात टिळकांनी १९०८ सालच्या खटल्यात कोर्टात केलेले भाषण वाचले. टिळक स्वतःच्या बचाव करीतच नव्हते, ते आपली स्वराज्याची मागणी योग्य आहे, न्याय्य आहे हे जगापुढं मांडीत होते आणि भारतीयांना स्वराज्यासाठी चळवळ करण्याची प्रेरणा देत होते. ते भाषण वाचल्यावर मला रात्री झोपच आली नाही. टिळकांनी धैर्याने सहा वर्षे तुरुंगवास भोगला; आणि आपल्या देशापुढे देशभक्तीचा आदर्श ठेवला. आपण पुढल्या पिढीतील तरूण, आपल्याला स्वस्थ बसून नाही चालायचं.' खाडिलकर म्हणाला, 'मलाही असचं सारखं वाटतं, आपण बी.ए. होऊ. एल.एल.बी. होऊ, पण त्यापेक्षा देशासाठी काय करू, हेच अधिक महत्त्वाचं आहे. परक्यांच्या गुलामगिरीत जगणं मला असह्य होतं.'

शिरू लिमये कॉलेजमध्ये गेला नाही. मात्र तो या मित्रांच्याच गटात राहिला. शिरू सर्वांत धाडसी आणि तसाच खोडकर. त्याला क्रांतिकारकांबद्दल विलक्षण आकर्षण होते. एस. एम., गोरे, खाडिलकर, शिरूभाऊ हे मित्र नेहमी भेटत, चर्चा करीत. स्वातंत्र्यासाठी चळवळ केली पाहिजे, आपण मातृभूमीची सेवा केली पाहिजे, असे या चारही मित्रांना तीव्रतेने वाटे. शिरूचे भटकणे चालूच असे. एकदा जवळजवळ पंधरा दिवस शिरू भेटला नाही, म्हणून एस. एम. ने विचारलं, 'गोरे, तुला शिरू भेटला होता का?' नानू म्हणाला, 'नाही बुवा, पंधरवड्यापूर्वी जरा गावाला जाऊन येणार आहे असे मला आणि खाडिलकरला म्हणाला, कुठे जाणार हे तो बोलला नाही आणि मीही चौकशी केली नाही.' पाच-सहा दिवसांनी शिरू अचानक पुण्यात आला आणि नानूच्या घरी आला. 'काय रे कुठे गायब झाला होतास?' नानूने विचारले. शिरू नेहमीप्रमाणे खट्याळपणे हसला, 'तुला काय वाटलं, मी फरारी झालो?' ते राहू दे. मी आत्ताच एस. एम. आणि खाडिलकरकडे जाऊन आलो. आपण आज रात्री भटकायला जाऊ. मी कुठे गेलो, कुणाला भेटलो ते सांगेन सगळं तेव्हा.'

नानूने विचारलं, 'यायचे कुठे?' शिरू लिमये शनिवारातच रमण बागेच्या मागच्या बाजूला राहात होता. तो म्हणाला, 'तू रात्री जेवून ९ वाजता माझ्या घरी ये.

एस. एम. आणि खाडिलकर तिथेच येणार आहेत. आपण ठरवू कुठे जायचं ते.’ रात्री ठरल्याप्रमाणे हे मित्र जमले आणि शिरूने ठरवल्याप्रमाणे पेरूगेट ओलांडून पुढे पर्वतीच्या रस्त्याला लागून अलीकडे तळ्यातल्या गणपतीच्या देवळाजवळ जाऊन बसले. कार्तिक महिन्यातील द्वादशी होती. थंडी चांगलीच बोचरी होती. मात्र चंद्रप्रकाशामुळं प्रसन्न वाटत होते. थोड्या गप्पा झाल्यावर शिरू सांगू लागला, ‘मी काशीला जाऊन आलो. सदाशिव पेठेतील वसंत नाईककडून पत्ते घेऊनच मी गेलो होता.’ नानूने विचारले, ‘म्हणजे प्रोफेसर नाईकांचा पुतण्या? त्याचा काय संबंध? ’ शिरू म्हणाला, ‘मला माहीत होते. त्याचे संबंध आहेत तिथे,’ शिरू पुढे सांगू लागला, ‘काशी विद्यापीठात आचार्य नरेंद्र देव म्हणून इतिहासाचे प्रोफेसर आहेत. फार हुशार आणि उमद्या स्वभावाचे. १९२० च्या चळवळीत त्यांनी भाग घेतला होता. नंतर काशी विद्यापीठात शिकवायला लागले. तरुण कार्यकर्त्यांना त्यांचा मोठा आधार आहे. तिथेच मला वसंत नाईकानं सांगितलेल्या व्यक्तीचा मित्र भेटला आणि पुढे आठवड्याभरात मी बऱ्याच जणांना भेटलो. काशी आणि अलाहाबाद इथं तरुण क्रांतिकारकांचा एक मोठा गट आहे. त्यांचा प्रमुख आहे चंद्रशेखर आझाद. मी त्याला भेटलो, उंच, धिप्पाड पैलवानासारखं शरीर कमावलेलं. वीस सालच्या चळवळीत त्याला फटक्यांची शिक्षा झाली होती. तुरुंगातून सुटल्यावर त्याने सशस्त्र क्रांतीच्या विचाराने काही मित्र जोडले आणि आता उत्तर हिंदुस्थानात असे बरेच गट एकत्र आले आहेत. यातल्या प्रमुखांची नुकतीच एक गुप्त बैठक दिल्लीमध्ये लाल किल्ल्यात एका बाजूला झाली. या संघटनेचं नाव आहे, ‘हिंदुस्थान सोशलिस्ट रिपब्लिकन पार्टी.’ या संघटनेत भगतसिंग म्हणून एक शीख तरुण आहे. तोच यांचा नेता आहे. मी त्याला भेटलो. हा देखणा उमदा तरुण पार हुशार दिसला. मूळचा लाहोरचा. त्याच्या चुलत्याला ब्रिटिशांनी पूर्वी हद्दपार केलं होतं. भगतसिंग हा लाला लजपतराय यांना फार मानतो. तो उत्तम इंग्रजी लिहितो. वर्तमानपत्रात त्याचे लेख प्रसिद्ध झाले आहेत. भगतसिंग मला अर्धा तास भेटला. खरा सेनापती आहे तो, चंद्रशेखर आझाद फार बोलत नाही, पण तो विलक्षण साहसी आहे. या संघटनेची एक शाखा आहे. ‘हिंदुस्थान सोशलिस्ट रिपब्लिकन आर्मी.’ चंद्रशेखर आझाद हा या शाखेचा सेनापती आहे. या संघनेत महाराष्ट्रातला राजगुरु म्हणून तरुण आहे, पण त्याची गाठ पडू शकली नाही. तो अमरावतीला गेला होता, काशीला संस्कृतचा अभ्यास करण्यासाठी आलेला राजगुरु हा आपल्या पुणे जिल्ह्यातील खेडचा आहे. या गटात बंगालमधील शचिन्द्र सन्याल म्हणून एक क्रांतिकारक आहे. त्याला मी थोडा वेळ भेटलो. तो मला म्हणाला, ‘महाराष्ट्रात तुम्ही असा रेव्होल्युशनरीजचा गट

तयार केला पाहिजे. राजगुरु काही दिवसांनी पुण्यात येईल. तेव्हा तू त्याला भेट,' शिरू पुढे म्हणाला, 'भगतसिंग आपल्याकडे काही पुस्तके पाठविणार आहे. तो मला म्हणाला, 'आपल्या क्रांतिकारी संघटनेला खंबीर वैचारिक बैठक असली पाहिजे. आपल्याला चळवळीचे परस्पेक्टिव्ह असले पाहिजे. रशियन राज्यक्रांतीपासून आपल्याला खूप शिकण्यासारखे आहे.'

हे चार मित्र साडेदहापर्यंत बोलत होते. चर्चेमध्ये बंगालमध्ये अरविंद घोषांच्या प्रेरणेमुळे निर्माण झालेल्या क्रांतिकारकांच्या संघटनेचाही विषय निघाला. उठता उठता एस. एम. म्हणाला, 'आपला लढा फार बलाढ्य शत्रूशी आहे. नुसती हाराकिरी करून चालणार नाही. काळजीपूर्वक पावलं टाकली पाहिजेत.' नानू म्हणाला, 'मुंबईला कॉलेजमधील तरुणांचा एक गट आहे. त्यांच्यापैकी युसुफ मेहेरअली हा फार तडफदार आहे. तो नुकताच आपल्या चिकेरूर या मित्राला भेटला होता. चिकेरूर मला म्हणाला की आपण पुढील आठवड्यात जमू. मेहेरअलीशी काय बोलणे झाले ते त्यावेळी चिकेरूर आपल्याला सांगेल.'

चिकेरूर हा हुबळीहून आलेला विद्यार्थी. तो मुंबईस त्याच्या मामेभावाकडे जात असे. तो मामेभाऊ एलफिन्स्टन कॉलेजात शिकत होता. त्याच्यामुळे चिकेरूरची आणि मेहेरअलीची गाठ पडली. मेहेरअलीच्या व्यक्तिमत्त्वामुळे चिकेरूर भारावून गेला. मेहेरअलीचे इंग्रजीवरील प्रभुत्व, त्याची बुद्धिमत्ता आणि त्याचा उमदा स्वभाव यामुळे तो मुंबईमधील कॉलेज विद्यार्थ्यांमध्ये अतिशय प्रिय होता. चिकेरूरला पहिल्याच भेटीत त्याने विचारले, 'पुण्याला राष्ट्रवादी विद्यार्थ्यांचा गट आहे की नाही?' चिकेरूर म्हणाला, 'असा अद्याप गट नाही. पण आमच्यातील एस. एम. जोशी, गोरे आणि खाडिलकर हे तिघे तडफदार आणि बुद्धिमान विद्यार्थी त्यांचे राष्ट्रवादी विचार डिबेटिंग युनियनमध्ये मांडीत असतात.' यावर मेहेरअली म्हणाला, 'मला त्यांना भेटलेच पाहिजे. आपल्याला तरुणांची देशव्यापी संघटना उभारायला हवी.' चिकेरूरने हे सारे एस. एम., गोरे आणि खाडिलकर यांना सांगितले.तेव्हा त्यांनाही मोठा उत्साह वाटला. काही दिवसांनी चिकेरूरला त्याच्या मामेभावाने पुढील आठवड्यात मेहेरअली पुण्यात येणार आहे हे कळवले. त्याप्रमाणे मेहेरअली हा पुण्याला आला. चिकेरूरच्या खोलीवर एस. एम. , गोरे, खाडिलकर, आत्माराम भट, गोटू मेंहेंदळे, शिरू लिमये आणि तीन-चार जण जमले. यूसूफ मेहेरअलीशी पहिल्याच भेटीत जोशी-गोरे-खाडिलकर या त्रिकुटाची दोस्ती झाली. मेहेरअली म्हणाला, 'लोकांमध्ये स्वातंत्र्याची आकांक्षा निर्माण केली पाहिजे आणि ती फक्त आपल्यासारखी तरुण विद्यार्थीच करू शकतात. पारतंत्र्यामुळे आपल्या देशाला

मरगळ आली आहे; परंतु १९२० साली जेव्हा गांधींनी असहकाराची चळवळ केली तेव्हा देशाच्या काना-कोपऱ्यातून त्यांना प्रतिसाद मिळाला. पूर्वी लोक भित्रे होते, पण गांधींच्या चळवळीमुळे अनेकजण निर्भय झाले आहेत. आपण स्वाभिमानाने, माणूस म्हणून जगले पाहिजे, असे लोकांना वाटू लागले आहे. ही भावनाच आज काहींशी सुप्त आहे. परंतु आपण लोकांना जागृत करू. देशात अनेक ठिकाणी तरुणांचे गट आहेत. काँग्रेस हे देशव्यापी व्यासापीठ आहे. जवाहरलाल आणि सुभाषबाबू या तरूण नेत्यांना मी भेटलो आहे. त्यांचे नेतृत्व स्फूर्तिदायी आहे. आपण काँग्रेसमध्ये जहाल मताच्या स्वातंत्र्यवादी तरुणांची फळी उभी केली पाहिजे.' मेहेरअली अर्धा तास बोलत होता आणि तो जे बोलत होता तेच जोशी, गोरे, खाडिलकर यांना वाटत होते. बैठकीच्या शेवटी या तिघांनी पुण्यात तरुण विद्यार्थ्यांची संघटना करण्यासाठी पुढाकार घेण्याचे अभिवचन मेहेरअलींना दिले. मात्र प्रत्यक्ष काम सुरू करण्यापूर्वी आपली वैचारिक भूमिका सुस्पष्ट असली पाहिजे, असे या तीनही मित्रांनी युसूफ मेहेरअलींना सांगितले. त्यानुसार मेहेरअली पुण्याला चार वेळा आले. या सर्वांच्या दीर्घकाल चर्चा झाल्या. चर्चेतून पुढील मुद्यांवर सर्वांची एकवाक्यता झाली.

१. भारताला संपूर्ण स्वातंत्र्य मिळाले पाहिजे आणि ते ब्रिटिश साम्राज्याशी संघर्ष करूनच मिळवावे लागेल.

२. हा संघर्ष विविध पातळ्यांवर करावा लागेल. कौन्सिलमध्ये, प्रांतामध्ये आणि केंद्रातही सरकारविरोधी खंबीर भूमिका घेऊन काम करणे आवश्यक असले, तरी या कामाला मर्यादा आहेत हे मोतीलाल नेहरू, चित्तरंजन दास यांनीही मान्य केले आहे. कौन्सिलमधील कार्य मूठभर बुद्धिवंतांनाच करता येईल आणि ते पुरेसे नाही. स्वराज्यासाठी करावयाच्या चळवळीत भारतातील बहुसंख्य जनता सहभागी होणे आवश्यक आहे. या दृष्टीने जी तरुणांची संघटना स्थापन करावयाची, तिने जनसामान्यांमध्ये जाऊन काम केले पाहिजे. लोकांना जागृत केले पाहिजे आणि विविध कार्यक्रमांमध्ये लोकांना सहभागी करून घेतले पाहिजे. क्रांतिकारकांच्या त्यागातून, बलिदानातून तरुणांना स्फूर्ती मिळतेच. परंतु युवक संघटनेने प्रथम जनआंदोलनावर भर दिला पाहिजे. स्वराज्यासाठी काँग्रेसच्या कार्यक्रमांना जहाल स्वरूप देणे हे युवक चळवळीचे मुख्य कार्य आहे.

मेहेरअली चर्चेत म्हणाले की, ज्या ब्रिटिश साम्राज्याशी आपल्याला लढावयाचे, त्याचे स्वरूप काय आहे आणि साम्राज्य टिकविण्यासाठी त्यांचे डावपेच कोणते, तेही आपण समजून घेतले पाहिजेत. ते पुढे म्हणाले की, दादाभाई नौरोजींनी

सांगितल्याप्रमाणे ब्रिटिश राजवटीने भारताची आर्थिक लूट व शोषण केल्यामुळे भारत कमालीचा दरिद्री झाला आहे. या परिस्थितीची जाणीव लोकांना देऊन त्याविरुद्ध आपण जनमत संघटित केले पाहिजे. मेहेरअली पुढे म्हणाले, 'ब्रिटिश साम्राज्यवादी जी 'फोडा आणि झोडा' कुटिल नीती चालवीत आहेत ती आपण लक्षात घेतली पाहिजे. याला प्रत्युत्तर देण्यासाठी लो. टिळकांनी लखनौ येथील काँग्रेस अधिवेशनात हिंदू-मुस्लिम ऐक्याचा करार केला. दुर्दैवाने हिंदू आणि मुस्लिम यांच्यातील तेढ वाढविण्यात ब्रिटिश सरकार अनेकदा यशस्वी होते. हा साम्राज्यवाद्यांचा डाव उधळण्यासाठी आपण सर्वसमावेशक भूमिका घेतली पाहिजे. आपला राष्ट्रवाद व्यापक असला पाहिजे.' मेहेरअलींनी मांडलेल्या या भूमिकेवरही जोशी, गोरे, खाडिलकर यांनी त्यांच्याशी अगदी खुलेपणाने चर्चा केली आणि चर्चेच्या शेवटी भारतीय स्वातंत्र्यलढा व्यापक, विशाल आणि समाजातील सर्व जातिधर्मांच्या लोकांना सामावून घेण्याच्या भूमिकेवरूनच चालविला पाहिजे, यावर जोशी, गोरे आणि खाडिलकर यांचे मेहेरअली यांच्याशी एकमत झाले.

लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर त्यांचा जनसंपर्काचा वारसा चालविणारा महाराष्ट्रात कोणीही नेता नव्हता. नरसिंह चिंतामण केळकर हे टिळक पक्षाचे अध्वर्यू मानले जात असले, तरी ते वृत्तीने मवाळ होते. लोकमान्य टिळकांचा लढाऊ बाणा त्यांच्याजवळ नव्हता. त्यामुळे गांधीजींच्या विरोधी भूमिका मांडणे असा केवळ नकारात्मक मार्गच त्यांनी स्वीकारला. केळकर हे केसरीचे संपादक असल्यामुळे त्यांच्या मतांचा प्रभाव महाराष्ट्रातील पांढरपेशा वर्गावर पडत होता. सुदैवाने त्याच वेळी टिळक महाराष्ट्र विद्यापीठात राज्यशास्त्र शिकविणाऱ्या आचार्य जावडेकरांनी 'लोकशिक्षण' या मासिकातून लेख लिहून न. चिं. केळकरांच्या भूमिकेचे प्रभावीपणे खंडन केले. लोकशिक्षणकारांनी लोकमान्य टिळकांच्यावर काढलेल्या खास अंकात लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यांच्या राजकीय भूमिकांची सविस्तर चर्चा करणारा एक प्रदीर्घ लेख आचार्य जावडेकर यांनी लिहिला. जोशी, गोरे आणि खाडिलकर यांनी तो लेख वाचल्यावर त्यांना लोकमान्य टिळकांचा स्वातंत्र्यासाठी संघर्ष करण्याचा वारसा महात्मा गांधीच चालवीत आहेत ही जावडेकरंची भूमिका मनोमन पटली. केळकरांची संकुचित हिंदुत्ववादी भूमिका ही स्वातंत्र्य चळवळीला विघातक आहे, याबद्दल जोशी, गोरे आणि खाडिलकर यांचे एकमत झाले. याच सुमारास महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात आणखी एक नवा प्रवाह महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्यामुळे निर्माण झाला. महात्मा जोतिबा फुले यांच्या निधनानंतर त्यांचा व्यापक पुरोगामी दृष्टीकोन लक्षात न घेतल्यामुळे सत्यशोधक समाजाला

केवळ ब्राह्मणेत्तर चळवळीचे स्वरूप आले होते आणि त्यांच्यातील अनेक पुढारी स्वातंत्र्य चळवळीच्या विरोधीही वागू लागले होते. परंतु महर्षी विठ्ठल रामजी शिंदे या थोर समाजसुधारकांनी म. गांधीच्या सर्वांगीण पुरोगामी भूमिकेस पाठिंबा देऊन व महाराष्ट्रातील बहुजन समाजाचा कॉंग्रेसला पाठिंबा देऊन स्वातंत्र्यलढ्याच्या मुख्य प्रवाहात येण्याचे आवाहन केले. राजकीय स्वातंत्र्यासाठी चळवळ करताना आपण आपल्या समाजातील दोषही दूर केले पाहिजेत आणि अस्पृश्यतेचे निर्मूलन केले पाहिजे, या गांधीजींच्या भूमिकेला महर्षी शिंदे यांनी समर्थपणे पाठिंबा दिला. महर्षी शिंदे यांचा त्याग, त्यांनी केलेले समजासुधारणेचे कार्य यामुळे त्यांच्याबद्दल महाराष्ट्रात सर्वांना आदर वाटे. त्यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे केशवराव जेधे आणि जवळकर हे बहुजन समाजाचे तरुण तडफदार नेते कॉंग्रेसकडे आकृष्ट झाले. जोशी, गोरे आणि खाडिलकर हे तिघे तरुण ब्राह्मण कुटुंबातले, शहरात राहणारे असले तरी त्यांचे विचार हे सर्वच बाबतीत पुरोगामी होते. लो. टिळकांचा जहाल राष्ट्रवाद आणि आगरकरांची समाजसुधारणावादी भूमिका या दोन्ही प्रवृत्ती एकत्र असल्या पाहिजेत असे त्यांना वाटत होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी तीच भूमिका घेतल्यामुळे जोशी, गोरे आणि खाडिलकर यांच्या विचारांना अधिक सुस्पष्टता आली व सामर्थ्य लाभले. अशा व्यापक वैचारिक भूमिकेवरूनच ‘यूथ लीग’ची महाराष्ट्रात स्थापना करण्याचा निर्णय या तीन ध्येयवादी तरुणांनी घेतला.

‘यूथ लीग’च्या स्थापनेनंतर जोशी, गोरे आणि खाडिलकर हे तीन तरूण चळवळे म्हणून पुणेकरांना परिचित झाले. काकासाहेब गाडगीळ आणि केशवराव जेधे या ज्येष्ठ नेत्यांनी या तरुणांना सतत पाठिंबा दिला. ‘यूथ लीग’च्या पुढाकाराने मुंबई इलाखा युवक परिषदेचे अधिवेशन १२ व १३ सप्टेंबरला पुण्यात भरले; त्यावेळी पंडित नेहरू अध्यक्ष म्हणून आले होते. ‘यूथ लीग’मुळे जवाहरलाल नेहरू आणि सुभाषचंद्र बोस यांच्या संपर्कात हे तीन तरूण कार्यकर्ते आले आणि पंडितजी आणि सुभाषबाबू या दोघांनाही महाराष्ट्रातील या उदयोन्मुख नेत्यांबद्दल आपुलकी वाटली व त्यांच्याबद्दल अपेक्षाही निर्माण झाल्या.

१९१९ च्या मॉंटेग्यु चेम्सफर्ड सुधारणा कायद्यानंतर पुढील राजकीय सुधारणांचे स्वरूप काय असावे हे ठरविण्यासाठी ब्रिटिश पार्लमेंटने सायमन कमिशन नियुक्त केले. देशाच्या नेत्यांची स्वाभाविक अपेक्षा ही होती की भारतातील राजकीय सुधारणांचा मसुदा करताना एक तरी भारतीय नेता सायमन कमिशनचा सदस्य असावा. परंतु ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या कमिशनमध्ये एकही भारतीय सदस्य नव्हता. याची संतप्त प्रतिक्रिया भारताच्या राजकीय जीवनात

उमटली आणि काँग्रेसने सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्याचे ठरविले. सायमन कमिशन साक्षी घेण्यासाठी भारतातील प्रमुख शहरी गेले आणि दिल्ली, लाहोर, अलाहाबाद, मुंबई, मद्रास, कलकत्ता आदी सर्व शहरांमध्ये सायमन कमिशनच्या विरोधात प्रचंड निदर्शने झाली. सर्व ठिकाणी निदर्शकांवर जबरदस्त लाठीमार करण्यात आला, परंतु निदर्शक हटले नाहीत. मुंबईत नरिमन, युसूफ मेहेरअली यांच्या नेतृत्वाखाली निदर्शकांनी सायमन कमिशनला काळे झेंडे दाखवून 'सायमन गो बॅक' अशा घोषणा दिल्या. 'यूथ लीग'चे खाडिलकर, गोरे, जोशी आदी पुण्यातील कार्यकर्ते सायमन आयोगाविरूद्ध घोषणा देण्यासाठी खंडाळ्याच्या घाटात गेले. तेथे त्यांना पकडण्यात आले. परंतु सायमन यांची गाडी गेल्यानंतर त्यांना लगेच सोडून देण्यात आले. सायमनने खिडकीतून तोंड बाहेर काढल्यावर त्याला दिसतील असे 'सायमन गो बॅक' हे फलक या निदर्शकांनी तीन मालमोटारींवर लावले होते. सायमन कमिशनविरोधी निदर्शनानंतर जोशी, गोरे, खाडिलकर यांचा 'यूथ लीग'च्या मुंबईतील कार्यकर्त्यांशी, विशेषतः युसूफ मेहेरअलींशी संपर्क अधिक वाढला.

३१ डिसेंबर १९२९ला पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन लाहोर येथे भरले. या अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्य हे भारताचे ध्येय आहे, हे जाहीर करणारा ठराव एकमताने पास झाला आणि आगामी २६ जानेवारी हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करावा असे पंडित नेहरूंनी आवाहन केले. त्याप्रमाणे पोलीस दडपशाहीस न जुमानता झेंडावंदन आणि सभा हे कार्यक्रम देशभर साजरे झाले. पुणे आणि पुणे जिल्ह्यात तरुणांना या कार्यक्रमात सहभागी करून घेण्यासाठी जोशी, गोरे, खाडिलकर, शिरू लिमये आदींनी खूप प्रयत्न केले आणि त्यामुळे हे कार्यक्रम यशस्वीपणे पार पडले.

भारतातील राजकीय जीवन अधिकाधिक प्रक्षुब्ध होत होते. लाहोर काँग्रेसच्या अधिवेशनानंतर देशातील तरुण कार्यकर्त्यांमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण केले. याच वेळी गांधीजींनी आपण स्वराज्यासाठी देशव्यापी लढा सुरू करणार असल्याचे जाहीर केले. गोरे, जोशी, खाडिलकर या 'यूथ लीग'च्या कार्यकर्त्यांनी आगामी लढ्यामध्ये भाग घेण्याचा निर्धार केला. आतापर्यंत या कार्यकर्त्यांनी सभांमधून, परिषदांमधून भाषणे केली होती. आता कृती करण्याचा क्षण जवळ आल्यावर त्यांना अर्थातच स्फुरण चढले. अखेर गांधीजींनी नियोजित लढ्याचे स्वरूप स्पष्ट केले. 'यंग इंडिया' या वृत्तपत्रातील अग्रलेखात गांधीजींनी लिहिले की मीठ ही प्रत्येक भारतीयाला रोज लागणारी जीवनावश्यक वस्तू आहे आणि असे असूनही ब्रिटिश

सरकारने मिठावर कर लादला आहे. हा कर अन्याय्य आहे म्हणून त्याविरूद्ध सत्याग्रह करणे आवश्यक आहे. गांधीजींनी जाहीर केले की ते त्यांच्या काही अनुयायांसमवेत साबरमती आश्रमातून निघून दांडी या समुद्र किनाऱ्यावरील गावापर्यंत जातील आणि समुद्रकिनारी मिठावरील कराच्या कायद्याचा भंग करून मीठ गोळा करतील. गांधीजींच्या या घोषणेकडे व्हाईसरॉय लॉर्ड आयर्विन यांनी दुर्लक्ष केले. अनेक वृत्तपत्रांनी या कायदेभंगाच्या कल्पनेची थट्टा केली. काँग्रेसमधील पं. नेहरूंसारख्या नेत्यालाही प्रथम या कायदेभंगाचे नेमके स्वरूप लक्षात आले नाही. परंतु भारतातील सर्वसामान्य माणसाला मात्र याचा अर्थ उमगला. मीठ हे प्रतीक असून हा सत्याग्रह म्हणजे ब्रिटिशांचा कायदे करण्याचा हक्क नाकारणे आहे, हे लवकरच सर्वांच्या लक्षात आले. दांडीयात्रेला जगभर प्रसिद्धी मिळाली. गोरे, जोशी आणि खाडिलकर या तिघांनीही या सत्याग्रह आंदोलनात भाग घेऊन कायदेभंग करण्याचा निर्णय घेतला. एस. एम. जोशींनी अलिबाग येथे केलेल्या भाषणाबद्दल त्यांना सहा महिन्यांची शिक्षा झाली. गोरे आणि खाडिलकर यांनी ठाणे जिल्ह्यामध्ये सरकारविरोधी भाषणे केली आणि त्यांना लागलीच अटक झाली. सत्याग्रही कोर्टात वकील देत नसत. त्याप्रमाणे गोरे व खाडिलकर या दोघांनीही 'आम्ही जाणीवपूर्वक कायदेभंग केला असून याबद्दल आम्हांला जास्तीत जास्त शिक्षा द्यावी' अशी जबानी दिली. मॅजिस्ट्रेटने या दोघाही तरूणांना चार महिने सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली आणि 'क' वर्ग दिला. या दोघांचाही तुरुंगवासाचा हा पहिला अनुभव होता, परंतु त्यांच्या मनाची पूर्ण तयारी असल्यामुळे त्यांनी कारावासातील सर्व हाल आनंदाने सोसले. सुरुवातीस जेलमधील सकाळची कांजी आणि संध्याकाळच्या जेवण्यातली कसल्याही पाल्याची भाजी घशाखाली उतरत नव्हती. परंतु मनाचा निर्धार होता आणि तरूण वयातील रग होती, त्यामुळे त्यांनी ते स्वीकारले. 'क' वर्गातील सक्त मजुरीचे कैद म्हणून चक्की पिसण्याचे काम दोघांना देण्यात आले. सवय नसल्यामुळे सुरुवातीस काम पुरे होत नसे. त्याबद्दल वॉर्डरच्या शिव्या खाव्या लागत. एक दिवस भरपूर मारही खावा लागला. गोरे या अनुभवासंबंधी पुढे अनेक वर्षांनी एकदा मला सांगताना म्हणाले, 'माझ्या अंगावर पोते टाकून मला लाठीचे तडाखे मारले ते मी सहन केले. मी व्यायामाने माझे शरीर कमावले होते. परंतु खाडिलकर दुबळा होता, त्याला मारायला लागले तेव्हा त्याला ते कसे सोसेल या काळजीने माझ्या डोळ्यांत पाणी आले.' शिक्षा भोगून गोरे व खाडिलकर बाहेर आले. एस. एम. त्यांच्या थोडे आधीच सुटले होते. स्वातंत्र्यासाठी अशा शिक्षा भोगाव्या लागणारच, याची या तिघांनाही जाणीव होती आणि हा आपला

पहिला तुरुंगवास आहे, हे त्यांनी मनोमन स्वीकारले आहे.

कारावासातून सुटल्यावर एस. एम. जोशी आणि गोरे या दोघांनी एम. ए. ला फर्ग्युसन कॉलेजमध्ये नाव घातले. २२ जुलै १९३१ला फर्ग्युसन कॉलेजला गव्हर्नर हॉटसन यांनी भेट दिली असताना वासुदेव बळवंत गोगटे या तरुणांने त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. परंतु हॉटसन बचावला आणि गोगट्यांना पकडण्यात आले. यानंतर कोणताही पुरावा नसताना फर्ग्युसन कॉलेजमधून एस. एम. जोशी आणि ना. ग. गोरे यांना काढून टाकण्यात आले. त्यामुले या दोघांनी लॉ कॉलेजमध्ये नाव घातले.

२२ ते २४ डिसेंबर १९३१ला एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, र. के. खाडिलकर या ‘यूथ लीग’च्या कार्यकर्त्यांनी पुण्यामध्ये परिषद आयोजित केली. परिषदेच्या अध्यक्षस्थानी सुभाषचंद्र बोस हे होते. या परिषदेत तरुणांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. ४ जानेवारी १९३२ला सरकारने गांधीजी, पटेल, सुभाषचंद्र बोस यांना अटक केली. मुंबई प्रांतात अटक झालेल्यांना प्रथम दोन महिने स्थानबद्ध करण्यात आले. स्थानबद्धतेनंतर एस. एम. जोशी आणि गोरे या दोघांनाही पुन्हा अटक करण्यात आली. एस. एम. जोशींना येरवडा तुरुंगात आणि ना. ग. गोरे यांना नाशिक तुरुंगात पाठविण्यात आले.

## प्रकरण २

## समाजवादी पक्षाची स्थापना आणि

## समाजवादविषयक लेखन

भारतीय राजकारणावर जगातील राजकीय घडामोडींचे परिणाम होत होते. १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीनंतर लोकमान्य टिळकांनीही या घटनेची दखल घेतली होती. रशियन राज्यक्रांतीचा नेता लेनिन यांच्या सहकाऱ्यांमध्ये एम. एन. रॉय हे होते. त्यांनी प्रथम कम्युनिस्ट विचारसरणी मांडणारे साहित्य भारतात पाठविले. मुंबईला कामगार चळवळीत कार्य करणारे श्रीपाद अमृत डांगे आणि जोगळेकर, निंबकर आदी त्यांचे सहकारी यांच्यापर्यंत हे साहित्य पोहोचले आणि त्यांच्यामुळेच भारतात 'कम्युनिस्ट विचारांचे बीजारोपण झाले. १९२५ मध्ये भारतीय 'कम्युनिस्ट पक्षा'ची स्थापना झाली. 'कम्युनिस्ट पक्षा' वर बंदी होती, त्यामुळे त्यांचे कार्य गुप्तपणे चालत असे. मात्र 'ट्रेड युनियन'चे कार्य उघडपणे चालत असे. कम्युनिस्टांच्या वाढत्या हालचालींना पायबंद घालण्यासाठी सरकारने २० मार्च १९२९ ला देशभरातील ३१ कामगार नेत्यांना अटक करून त्यांच्यावर मीरत कटाचा खटला भरला. या कटाच्या खटल्यात डांगे, जोगळेकर, निंबकर, डॉ. गंगाधर अधिकारी आदी महाराष्ट्रातील अकरा कार्यकर्ते होते. खटल्यातील आरोपींना प्रथम दीर्घ मुदतीच्या शिक्षा झाल्या, परंतु अपिलात त्या बऱ्याच कमी करण्यात आल्या. कम्युनिस्ट पुढाऱ्यांपैकी तुरुंगाबाहेर असलेल्या बी. टी. रणदिवे आदी नेत्यांनी १९३०च्या स्वातंत्र्य आंदोलनात, भाग न घेता ही भांडवलदारांची चळवळ आहे अशी टीका करून तिला विरोध केला. कम्युनिस्ट पक्ष स्वातंत्र्य संग्रामापासून दूर राहिला इतकेच नाही; तर रणदिवे त्यांच्या नेतृत्वाखाली कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी १६ मार्च १९३१ ला गांधीजींच्या विरोधी निदर्शने करून चळवळीस विरोध केला.

रशियन राज्यक्रांतीनंतर जगातील अनेक तरूण कार्यकर्त्यांप्रमाणे भारतातील काही तरूण कार्यकर्त्यांच्यावर मार्क्सवादी विचारांचा प्रभाव पडला होता. जयप्रकाश नारायण हे अमेरिकेत विद्यार्थी म्हणून शिकत असताना त्यांनी मार्क्सवादी साहित्य वाचले आणि मार्क्सच्या विचारांनी ते प्रभावित झाले. भारतात ते परतले त्यावेळी १९३०चा सत्याग्रह संग्राम सुरू झाला होता. जयप्रकाश नारायण हे पंडित नेहरूंना भेटले आणि त्यांनी सांगितल्यावर ते काँग्रेसच्या कार्यालयात काम करू लागले. १९३२च्या चळवळीत सुरुवातीस सत्याग्रह संघटित करण्याचे कार्य त्यांनी केले. १९३२च्या चळवळीत जयप्रकाश नारायण यांना मद्रासमध्ये अटक झाली आणि एक

वर्ष शिक्षा होऊन त्यांना नाशिक तुरुंगात पाठविण्यात आले. नाशिकच्या तुरुंगात त्यांच्याबरोबर युसूफ मेहेरअली, अशोक मेहता, मिनू मसानी, ना. ग. गोरे, अच्युतराव पटवर्धन वगैरे अनेक तरूण कार्यकर्ते होते. जयप्रकाश नारायण यांना आणि या सर्व तरुणांना गांधीजींच्याबद्दल आदर वाटत असला, तरी गांधीजींच्या काही धोरणांवर टीका करीत. देशव्यापी आंदोलन अहिंसक असले तरी परिस्थितीला अनुरूप म्हणून अहिंसा ही स्ट्रॅटेजी असावी असे या सर्वांना वाटे. गांधीजी अहिंसा हे जीवनाचे तत्वज्ञान मानीत. ही भूमिका स्वातंत्र्य चळवळीला घेता येणार नाही, असे जयप्रकाशजी आणि त्यांच्या या तरुण सहकाऱ्यांचे मत होते. भगतसिंग आदी क्रांतिकारकांच्या जीवनाचा आणि बलिदानाचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता. या तरूण कार्यकर्त्यांपैकी जयप्रकाश नारायण आणि अन्य काही जणांनी मार्क्सचे विचार आणि रशियन राज्यक्रांती विषयक साहित्य, तुरुंगात येण्यापूर्वीच वाचले होते. काही जणांनी हे ग्रंथ येथे वाचले. मार्क्सवादी साहित्य त्यावेळी येरवडा तुरुंगात असलेल्या एस. एम.जोशी यांनी व त्यांच्या काही सहकाऱ्यांनीही वाचले. रशियात झालेल्या कामगार क्रांतीमुळे नाशिक आणि येरवडा तुरुंगातील हे तरूण कार्यकर्ते प्रभावित झाले होते. मार्क्सचे विचार वाचल्यानंतर रशियातील राज्यक्रांतीचे वैचारिक अधिष्ठान काय होते आणि जगातील सर्व श्रमिकांना समतेवर आधारलेले नवे जग निर्माण करण्याची प्रेरणा मार्क्सच्या विचारांतून कशी मिळत होती हे या तरूण कार्यकर्त्यांना उमगले. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यालाही या विचारांच्या आधारे समतावादी स्वरूप कसे देता येईल, यासंबंधी जयप्रकाश नारायण आणि मेहेरअली, मसानी, अच्युतराव पटवर्धन, गोरे आदी कार्यकर्ते यांच्यामध्ये दीर्घकाल विचारमंथन झाले. भारतीय जनतेत हिंदू-मुसलमान, दलित-दलितेतर यांच्यामध्ये जे काही मतभेद होते, त्यांच्या आधारे भारतीय समाजात फूट पाडून येथील ब्रिटिश साम्राज्य खंबीर करणारी ही कुटिल राजनीती ब्रिटिश सरकारने अवलंबिली होती. या फूटपाड्या धोरणामुळे भारतीयांच्यात जी दुही निर्माण झाली होती, तिच्यावर मात करण्यासाठी मार्क्सने पुरस्कारलेली वर्गीय लढ्याची (क्लास स्ट्रगलचीच) भूमिका आवश्यक आहे, असे जयप्रकाश नारायण आणि त्यांच्या मेहेरअली आदी सहकाऱ्यांना वाटत होते. मात्र मार्क्सवादी भूमिका घेताना कम्युनिस्टांनी केलेल्या चुका टाळल्या पाहिजेत, असेही या सर्वांना वाटत होते. या संदर्भात गोरे यांनी लिहिले आहे: ‘१९३२चा कारावास माझ्या पहिल्या कारावासापेक्षा कमी खडतर होता. सक्त मजुरीची शिक्षा नसल्यामुळे वाचन करायला भरपूर फुरसद होती. नाशिकाच्या तुरुंगात जयप्रकाश नारायण,

युसूफ मेहेरअली, अच्युतराव पटवर्धन आदींच्याबरोबर मी होतो. मी येथे ‘कम्युनिस्ट मॅनिफेस्टो’ वाचला. तसेच एंगल्सचे ‘युरोपियन ॲण्ड सायंटिफिक सोशलिझम्’ आणि मार्क्स, लेनिन यांचे अन्य साहित्यही वाचले. आम्हा मित्रांच्या सतत चर्चा चालत. उद्याचे स्वातंत्र्य हे श्रमिकांसाठी, शेतकरी आणि कामगारांसाठीच असले पाहिजे, यावर आमचे एकमत होते. मी मार्क्स, एंगल्स यांचे ग्रंथ जरी नाशिक तुरुंगात प्रथम वाचले तरी ‘यूथ लीग’मध्ये काम करीत असताना मला साम्यवादी विचार स्थूलपणाने माहीत होता. या विचारसरणीचे कॉ. डांगे आदी कार्यकर्ते मुंबईत जी ‘ट्रेड युनियन’ चळवळ चालवीत, तिच्याशी माझा प्रत्यक्ष संबंध नसला तरी ‘ट्रेड युनियन’ ही कामगारांच्या हक्कांसाठी व हितासाठी चळवळ करते हे मला माहीत होते. डांगे, जोगळेकर, निंबकर यांना पकडून सरकारने जेव्हा त्यांच्यावर मीरत कटाचा खटला भरला, तेव्हा आम्हा ‘यूथ लीग’ मधील तरुण कार्यकर्त्यांना त्यांच्याबद्दल मोठा आदर वाटला. परंतु १९३०च्या स्वातंत्र्य चळवळीला रणदिवे आदी कम्युनिस्टांनी विरोध केला, त्यावेळी मात्र ‘यूथ लीग’ मधील आम्ही कार्यकर्ते त्यांच्यावर फार नाराज झालो. आम्हांला समाजवादाबद्दल आकर्षण वाटत होते परंतु स्वातंत्र्याच्या चळवळीला अग्रक्रम दिला पाहिजे असा आमचा आग्रह होता. गांधीजींचे सर्व विचार आम्हांला पटत होते, असे नाही. परंतु देशव्यापी आंदोलन सुरु करण्याचे आणि सामान्य माणसाला स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करून घेण्याचे अपार सामर्थ्य गांधीजींच्याच जवळ होते हे आम्ही अनुभवित होतो. काँग्रेसच्या व्यासपीठावर सर्व वर्गातील लोक येत असले आणि त्यांच्यामध्ये काही धनिकही असले, तरी काँग्रेस भांडवलवाल्यांची हस्तक खासच नव्हती. पं. जवाहरलाल नेहरू आणि सुभाषचंद्र बोस या जहाल विचारांच्या पुढाऱ्यांचे आम्हा तरुण कार्यकर्त्यांना मोठे आकर्षण वाटत असे. आम्हांला असेही वाटत असे ही भारतातील चळवळीची सूत्रे कोणत्याही आंतरराष्ट्रीय संघनेच्या हाती असता कामा नयेत. भारतातील स्वातंत्र्य चळवळीत समाजवादी आशय आणण्यासाठी जी संघटना उभी करावी लागेल आणि जे आंदोलन करावे लागेल त्याची सर्व सूत्रे भारतीयांच्याच हाती असली पाहिजेत अशीच भूमिका जयप्रकाश नारायण, आणि आम्ही नाशिक तुरुंगातील त्यांचे समविचारी सहकारी यांनी घेतली होती. त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्य लढ्यालाच अग्रक्रम द्यावयाचा आणि त्या लढ्याचे नेतृत्व करणाऱ्या काँग्रेसमध्ये राहूनच समाजवादी विचारांचा प्रभाव स्वातंत्र्य आंदोलनावर पडावा, यासाठी नेटाने आणि एकजुटीने प्रयत्न करावयाचे असा निर्णय आम्ही सर्वांनी घेतला.

१९३०-३२च्या आंदोलनात नाशिकला ज्याप्रमाणे जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन, मेहेरअली, गोरे आदी तरुण कार्यकर्ते समाजवादी विचारांकडे आकृष्ट झाले होते, त्याचप्रमाणे संयुक्त प्रांत आणि बिहारमधील तरूण कार्यकर्त्यांमध्येही असा विचार करणारा एक मोठा गट होता. संयुक्त प्रांतातील विद्यार्थ्यांचे प्रेरणास्थान काशी विद्यापीठाचे कुलगुरू आणि बौद्ध धर्म व इतिहासाचा गाढ व्यासंग केलेले विद्वान आचार्य नरेंद्र देव हे होते. आचार्य नरेंद्र देव हे विचाराने मार्क्सवादी होते. भारताचे स्वातंत्र्य हे शेतकरी आणि कामगारांसाठीच असले पाहिजे आणि त्यासाठी स्वातंत्र्य चळवळीला समाजवादी विचारांची व चळवळीची जोड दिली पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. परंतु स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच आपण समाजवादाचे स्वप्न साकार करू शकू, असे त्यांना मनोमन वाटत होते. आचार्य नरेंद्र देव यांनी १९२९च्या मार्च महिन्यात ‘सोव्हिएत रशियाची आशियासंबंधीची नीती’ असा लेख लिहून प्रसिद्ध केला होता. त्यात त्यांनी लिहिले होते, ‘कम्युनिस्टांच्या दृष्टीने साम्यवादाचा सिद्धांत हीच मुख्य गोष्ट असून बाकी सर्व गोष्टी गौण आहेत. सोव्हिएत रशिया राष्ट्रवादाला विरोधी आहे आणि रशियाने एखाद्या राष्ट्राला स्वतंत्र होण्यासाठी काही मदत केलीच तर साम्यवादाचा प्रयोग करण्याच्या दृष्टीने एक नवे क्षेत्र हाती येईल, या दृष्टीनेच ते करण्यात येते.’

संयुक्त प्रांतातील मोहनलाल गौतम आणि संपूर्णानंद आणि बिहारमधील पाटणा जेलमध्ये असलेले गंगाशरण सिंह, रामरुक्ष बेनीपुरी, वगैरे तरुणही समाजवादी विचारांच्या प्रभावाखाली आले होते. १९३२ सालच्या तुरुंगातून सुटल्यावर भारतातील हे समाजवादी विचारांचे तरुण एकत्र येऊ लागले. पाटण्यास १७ मे १९३४ रोजी ‘अखिल भारतीय काँग्रेस कमिटी’ची बैठक भरणार होती. त्यापूर्वी आचार्य नरेंद्र देव यांच्या अध्यक्षतेखाली उत्तर भारतातील समाजवादी तरुणांची बैठक झाली आणि काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला. पुण्याला १ जुलैला अशीच बैठक एस. एम. जोशी आणि ना. ग. गोरे यांनी घेतली व तेथेही हाच निर्णय झाला. १९३४च्या ऑक्टोबर महिन्यात मुंबई येथे देशभरातील प्रमुख समाजवादी कार्यकर्ते एकत्र आले आणि तेथेच काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना करून त्याचे पहिले संमेलन घेण्यात आले. काँग्रेस समाजवादी पक्षाचे अध्यक्ष म्हणून आचार्य नरेंद्र देव आणि सरचिटणीस म्हणून जयप्रकाश नारायण यांची नियुक्ती करण्यात आली. काँग्रेस समाजवादी पक्षाच्या संस्थापक सदस्यांमध्ये आचार्य नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण, डॉ. राममनोहर लोहिया, युसूफ मेहेरअली, अच्युतराव पटवर्धन, कमलादेवी चट्टोपाध्याय, एस. एम.

जोशी, ना. ग. गोरे आणि मिनू मसानी आदी प्रमुख कार्यकर्ते होते.

ना. ग. गोरे यांची राजकीय क्षेत्रात अशी झपाट्याने वाटचाल चालू असतानाच कौटुंबिक जीवनातही त्यांनी बंडखोरी केली. गोरे 'यूथ लीग'मध्ये काम करू लागल्यावर त्यांच्या वडिलांना पहिला धक्का बसला. ना. ग. गोरे यांनी त्यांच्या देशभक्तीपर विचारानुसार १९३० साली स्वातंत्र्य चळवळीत भाग घेऊन कारावास पत्करला. सरकारी नोकरीत आयुष्य घालविलेल्या त्यांच्या वडिलांना हे पसंत नव्हते. परंतु विरोध करण्यात अर्थ नाही हे ते जाणत होते. राजकीय विचारांप्रमाणेच सामाजिक बाबतीतही नारायणरावांचे विचार पुरोगामी आणि प्रखर सुधारणावादी होते. आगरकरांप्रमाणे बुद्धिप्रामाण्यवादी भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्टपणे आपल्या वडिलांना सांगितले आणि श्रावणी करण्याचे नाकारून गळ्यातील जानवे काढून टाकले. नारायणराव आणि सुमतीबाई कीर्तने यांची कॉलेजमध्ये ओळख झाली. त्यावेळी सुमतीबाई विधवा होत्या. या ओळखीचे प्रेमात रूपांतर होऊन नारायणराव आणि सुमतीबाई यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. हे नारायणरावांनी ज्यावेळी आई-वडीलांना सांगितले, त्यावेळी त्या दोघांना मोठा धक्काच बसला. नारायणरावांचे वडील हे आपल्या सनातनी मतांबाबत खंबीर असल्यामुळे एकुलत्या एका मुलावर उत्कट माया असूनही अण्णांनी या विवाहाला संमती देण्यास स्पष्ट नकार दिला. नारायणरावांनी पूर्ण विचारपूर्वक पुनर्विवाह करण्याचा निर्णय घेतला असल्यामुळे आईवडिलांना दुखावताना वाईट वाटत असूनही, नारायणराव व सुमतीबाई हे १९३४ साली विवाहबद्ध झाले. सुमतीबाई या बी. ए. होत्या; त्या प्रथम आगरकर हायस्कूलमध्ये आणि नंतर सेवासदनमध्ये शिक्षिका म्हणून काम करू लागल्या. नारायणराव सर्ववेळ काँग्रेस समाजवादी पक्षाचे काम करीत असल्यामुळे संसाराची आर्थिक जबाबदारी सुमतीबाईंनीच स्वीकारली. काही दिवसांनी अण्णांनी सदाशिव पेठेत देशमुखवाडी या त्यावेळी नव्यानेच झालेल्या वस्तीत छोटेसे दुमजली घर बांधले. त्यानंतर तळमजल्यावर अण्णा आणि नारायणरावांच्या आई असे दोघेच राहत आणि वरच्या मजल्यावर नारायणराव आणि सुमतीबाई राहू लागले. अण्णा आणि आई वरती कधी जेवायला जात नसत. परंतु सणावाराला त्यांच्या घरात गोड केले की मुलाला आणि सुनेला वरती ताट पाठवीत असत. रूढीचा पीळ मनात होता आणि तरीही माया होतीच. नारायणराव रोज थोडा वेळ तरी आईवडीलांजवळ बसत आणि ते दौऱ्यावर असले की सुमतीबाईही सासू-सासऱ्यांची आपुलकीने चौकशी करीत, आणि थोडा वेळ तरी जवळ बसत. पुढे शुभाचा जन्म झाल्यावर तिच्या आजोबा-आजींना तिला घेतल्याशिवाय राहवत नसे. नारायणराव बाहेर गेले असले

तरी सुमतीबाई शाळेत गेल्या की शुभा तिच्या आजी-आजोबांच्या जवळच खेळत असे. नारायणराव जात-धर्म ही बंधने मानीत नव्हते. त्यांचे वडील अण्णा यांनी मात्र निवृत्त झाल्यावर सदाशिव पेठेत ब्राम्हण कार्यालय उभारण्यासाठी पुढाकार घेऊन काम केले होते. दोन पिढ्यांतील हे मतांचे अंतर उघड उघड दिसणारे होते. वडील आणि मुलगा आपापल्या भूमिकेवर ठाम होते. पण मायेचे पाझर आटले नाहीत आणि परस्पर प्रेमाच्या धाग्यांमुळे दोन पिढ्या भावनेने एकत्रच राहिल्या. नारायणरावांचे चुलते अण्णांच्या पेक्षाही अधिक कर्मठ होते. ते चुकुनही पुतण्याच्या बिऱ्हाडी फिरकले नाहीत. त्यांचा मुलगा बंडू आणि त्याची धाकटी भावंडे मात्र नारायणरावांवर सख्ख्या थोरल्या भावासारखेच प्रेम करीत. बंडूचे विचार नारायणरावांच्या सारखेच होते आणि मोठा झाल्यावर आपणही चळवळीत पडले पाहिजे, असे त्याला शाळेत शिकत असतानाच वाटू लागले. नारायणरावांच्या वागण्यात कमालीचा रेखीवपणा आणि शिस्त होती, राजकीय काम करताना ते रोज नियमाने काही तास वाचन करीत. काही दिवसांनी लेखन करावे, असेही त्यांना वाटू लागले. पंडित नेहरूंचे इंग्रजी आत्मचरित्र प्रसिद्ध झाल्यावर नारायणरावांनी ते वाचले आणि त्यांना ते फार आवडले. त्याचा अनुवाद करावा असे त्यांना वाटू लागले. सुदैवाने शंकरराव देव आणि आचार्य भागवत यांनी नुकतीच सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला सुरु केली होती. त्यांनी पंडित नेहरूंच्या इंग्रजीतील आत्मचरित्राचा मराठी अनुवाद करण्याचे काम नारायणरावांवर सोपविले आणि नारायणरावांनी चार-पाच महिन्यांत ते काम पूर्ण केले. त्यावेळी ते रोज चार ते पाच तास लेखनाचे काम करीत. हा अनुवाद वाचल्यावर आचार्य भागवतांच्यासारख्या चिकित्सक समीक्षकांलाही तो फार आवडला. ते शंकरराव देवांना म्हणाले, ‘नारायणराव गोऱ्यांची मराठी लेखनाची शैली सुंदर आहे. पंडित नेहरूंच्या आत्मचरित्राचा हा मराठी अनुवाद मूळातील लेखनाइतकाच रसपूर्ण झाला आहे.’ नारायणराव हा अनुवाद करीत असताना काही वेळा बंडूला ते लिहून घेण्यास सांगत आणि बंडू त्यांना आनंदाने मदत करी. सुलभ राष्ट्रीय ग्रंथमालेने हा अनुवाद प्रसिद्ध केल्यावर मराठी वाचकांनी त्याचे मनापासून स्वागत केले. नारायणरावांचे हे पहिले पुस्तक. य. गो. जोशी हे मराठी लेखक नानासाहेबांच्या शेजारीच राहात. त्यांनी नुकताच प्रकाशन व्यवसायही सुरु केला होता. ते नारायणरावांना म्हणाले, ‘आज राजकारणात फॅसिझम, कम्युनिझम असे वेगवेगळे विचार पुढे येत आहेत. हे विचारप्रवाह मराठी वाचकाला नीट समाजावेत म्हणून मी ‘वाद-विवेचन माला’ सुरु करणार आहे. या मालेत तुम्ही माझ्यासाठी दोन तरी पुस्तके लिहिली पाहिजेत.’ नारायणरावांनी

याला आनंदाने होकार दिला.

पंडित नेहरूंच्या आत्मचरित्राचा अनुवाद करताना नारायणराव गोरे यांच्या मनात केवळ एका साहित्यकृतीचा अनुवाद करायचा नव्हता. पं. नेहरूंच्या आत्मकथेत त्यांनी स्वतःच्या कौटुंबिक जीवनातील काही ठळक घटनांची फक्त थोडक्यात माहिती दिली असून त्यातील मुख्य भाग त्यांचे राजकीय जीवन हाच आहे. जवाहरलालजी इंग्लंडमध्ये शिकत असताना भारतातील जनतेला इंग्लंडमधील लोकांप्रमाणे स्वातंत्र्य अनुभवता आले पाहिजे, असे त्यांना तीव्रतेने वाटू लागले. त्यानंतर भारतात आल्यावर वडील मोतीलाल नेहरूंच्याबरोबर अमृतसर काँग्रेसला गेल्यावर म. गांधींच्या व्यक्तिमत्वाबद्दल त्यांना कुतूहल कसे वाटले आणि पुढे ते त्या व्यक्तिमत्वाने प्रभावित कसे झाले, हे जवाहरलालजींनी लिहिले आहे. संयुक्त प्रांतातील किसानांच्यात काम करतानाच भारताच्या दारिद्र्याची पंडित नेहरूंनी कल्पना कशी आली आणि या किसानांच्या जीवनाच्या दर्शनानेच त्यांना भारताची ओळख कशी झाली, हे पं. नेहरूंनी सांगितले आहे. त्यांच्या आत्मचरित्रात भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाचे चित्र रेखाटले आहे. त्यात जगातील वेगवेगळ्या राजकीय विचारधारांची ओळख आहे आणि भारताच्या आगामी स्वातंत्र्यलढ्याची सूचनाही आहे. पंडित नेहरूंचे आत्मचरित्र मराठीत आल्यास भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या १९३५ पर्यंतच्या इतिहासाचे मराठी वाचकांना दर्शन घडेल, याची जाणीव असल्यामुळेच आचार्य भागवत आणि शंकरराव देव यांनी पं. नेहरूंच्या आत्मचरित्राचा अनुवाद सुलभ राष्ट्रीय ग्रंथमालेतर्फे प्रसिद्ध करण्याचे ठरविले. नारायणराव गोरे यांनी अनुवादाचे काम स्वीकारले तेही या जाणीवेतूनच. त्यांनी एका ठिकाणी लिहिले आहे :

'ज्या लेखकाशी आणि त्याच्या पुस्तकाशी मी मनाने एकरूप होऊ शकलो, त्याच पुस्तकांचा मी अनुवाद केला.' अशी मनाची एकरूपता असल्यामुळेच पं. नेहरूंच्या आत्मचरित्राचा सरसर अनुवाद नारायणराव करू शकले आणि अशी एकरूपता झाल्यामुळेच जयप्रकाश नारायण यांच्या 'व्हाय सोशॅलिझम' या पुस्तकाचा अनुवाद करावयाचे त्यांनी ठरविले. नाशिकच्या तुरुंगात एकत्र कारावास भोगतानाच जयप्रकाश नारायण आणि नारायणराव गोरे हे मित्र झाले. वैचारिक देवाणघेवाणीतून हे स्नेहबंध अधिक दृढ झाले आणि काँग्रेस समाजवादी पक्षाच्या स्थापनेनंतर जयप्रकाशजी यांची वैचारिक भूमिका महाराष्ट्रातील समाजवादी सहकाऱ्यांना आणि समाजवादाबद्दल आकर्षण वाटणाऱ्या तरुणांना स्पष्टपणे समजून देणे आवश्यक आहे, असे गोरे यांना वाटू लागले. जयप्रकाश नारायण यांनी त्यांच्या

पुस्तकात बाबू भगवानदास या मान्यवर व्यक्तीच्या आध्यात्मिक भूमिकेचे बुद्धिप्रामाण्यवादी दृष्टीकोनातून स्पष्टपणे खंडन केले आहे. गोरे यांना हा भाग फार आवडला. आगरकरांच्या विचारांच्या प्रभावामुळे ते स्वतः बुद्धिप्रामाण्यवादी झाले होते. एका भाषणात ते म्हणाले होते, '१९३० साली म. गांधींनी स्वातंत्र्यलढा सुरू केला, तेव्हा मी पूर्ण विचार करून, लढ्याची आवश्यकता आणि सत्याग्रहाची भूमिका पटल्यामुळेच त्यामध्ये सामील झालो. मात्र गांधीजींनी सत्याग्रहाची कल्पना त्यांना आतल्या आवाजामुळे सुचली, असे जे विधान केले ते मला पटले नाही. राजकारणात आध्यात्म आणि धर्म येऊ नयेत, तेथे आतल्या आवाजाला स्थान असू नये आणि सुस्पष्ट विचारांच्या आधारेच आपला स्वातंत्र्यलढा प्रखर होईल, असे माझे मत आहे. धर्माचा उपयोग धनिकांनी, साम्राज्यवाद्यांनी जनसामान्यांची दिशाभूल करण्यासाठी केला, हे सांगून मार्क्सने 'धर्म ही अफू आहे' असे विधान केले होते. जयप्रकाश नारायण यांनी असे मांडले होते की बाबू भगवानदास यांच्यासारख्या थोर चारित्र्यवान व्यक्तींनी आध्यात्मिक भूमिका मांडली की समाजात तिला मान्यता मिळते आणि नंतर समाजाचे शोषण करणारे या भूमिकेच्या आधारे त्यांचा स्वार्थ साधतात; म्हणून राजकारण हे बुद्धिप्रामाण्यवादी भूमिकेवरच आधारलेले असले पाहिजे.' नारायणराव गोरे यांचा हाच दृष्टिकोन असल्यामुळे जयप्रकाश नारायण यांच्या पुस्तकाचा अनुवाद करताना त्यांना समाधान वाटले. जयप्रकाश नारायण यांनी त्यांच्या पुस्तकात आपल्या समाजातील दारिद्य आणि विषमता यांचे भेदक वर्णन केले असून समाजवादी समाजरचनेमुळेच या दारिद्याचे व विषमतेचे निर्मूलन होईल असे आग्रहाने मांडले होते. केवळ राजकीय स्वातंत्र्य पुरेसे नाही, असे वाटणाऱ्या गोरे यांना जयप्रकाश नारायण यांनी सामाजिक न्याय आणि समता यांचे प्रभावीपणे ते समर्थन केले होते, त्यामधून त्यांचेच जणू मनोगत व्यक्त झाल्यासारखे वाटले. जयप्रकाशजी आणि गोरे या दोघांची अशी वैचारिक आणि मानसिक एकरूपता असल्यामुळे 'व्हाय सोशॅलिझम' या पुस्तकाचा गोरे यांनी केलेला 'समाजवादच का?' हा अनुवाद सरस झाला आहे.

१९३५-३६ च्या सुमारास विनायकराव कुलकर्णी, बंडू गोरे, अण्णा साने, गंगाधर ओगले आदी तरुणांच्या गटाला स्वातंत्र्य लढ्याबद्दल आणि समाजवादाबद्दल आकर्षण वाटू लागले होते. ते तरुण स्वाभाविकपणेच एस. एम. जोशी आणि नारायणराव गोरे यांच्या समवेत काम करू लागले. त्यावेळी त्या सर्वांनी प्रथम 'समाजवादच का?' या पुस्तकाचे पाठ्यपुस्तकासारखे वाचन केले. महाराष्ट्रात समाजवादाबद्दल उत्सुकता असणाऱ्या अनेकांनी हे पुस्तक वाचले. पुढे

१९३९-४० साली समाजवादी पक्षातर्फे अभ्यासवर्ग सुरू झाल्यानंतर आचार्य जावडेकरांचे ‘आधुनिक भारत’ आणि गोरे यांनी केलेला जयप्रकाश नारायण यांच्या पुस्तकाचा ‘समाजवादच का?’ हा अनुवाद ही दोन पुस्तके अभ्यासवर्गाला येणारे महाविद्यालयीन विद्यार्थी आणि अन्य तरुण यांना प्रथम वाचावयास दिली जात आणि नंतर या दोन पुस्तकांच्या आधारे गोरे, एस.एम. आणि पां. वा. गाडगीळ हे त्या तरुणांच्या गटाची बौद्धिके घेत असत.

आचार्य जावडेकर हे यावेळी लोकशक्तीचे संपादक होते आणि हरिभाऊ जोशी हे सहसंपादक होते. त्यांच्यासमवेत पां. वा. गाडगीळ, श्रीधर कुलकर्णी आणि एस. आर. देशपांडे हे लोकशक्तीच्या संपादकीय विभागात काम करीत असत. लोकशक्तीचे कार्यालय शनिवार पेठेत बापटवाडीत होते. तेथे गोरे, एस.एम. आणि खाडिलकर सतत येत. लोकशक्ती कार्यालयात या सर्वांच्या राजकीय चर्चा सतत चालत.

य. गो. जोशी यांच्या वादविवेचनमालेत पां. वा. गाडगीळ यांनी लिहिलेली ‘सुलभ समाजवाद’ आणि ‘फॅसिझम’ ही पहिली दोन पुस्तके प्रसिद्ध झाली. या मालेतील तिसरे पुष्प ‘साम्राज्यशाही’ हे नारायणराव गोरे यांनी गुंफले. त्याची प्रथमावृत्ती १९३९ साली प्रसिद्ध झाली. हे पुस्तक नारायणराव गोरे यांनी आचार्य जावडेकरांना अर्पण केले असून अर्पणपत्रिका पुढीलप्रमाणे आहे. ‘ज्यांच्या सहवासामुळे राजकारणाचा शास्त्रीय अभ्यास करण्याची गोडी निर्माण झाली, त्या आचार्य शंकरराव जावडेकरांस समर्पण.’

या पुस्तकाच्या प्रस्तावनेत गोरे यांनी ‘विषयप्रवेश असे या पुस्तकाचे मर्यादित स्वरूप आहे,’ हे स्पष्ट केले असून राडो या लेखकाचे ‘ॲटलस ऑफ टुडे ॲन्ड टुमारो’ हे पुस्तक त्यांना अमूल्य वाटले आणि मराठीत पुस्तक लिहिताना त्याचा अतिशय उपयोग झाला हे ऋण मान्य केले आहे. भारतावर पूर्वी आक्रमणे झाली, तेव्हा बहुतेक सर्व आक्रमक लुटालूट, कत्तली करून परत गेले. बाबराने आपले राज्य येथे स्थापले आणि तो आणि त्याचे वंशज येथेच राहिले. आक्रमकांनी आणि जेत्यांनी जुलूम केला, अत्याचार केले, मात्र भारतातील ग्रामीण समाजरचना पूर्वी होती तशीच राहिली. ब्रिटिश साम्राज्य येथे आल्यावर ही समाजरचनाच त्यांनी उद्ध्वस्त केली. पूर्वी भारतातून कापड निर्यात होत होते; परंतु ब्रिटिशांनी येथील विणकरांचा उद्योग नष्ट करून भारताने इंग्लंडला शेतीतील कापूस हा कच्चा माल पुरवायचा आणि इंग्लंडचे कापड आयात करावयाचे अशी व्यवस्था केली. जंगलाच्या आधारे जगणाऱ्या आदिवासींची जंगलाची मालकीच ब्रिटिशांनी हिसकावून घेतली.

ब्रिटिश राजवटीत येथील कारागीर मजूर बनला. आदिवासी जंगलाचा राजा राहिला नाही; म्हणजे आधुनिक काळातील साम्राज्यशाही पूर्वीच्या आक्रमकांच्यापेक्षा वेगळी, अत्यंत निर्घृण आहे आणि या साम्राज्यामुळे सर्व भारतीय गुलाम बनले आहेत, हे गोरे यांनी 'साम्राज्यशाही' या पुस्तकात स्पष्टपणे मांडले आहे. विषयाचा उपोद्घात केल्यानंतर गोरे यांनी 'साम्राज्याची वाढ', 'साम्राज्य संपादनाचे राजमार्ग' आणि, 'साम्राज्याचे अंतरंग' अशी तीन प्रकरणे लिहिली आहेत. पुस्तकाच्या सुरुवातीस महाभारतातील अवतरण दिले असून त्याचा अर्थ मराठीत दिला आहे. तो पुढीलप्रमाणे, "कुत्री ज्याप्रमाणे एकमेकांचे भक्ष्य ओरबाडून घेतात, त्याप्रमाणे हे लोभी राजे पृथ्वीला ओरबाडीत आहेत. तथापि आतापर्यंत कोणाचीही तृप्ती झालेली नाही." इंग्लंडसारख्या साम्राज्यवादी राष्ट्रांच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेचे स्वरूप स्पष्ट करणारे असेच हे अवतरण आहे. यंत्रयुगापूर्वीची आक्रमणे आणि नवीन साम्राज्यशाह्यांची आक्रमणे यांतील फरक दाखविताना आधुनिक साम्राज्यशाहीमध्ये राजकीय सत्तेचे आक्रमण होत असतानाच त्या सत्तेला पाठिंबा देणाऱ्या भांडवलशाहीने अर्थबळाच्या जोरावर भारतासारख्या जित राष्ट्रातील उद्योग नष्ट करून, शेतीचीही धूळधाण कशी केली, हे. ना. ग. गोरे यांनी स्पष्टपणे मांडले आहे. पुढील वाक्यावरून गोरे यांनी हे विवेचन कसे केले आहे, याची कल्पना येऊ शकेल. "१८व्या शतकात गुलामांच्या व्यापारावर मस्त झालेल्या लिव्हरपूल बंदरातील व्यापाऱ्यांच्या घरावर सोन्याची कौले दिसू लागली... आणि तेथील व्यापाऱ्यांनी प्रचंड प्रमाणात आपल्या पापाची बरोबरी करतील अशी टोलेजंग देवळे (चर्चेस) बांधून ईश्वराला खूष करून टाकले!"

खुल्या व्यापाराचा वरवर सोज्वळ दिसणारा मार्ग ब्रिटिश व्यापाऱ्यांच्या पथ्यावर कसा पडला हेही गोरे यांनी मांडले आहे. या पुस्तकात गोरे यांनी तीन कोष्टके दिले असून जगातील मूठभर साम्राज्यवादी राष्ट्रांनी रशिया आणि आफ्रिका खंडातील किती प्रचंड भूभाग बळकावला, तसेच किती कोटी लोकांना गुलाम करून टाकले आणि लुटालूट व शोषण करून केवढी अवाढव्य संपत्ती मिळविली, हे रेखीवपणे सांगितले आहे. बेल्जिअम या युरोपमधील छोट्या राष्ट्राने आफ्रिकेतील कांगो या देशाचा भूप्रदेश व्यापल्यावर तेथील लोकांना इतक्या निर्दयपणे राबवून घेतले, की कांगोची लोकसंख्या ४ कोटीवरून ८५ लक्षांवर येऊन ठेपली, हे सांगून गोरे यांनी साम्राज्यशाहीच्या भीषण, निर्घृण स्वरूपावर प्रकाश टाकला आहे. 'साम्राज्यशाहीचे अंतरंग' हे या पुस्तकातील प्रकरण अत्यंत भेदक आहे. साम्राज्यशाहीची पुढील व्याख्याही अत्यंत समर्पक आहे; 'स्वतःच्या देशात जो माल खपविता येत नाही,

आणि जे भांडवल साठून राहते, त्याला परदेशातील बाजापेठांच्या द्वारा वाट करून देण्यासाठी मागास अर्थव्यवस्था असलेले देश जिंकून घेणे म्हणजेच साम्राज्यशाही.' लेनिनने साम्राज्यशाहीवरील त्याच्या ग्रंथात साम्राज्यशाहीची जी पाच प्रमुख लक्षणे दिली आहेत, ती गोरे यांनी उद्धृत केली आहेत. त्याचप्रमाणे या साम्राज्यशाह्यांनी वेगवेगळे देश जिंकल्यानंतर पृथ्वीच्या वाटणीबाबत त्यांच्यामध्ये जी स्पर्धा निर्माण होते, त्यातूनच महायुद्ध कसे होते हे गोरे यांनी सुस्पष्टपणे लिहिले आहे. उपसंहारामध्ये गोरे यांनी पुढीलप्रमाणे त्यांचे विचार मांडले आहेत : 'हिंदुस्थानसारख्या साम्राज्यशाहीच्या जबड्यात असणाऱ्यां देशाने ब्रिटिश साम्राज्य आणि जर्मन नात्सीझम् वा इटालियन फॅसिझम यांच्यात सरस-नीरस असे भेद करण्याचे कारण नाही. साम्राज्यशाही हेच या सर्व साम्राज्यवादी राष्ट्रांचे ध्येय आहे आणि युद्ध हेच त्यांच्या हातातील अंतिम आणि सर्वश्रेष्ठ साधन आहे.'

पुस्तकातील विवेचनाच्या अखेरीस 'भारतासारख्या गुलाम राष्ट्रांनी साम्राज्यशाहीशी संघर्ष करून आपले स्वातंत्र्य प्राप्त करून घेतले पाहिजे आणि स्वातंत्र्य मिळाल्यावर साम्राज्यशाहीला कारणीभूत होणारी भांडवलशाही उत्पादनव्यवस्था आपल्या देशातून नष्ट केली पाहिजे', हा विचार मांडून ना. ग. गोरे यांनी 'साम्राज्यशाही' या पुस्तकाचा शेवट केला आहे.

यानंतर नारायणराव गोरे यांनी म. गांधींच्या जीवनावरील राधाकृष्णन् यांनी संपादन केलेल्या या पुस्तकाच्या 'गांधीजींचे विविधदर्शन' असा अनुवाद केला. गांधीजी हे केवळ राजकीय स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व करीत नव्हते. टॉल्स्टॉय, रस्किन आणि थोरो या थोर विचारवंतांच्या विचारांच्या आधारेच त्यांनी त्यांची दक्षिण आफ्रिकेतील मोहिम आणि भारतातील सत्याग्रह संग्राम चालविला, हे सांगणारे लेख या पुस्तकात आहेत. त्याचप्रमाणे अनेक थोर विचारवंतांनी गांधीजींचे व्यक्तिमत्व, सत्याग्रहातील त्यांचे अहिंसेचे आणि निर्भयपणाचे तत्त्वज्ञान, यांवरही भाष्य केले आहे. ना. ग. गोरे यांनी केलेला हा अनुवादही मराठी वाचकांना आवडला.

पां. वा. गाडगीळ हे 'वादविवेचन माले'चे संपादक होते. वादविवेचन मालेसाठी कम्युनिझमवर त्याच विचारसरणीचे कार्यकर्ते कॉ. के. एन. फडके यांना गाडगीळांनी पुस्तक लिहिण्यास सांगितले, परंतु कॉ. फडके यांच्या हातून ते झाले नाही. म्हणून गाडगीळ यांनी हे काम नारायणराव गोरे यांच्यावर सोपविले. गोरे यांनी अत्यंत अभ्यासपूर्वक हे पुस्तक लिहिले. त्यांनी मार्क्स एंगल्स यांनी १८४८मध्ये प्रसिद्ध केलेला कम्युनिस्ट मॅनिफेस्टो, एंगल्स यांनी लिहिलेला 'सोशॅलिझम - सायंटिफिक ॲन्ड युरोपियन' हा ग्रंथ तसेच मार्क्स, लेनिन यांच्या अन्य लेखनाच्या

मुख्यतः आधारे हे पुस्तक लिहिले आहे. कम्युनिझमला मराठी प्रतिशब्द म्हणून 'साम्यवाद' हा शब्द प्रचलीत होत होता. परंतु आचार्य शं. द. जावडेकर यांनी योजलेला 'विश्वकुटुंबवाद' हा शब्द गोरे यांना अधिक अन्वर्थक वाटल्यामुळे त्यांनी पुस्तकाला 'विश्वकुटुंब वाद अर्थात कम्युनिझम्' असे शीर्षक दिले आहे. सुरुवातीस विश्वकुटुंबवादाची परंपरा सांगितल्यानंतर गोरे यांनी 'सन १९४८' हे तिसरे प्रकरण लिहिले आहे. १८३६मध्ये परदेशात राहिलेल्या जर्मन कामगारांनी 'लीग ऑफ दी जस्ट' या नावाची संघटना स्थापन केली. याच संघटनेचे पुढे विश्वकुटुंबवाद्यांच्या संघात रूपांतर झाले. त्यांनी लंडन येथे १८४७ साली त्यांचे पहिले अधिवेशन भरवून मार्क्स आणि एंगल्स या दोघा मित्रांना संघटनेची भूमिका स्पष्ट करणारा एक कार्यक्रम तयार करण्याच्या कामावर नियुक्त केले. त्यांनी जी वैचारिक भूमिका मांडून कार्यक्रम तयार केला, त्याचेच नाव 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो', हा जाहीरनामा १८४८ साली प्रसिद्ध झाला. या जाहीरनाम्यातील सारभूत कल्पना गोरे यांनी एंगल्स यांच्याच शब्दांत दिली आहे. कम्युनिस्ट मॅनिफेस्टोच्या सुरुवातीलाच 'मानवाचा ज्ञात इतिहास हा वर्गयुद्धाचा इतिहास होय,' हा सिद्धांत मांडलेला आहे. मूळ मॅनिफेस्टोतील काही महत्त्वाच्या उताऱ्यांचे भाषांतर देऊन मार्क्स आणि एंगल्स यांच्या या सिद्धांताचा आशय गोरे यांनी स्पष्ट केला आहे. कम्युनिस्ट मॅनिफेस्टोचा शेवट 'सर्व जगातील कामगारांनो, एक व्हा' या घोषवाक्याने केलेला आहे.

कम्युनिस्ट मॅनिफेस्टोचा मुख्य आशय स्पष्ट केल्यानंतर कार्ल-मार्क्सच्या 'कॅपिटल'या ग्रंथाच्या आधारे गोरे यांनी 'अर्थशास्त्रविषयक सिद्धांताचे स्थूल दर्शन' हे प्रकरण लिहिले आहे. या प्रकरणात श्रममूल्याचा जो सिद्धांत मार्क्सने मांडला, त्याचे सुरुवातीस स्पष्टीकरण केले आहे. त्यानंतर उद्योगधंद्यांमध्ये कामगार त्याची श्रमशक्ती मालाकाला विकतो आणि त्यामुळे कच्च्या मालातून पक्क्या मालाचे उत्पादन होते; या प्रक्रियेत मालक कामगाराला त्याने केलेल्या श्रमांचे पूर्ण मूल्य न देता त्याला उपजीविकेसाठी आवश्यक इतकी मजुरी देतो आणि बाकीचा भाग नफा म्हणून स्वतःकडे ठेवतो. म्हणजेच मालक मजुराचे आर्थिक शोषण करतो, हा विचार स्पष्ट केला आहे. मार्क्सने मांडलेल्या या श्रमांच्या अतिरिक्त मूल्याच्या (सरप्लस व्हॅल्यू थिअरीच्या) सिद्धांताचे स्पष्टीकरण गोरे यांनी दिले आहे. 'शासनसंस्था व क्रांती' या पुढील प्रकरणात भांडवलदारी अर्थव्यवस्थेत शासन संस्थेचे स्वरूप कसे असते, यासंबंधी मार्क्सने आणि एंगल्स यांच्या विचारांच्या आधारे लेनिनने शासनसंस्था ही श्रमिकांच्या शोषणाचे साधन कशी असते, हा जो मांडलेला विचार आहे, याचे विवेचन गोरे यांनी केलेले आहे. त्यानंतर क्रांती हे शास्त्र आहे, हा

सिद्धांत मांडून कामगार वर्गाला भांडवलशाही समाजातील शासनसंस्था नष्ट करून सत्ता हाती कशी घ्यावी लागेल, यासंबंधीचे मार्क्स व लेनिन यांचे विचार मांडले आहेत. शेवटी लेनिनने मांडलेल्या राजदंडाच्या लोपाच्या सिद्धांताचे स्वरूप स्पष्ट केले आहे. शेवटचे 'विरोध विकासी भौतिकवाद' हे तत्त्वज्ञानविषयक प्रकरण वाचकाला अवघड वाटेल असे झाले आहे. परंतु परिशिष्ट 'आ' 'मार्क्सकृत समाजविकासाचे भौतिक सूत्र' हे वाचल्यावर मार्क्सच्या तत्त्वज्ञानात्मक भूमिकेतील मुख्य विचार स्पष्ट होतो. त्यापेक्षाही पिरशिष्ट 'अ' 'विश्वकुटुंबाची मूलतत्त्वे' हे फार महत्त्वाचे आहे; कारण एंगल्सच्या या लेखामध्ये त्याने विश्वकुटुंबवाद्यांच्या भूमिकेचे सुगम विवेचन केले आहे. एंगल्सने कम्युनिझमबाबतच्या एकवीस प्रश्नांची जी उत्तरे दिली आहेत, त्यांचे गोरे यांनी अत्यंत सुगम भाषांतर केले आहे.

नारायणराव गोरे यांना विष्णुबुवा ब्रम्हचारी यांची धर्मविषयक मते मान्य नव्हती. परंतु त्यांनी ज्यावेळी विष्णुबुवा ब्रम्हचारी यांचा 'सुखदायक राज्यप्रकरणी' हा निबंध वाचला, तेव्हा त्यातील 'सर्व प्रजा एक कुटुंब' हा विचार त्यांना अत्यंत मौलिक आणि स्वप्नदर्शी वाटला; म्हणूनच नारायणराव गोरे यांनी त्यांचा 'विश्वकुटुंबवाद' हे पुस्तक विष्णुबुवा ब्रम्हचारींना सादर अर्पण केले आहे.

## प्रकरण ३

## स्वातंत्र्यलढ्याचे अखेरचे पर्व

१९३९ साली महायुद्ध सुरू झाले आणि स्वातंत्र्यलढा जवळ येणार हे दिसू लागले. युद्ध सुरू होताच ब्रिटिशांनी भारत त्यांच्या बाजूने युद्धात सामील झाल्याचे जाहीर केले. त्यावेळी सात प्रांतांमध्ये काँग्रेसची मंत्रिमंडळे होती. त्यांना न विचारता हा निर्णय घेण्यात आला, याला तीव्र विरोध दर्शविण्यासाठी काँग्रेसच्या सर्व मंत्रिमंडळानी ताबडतोब राजीनामे दिले. गांधीजींचा अहिंसावादी भूमिकेवरून युद्धाला विरोध होताच. त्याचबरोबर त्यांनी ब्रिटिश जोपर्यंत भारताला स्वातंत्र्य देत नाहीत, तोपर्यंत त्यांना लोकशाहीच्या नावाने युद्ध करण्याचा अधिकार नाही, असे सडेतोडपणे लिहिले आणि युद्धाला अहिंसावादी भूमिकेतून विरोध म्हणून त्यांनी वैयक्तिक सत्याग्रह मोहिम सुरू करण्याचे ठरविले. एस. एम. जोशी यावेळी युद्धविरोधी भाषणाबद्दल तुरुंगात होते. गोरे हे जिल्हा काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी असल्यामुळे त्यांची सत्याग्रही म्हणून निवड झाली. त्याच सुमारास जयप्रकाश नारायण हे अचानक पुण्याला आले आणि नारायणराव गोरे यांच्या घरी गेले. गोरे काहीसे चकित झाले. त्यावेळी दोघांचे दीर्घकाळ बोलणे झाले. जयप्रकाशजी म्हणाले की, युद्धजन्य परिस्थितीत केवळ सत्याग्रहाच्या मार्गाने चळवळ चालविणे पुरेसे नाही. एकीकडे देशव्यापी जनआंदोलन सुरू करून त्याच्या जोडीला भूमिगत चळवळही करावी लागेल. गोरे यांनी जयप्रकाशजींना भूमिगत चळवळीच्या स्वरूपाबद्दल विचारले असता देशातील दळणवळण बंद पाडण्यासाठी, घातपाताचा कार्यक्रम हाती घ्यावा लागेल आणि जेथे आपण सरकारी यंत्रणा खिळखिळी करू, तेथे पर्यायी सरकार, प्रती सरकार, (पॅरलल गव्हर्मेंट) उभे करावे लागेल असे त्यांनी सांगितले. गोरे त्यांना म्हणाले की, महाराष्ट्रातील समाजवादी कार्यकर्ते अशा भूमिगत चळवळीत हिरीरीने भाग घेतील. जयप्रकाशजी गोरे यांना म्हणाले की, पाटण्याला परत गेल्यावर नियोजित चळवळीचा आराखडा तयार करून देशभरातील सोशलिस्ट नेत्यांची त्यावर बैठक घेण्याचे त्यांनी ठरविले आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी जयप्रकाश नारायण पुण्याहून मूंबईस गेले आणि तेथे त्यांना अटक झाली. जयप्रकाशजींच्याबरोबर झालेल्या बोलण्यामुळे गोरे यांच्या मनात एक संदेह निर्माण झाला. वैयक्तिक सत्याग्रहासाठी सत्याग्रही म्हणून निवड झाली होती आणि सत्याग्रह करण्यापूर्वी प्रांतिक कमिटी जे प्रतिज्ञापत्रक करून द्यावे लागे, त्यामध्ये 'माझी अहिंसेवर पूर्ण श्रद्धा आहे,' असे लिहिलेले होते. गोरे हे सत्याग्रह करण्यास

तयार होते, परंतु जयप्रकाशजींना त्यांनी भूमिगत चळवळीबद्दल जे अभिवचन दिले होते, त्यामुळे ‘माझी अहिंसेवर पूर्ण श्रद्धा आहे’ असे प्रतिज्ञापूर्वक लिहून देणे हे अप्रामाणिकपणाचे होईल असे त्यांना वाटले. मनाच्या या अस्वस्थ अवस्थेत गोरे सल्ला घेण्यासाठी आचार्य जावडेकर यांच्याकडे गेले. आचार्य जावडेकर हे थोर गांधीवादी विचारवंत होतेच आणि त्यांचे निष्कलंक चारित्र्य आणि निस्पृह वृत्ती यामुळे गोरे आणि एस. एम. जोशी हे महत्त्वाचे निर्णय घेण्यापूर्वी आचार्य जावडेकरांना सल्ला विचारीत असत. गोरे यांनी प्रांजळपणे आचार्य जावडेकरांना आपल्या मनातील संघर्ष काय आहे, हे सांगितल्यावर आचार्य त्यांना म्हणाले, “नारायणराव, तुमची अहिंसेवर पूर्ण श्रद्धा नसल्यास तुम्ही सत्याग्रहाचे प्रतिज्ञापत्र भरू नये असे मला वाटते. काही पुढारी तुमच्यावर नाराज होतील, परंतु अशा वेळी तुम्ही स्वतःशी प्रतारणा करू नये.” गोरे यांनी आपण प्रतिज्ञापत्र भरू शकत नाही, हा त्यांचा निर्णय प्रांतिक काँग्रेस कमिटीला आणि म. गांधींनाही कळविल्यावर, शंकरराव देव फार रागावले आणि ते गोरे यांना म्हणाले, ‘तुम्ही तुमच्या कर्तव्याचे पालन न करता कारावास चुकवीत आहात.’ गोरे त्यावर काहीच बोलले नाहीत; परंतु कारावास चुकविण्याचा शंकररावांचा आरोप वेगळ्या रीतीने खोटा ठरला. नारायणराव गोरे यांनी गुलबर्गा येथे गणपती उत्सवात जे भाषण केले होते, त्यामध्ये भारतात लवकरच स्वातंत्र्यलढा सुरू होईल आणि त्यावेळी हैद्राबाद संस्थानातील जनतेलाही या लढ्यात भाग घ्यावा लागेल,’ अशा आशयाचे उद्गार काढले होते. गुलबर्गा हे त्यावेळी हैद्राबाद संस्थानात होते. या भाषणानंतर काही दिवसांनी गोरे एका तरुण कार्यकर्त्याबरोबर बुधवार पेठेतून अप्पा बळवंत चौकातून घरी येत असताना एका पोलीस इन्स्पेक्टरने त्यांना थांबविले आणि तो म्हणाला, ‘तुमच्यावर एका भाषणाबद्दल निजाम सरकारने वॉरंट पाठविले असून आम्ही तुम्हांला येथे अटक करीत आहोत. तुम्ही आमच्याबरोबर फरासखान्यात चला.’ वॉरंट पाहिल्यावर गोरे व तो कार्यकर्ता फरासखान्यात गेले. तेथे पोहोचल्यावर गोरे त्या कार्यकर्त्याला म्हणाले, ‘तू घरी जा आणि सुमतीबाईंना आणि शुभाला घेऊन ये. बरोबर माझे कपडे आणि एक पांघरूण घेऊन ये.’ त्याप्रमाणे प्रधान गोऱ्यांच्या घरी जाऊन सुमतीबाई आणि शुभाला टांग्यातून घेऊन आला. गोरे सुमतीबाईंना म्हणाले, ‘तू काळजी करू नकोस. अद्याप खटला चालून शिक्षा व्हायची आहे.’ हा १९४०मधील डिसेंबर महिना होता. पुढे खटला चालून गोऱ्यांना १९४१च्या एप्रिल महिन्यात एक वर्षांची शिक्षा झाली आणि त्यांना गुलबर्गा तुरुंगातच ठेवण्यात आले. १९३० आणि ३२ साली कारावासात त्यांच्यासमवेत त्यांचे मित्र होते. गुलबर्गाला

दुसरा कोणीही राजकीय कैदी नव्हता. गोरे यांच्या खोलीत माधवराव म्हणून जन्मठेपेची शिक्षा झालेला म्हातारा कैदी होता. आवारात भेटणारे सर्वजण फौजदारी गुन्ह्याबद्दल शिक्षा भोगणारे गुन्हेगार कैदी होते. सुमतीबाई मधूनमधून भेटायला येत त्यावेळी काही पुस्तके घेऊन येत. तुरुंगात गोरे नियमाने डायरी लिहीत असत. हीच डायरी पुढे 'कारागृहाच्या भिंती' या शीर्षकाखाली प्रसिद्ध झाली. नारायणराव गोरे यांच्या या पुस्तकाचे वाचकांनी स्वागत केले. ललित लेखनाचे गोरे यांचे हे पहिलेच पुस्तक. तुरुंगात असताना बाहेरच्या जगातील काही दिसत नसले तरी आकाश, त्यातील ग्रह आणि तारे दिसले तरी मनाला कशी प्रसन्नाता वाटते, हे गोरे यांनी लिहिले आहे. बरोबरीच्या एका कैद्याचे व्यक्तिचित्रही चित्तवेधक आहे. या पुस्तकात गोरे यांच्या मनाचा खंबीरपणा आणि चिंतनशीलता यांचा उत्कटतेने प्रत्यय येतो. गोरे यांच्या या आत्मकथनपर निवेदनात कोठेही भावुकता नाही. त्याचप्रमाणे कोठे कृत्रिमताही नाही. तुरुंगातल्या एकाकी जीवनात विशेषतः रात्री कोठडीत बंद केल्यानंतर मनात येणारे विचार, मनात होणारा भावनांचा कल्लोळ, गोरे यांनी प्रांजळपणे व्यक्त केला आहे. गुलबर्गा तुरुंगात भेटलेल्या काही गुन्हेगार कैद्यांच्या मानसिक अवस्थेचेही चित्रण गोरे यांनी 'कारागृहाच्या भिंती'मध्ये केले आहे. या आत्मनिवेदनात्मक पुस्तकातील भावनांची आणि विचारांची गुंफण हृद्य आहे. एका ठिकाणी गोरे यांनी लिहिले आहे. 'सुमतीच्या पत्रात चिमुरड्या शुभानेही आपला मजकूर लिहिला आहे. मजकूर म्हणजे काय, तर पंचवीस-तीस रेघोट्या. तिचे हे पत्र मात्र येथील अधिकारी सेन्सॉर करू शकले नाहीत.'

गोरे गुलबर्गा तुरुंगात असताना भारतात गांधीजींनी ब्रिटिश साम्राज्यवाद्यांना 'चले जाव' असा आदेश दिला. ८ ऑगस्ट १९२४ला 'चले जाव' ठराव मुंबईला गोवालिया टँकवर भरलेल्या अधिवेशनात पास झाला. त्या रात्रीच म.गांधी, पं.नेहरू आदी नेत्यांना अटक झाली आणि देशव्यापी स्वातंत्र्यलढा सुरू झाला. वर्तमानपत्रातून या बातम्या वाचताना गोरे यांच्या मनाची तडफड होत होती. सप्टेंबर महिन्यात सुमतीबाई भेटायला येऊन गेल्या, तेव्हा गोरे यांना हेही समजले की अच्युतराव पटवर्धन, एस. एम. जोशी, डॉ. लोहिया आदी त्यांचे मित्र भूमिगत झाले असून देशभर भूमिगत चळवळ चालली आहे; परंतु ते असहायपणे हे सारे ऐकत होते. अखेर डिसेंबर महिन्यात त्यांच्या सुटकेचा दिवस आला. पुण्याच्या पोलिसांना ती तारीख माहीत होती. गुलबर्गा तुरुंगातून सुटल्यावर ते रेल्वेने पुण्याकडे यावयास निघतील तेव्हा त्यांना सोलापूरला अटक करावयाची, अशी योजना पोलीस अधिकाऱ्यांनी केली होती. परंतु गोरे सकाळी साडेसातला सुटताच जेलच्या दारावर

आलेल्या सोलापूरच्या बाबा कुसुकरने त्यांना पटकन टांग्यातून एका मुसलमान मित्राकडे नेले. तेथे आंघोळ, जेवण केल्यावर सर्व्हिस मोटारने ते आळंदमार्गे बिदरकडे गेले आणि तेथून नांदेडला जाऊन रेल्वेने मनमाडला आले. मनमाडला नाशिकचा एक कार्यकर्ता आला होता. त्याने गोरे यांना मुंबईकडे जाणाऱ्या मेलमध्ये दादरचे तिकिट काढून बसवले आणि दादरला तुम्हांला कोणीतरी पहिल्या प्लॅटफॉर्मवरील बुकस्टॉलजवळ भेटेल, असे सांगितले.

प्रवासाने गोरे थकून गेले होते. दादरला कार्यकर्ता ठरल्याप्रमाणे आला होता. दादरहून बॉंबे सेंट्रलला जाऊन तो त्यांना ताडदेवला घेऊन गेला. ताडदेवला एस. एम. जोशी, साने गुरुजी, शिरुभाऊ लिमये आदी नेते गुप्तपणे ज्या जागी राहात तेथे रात्री ९ वाजता गोरे जाऊन पोहोचले. शिरुभाऊंनी दार उघडले आणि दोघा मित्रांनी एकमेकांना मिठीच मारली. एस.एम. गोऱ्यांना म्हणाले, 'तू सुटल्याचे कळले; पण येथे कसा पोचणार, याची आम्हांला कल्पना नव्हती', एस.एम.ची दाढी पाहून गोरे हसायला लागले आणि म्हणाले, 'आता शिरू, तू काय सोंग घ्यायला लावशील, ते घेतले पाहिजे मला.' साने गुरुजी म्हणाले, 'ते तर कराल, पण आधी दोन घास खाऊन घ्या.' भूमिगतांच्या त्या जागेला शिरुभाऊ लिमये यांनी 'मूषक महाल' असे नाव दिले होते. गोरे जेवण करून मित्रांच्या कोंडाळ्यात बसल्यावर शिरूभाऊ म्हणाले, 'आपल्या मूषक महालात आणखी एक उंदीर आज आला.' वर्तमानपत्रात 'ना. ग. गोरे यांची गुलबर्गा तुरुंगातून सुटका झाल्यावर ते पोलिसांच्या हातावर तुरी देऊन निसटले आणि भूमिगत झाले.' ही बातमी आल्यावर येरवडा जेलमधील आम्हां अनेक राजबंद्यांना फार अभिमान वाटला. नारायणरावांचे वडील अण्णा सुमतीबाईंना म्हणाले, 'नानू येथे येणार आणि रावसाहेब पटवर्धनांप्रमाणे पोलीस त्याला लगेत पकडून नेणार, असे मला वाटत होते. पण नानूने चांगली शिताफी लढवली.' सुमतीबाईंना मात्र भविष्यात आपल्यापुढे काय वाढून ठेवले आहे, याची कल्पना करवत नव्हती.

भूमिगत असताना नारायणराव गोरे आणि एस. एम. जोशी गुप्तपणे दिल्लीला गेले. तेथे जयप्रकाशजींबरोबर त्यांची भेट झाली. महाराष्ट्रात सातारा जिल्ह्यामध्ये सांगली, वाळवा, कराड या भागात नाना पाटील आणि त्यांचे सहकारी यांनी ब्रिटिश सरकारबरोबर गनिमी काव्याने झुंज देऊन स्थापन केलेल्या प्रती सरकारची तपशीलवार माहिती एस. एम. जोशी यांनी जयप्रकाशजींना दिली. नंतर झालेल्या भूमिगत नेत्यांच्या बैठकीत देशातील वेगवेगळ्या भागांत जाऊन आलेल्या नेत्यांनी तेथील भूमिगत चळवळींचे जे वृत्त सांगितले, त्यावरून बहुतेक ठिकाणी कार्यकर्ते

पकडले गेल्यामुळे चळवळ मंदावत चालली होती हे स्पष्ट झाले. बैठकीत काहीसा निराशेचा सूर उमटत असताना जयप्रकाश नारायण म्हणाले, ‘सुभाषचंद्र बोस जर्मनीहून पाणबुडीने जपानला पोहोचले आणि त्यांनी रंगूनमध्ये आझाद हिंद सरकार स्थापन केले असून आझाद हिंद सेना उभारली आहे. सुभाषबाबूंची आझाद हिंद सेना जेव्हा भारताच्या भूमीवर पाय ठेवील त्यावेळी प्रथम ईशान्येकडील भागात आणि नंतर देशभर उठाव होऊ शकेल. सुभाषबाबूंना भेटण्यासाठी मणिपूरमार्गे ब्रम्हदेशात जाण्याचा मी प्रयत्न करणार आहे.’ जयप्रकाशजींच्याकडून मिळालेल्या या वार्तेमुळे एस. एम. जोशी आणि गोरे उत्साहाने मुंबईत परत आले. परंतु पुढे काही दिवसांनी पोलिसांना मुंबईतील ताडदेव भागातील मूषक महाल या जागेचा पत्ता लागला आणि एक दिवस सकाळी अचानक सर्वजण बेसावध असताना पोलिसांनी तेथे धाड घातली. नारायणराव गोरे, एस. एम. जोशी, शिरुभाऊ लिमये, साने गुरुजी हे प्रमुख नेते बाहेर पडण्याच्या तयारीत होते. शिरुभाऊंचा धाकटा भाऊ माधव बाहेरून येत असताना पोलिसांना पाहताच तो चटकन तोंड फिरवून पळू लागला परंतु पोलिसांनी त्याला पकडून मूषक महालात आणले. सर्वांना प्रथम आर्थर रोड तुरुंगात नेले. काही दिवस पोलिसांनी कसून चौकशी केली; परंतु हे सारेच खंबीर होते. शिरुभाऊ लिमये पोलिसांना कॅपिटॉल बाँबकेस संदर्भात हवे होते. त्यांना पुण्याला पाठवून नंतर येरवडा तुरुंगात ज्या वॉर्डाला फाशीची शिक्षा झालेले कैदी ठेवतात त्या ‘फाशी गेट’ या वॉर्डात ठेवण्यात आले. सानेगुरुजींना येरवडा तुरुंगात पाठवण्यात आले. नारायणराव गोरे बरेच दिवस आर्थर रोड तुरुंगात होते. त्यांना काही दिवस भायखळा जेलमध्ये ठेवण्यात आले. काही महिन्यांनी १९४२च्या स्वातंत्र्य आंदोलनातील भूमिगत चळवळ चालविणारे सर्व प्रमुख नेते आणि कार्यकर्ते यांना पुण्याला येरवड्यात आणण्यात आले. सरकारने या सर्वांवर ‘महाराष्ट्र कटाचा खटला’ भरला. या कटात ४०जणांना आरोपी करण्याचे सरकारने ठरविले. त्यांमध्ये एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, शिरुभाऊ लिमये, अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे हे नेते तसेच कॅपिटॉल बाँब खटल्यातील बापू साळवी, बाबूराव चव्हाण, रामसिंग परदेशी, एस. टी. कुलकर्णी हे प्रमुख आरोपी आणि अन्य काही कार्यकर्ते होते. इंदूरचे वसंत सरवटे, पुण्याचे विठ्ठल पटवर्धन आदी सात जणांना फरारी घोषित करण्यात आले. यानंतर चौकशी करूनही पुरेसा पुरावा न मिळाल्यामुळे सरकारने महाराष्ट्र कटाचा खटला करण्याचा बेत रद्द केला आणि ‘कॅपिटॉल बाँब केस’ खटला मात्र दाखल केला. प्रथम माफीचे साक्षीदार झालेल्या कार्यकर्त्यांनी सेशन्स कोर्टात आपल्या पूर्वीच्या जबान्या फिरविल्या. प्रत्यक्ष घटना

पाहिलेला कोणी साक्षीदार नसल्यामुळे सर्व आरोपी निर्दोष सुटले. त्यानंतर सरकारने ज्यांच्यावर महाराष्ट्र कटाचा खटला भरावयाचे ठरविले होते, त्यांना आणि कॅपिटॉल बॉंब केसमधील सर्वांना येरवड्यात स्थानबद्ध करून ठेवले. १९४६च्या सुरुवातीस या सर्व आरोपींची सुटका झाली.

१९४०च्या डिसेंबर महिन्यात नारायणराव गोरे यांना रस्त्यातच वॉरंट दाखवून अटक झाली होती. ते पाच वर्षांनी घरी आले. गोरे आणि एस. एम. यांची १९३० पासून सुरू झालेली जेलयात्रा अखेर संपली. कारण ब्रिटिश सरकारने भारत सोडून परत जाण्याचा निर्णय घेतला होता.

स्वातंत्र्य लढ्याच्या संदर्भात नानासाहेब गोरे यांनी पुढील आशयाचे विचार एका लेखात मांडले होते...

'१९२६ साली यूथ लीगच्या स्थापनेत मी पुढाकार घेतला आणि १९३०, १९३२ आणि १९४२ या तीन स्वातंत्र्य आंदोलनांमध्ये मी हिरीरीने भाग घेतला. १९३० आणि ३२ सालातील सत्याग्रह चळवळ ही अहिंसक होती. १९४२ साली भूमिगत चळवळ चालविताना आम्ही मुनष्यहानी शक्य तो होऊ नये, अशी काळजी घेतली; तरी आमचे आंदोलन अहिंसक होते असे म्हणता येणार नाही. म.गांधींनी १९३० व १९३२ साली देशव्यापी जनआंदोलनेही अहिंसेच्या मार्गाने केली हे खरे असले आणि कॉँग्रेसने स्वातंत्र्य चळवळ शांततेच्या मार्गाने होईल, असे जाहीर केले असले, तरी अहिंसा हे तत्त्वज्ञान म्हणून गांधीजींनी जसे स्वीकारले होते, तसे कॉँग्रेसने स्वीकारले नव्हते. १९४२च्या चळवळीपूर्वी एका अमेरिकन पत्रकाराने म.गांधींना ही चळवळ अहिंसक मार्गाने होईल का, असा प्रश्न विचारला त्यावेळी गांधीजींनी उत्तर दिले की, स्वातंत्र्यसंग्राम अहिंसक मार्गाने व्हावा अशी त्यांची इच्छा असली तरी ब्रिटिशांना येथून घालविण्यासाठी लढा सुरू करण्याचा त्यांनी निर्णय घेतला असून ते थांबण्यास तयार नाहीत. याचा अर्थ या लढ्यात काही हिंसाचार होईल, याची गांधीजींना कल्पना असावी.

स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारकांनी जो त्याग व बलिदान केले, त्यामुळे अनेकांच्या मनात देशभक्तीची ज्योत प्रज्वलीत झाली. स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतीकारकांच्या कार्याबद्दल आणि त्यागाबद्दल माझ्या मनात नितांत आदर आहे. स्वातंत्र्यलढ्याच्या अखेरच्या पर्वात सुभाषचंद्र बोस यांनी एका वेळी ब्रिटिश सेनेत असलेल्या जवानांना आणि अधिकाऱ्यांना आझाद हिंद सेनेत आणून ब्रिटिश साम्राज्याला जबरदस्त धक्का दिला. १९४६चे नाविक बंड हा आझाद हिंद सेनेचाच पुढचा अध्याय होता.

स्वातंत्र्यासाठी सुरूवातीच्या काळात नेमस्त पुढाऱ्यांनी केलेले कार्य, लो. टिळकांनी निर्भयतेने कारावास भोगतानाच स्वराज्य हा जन्मसिद्ध हक्क आहे की लोकांमध्ये निर्माण केलेली जाणीव, म. गांधींच्या नेतृत्वाखालची १९२०, ३०, ३२ आणि १९४२ सालातील जनआंदोलने, १८५७ च्या पहिल्या स्वातंत्र्य युद्धापासून आणि आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडक्यांपासून ते सुभाषबाबूंनी उभारलेल्या आझाद हिंद सेनेपर्यंतचे सशस्त्र क्रांतीचे प्रयत्न - या सर्व संग्रामांमुळे भारताला स्वातंत्र्य मिळाले. या लढ्यात मला भाग घेता आला, हे मी माझे परमभाग्य मानतो.'

स्वातंत्र्य लढ्याबद्दल लिहिताना व बोलताना नारायणराव गोरे यांच्या लेखणीला व वाणीला स्फुरण चढत असे. परंतु स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच्या १९४६ ते ४७ या काळातील वाटाघाटीच्या काळात जे घडले त्याबद्दल त्यांचे मन अत्यंत विषण्ण होते. देशभर झालेले हिंदू-मुसलमानांचे दंगे, नोआखालीचे भीषण हत्याकांड या पार्श्वभूमीवर चाललेल्या राजकीय वाटाघाटींमध्ये मुस्लिम लीगचे नेते बॅ. जिना यांनी अत्यंत आठमुठी भूमिका घेतली आणि साम्राज्यवाद्यांनी त्यांना सतत पाठबळ दिले. यामुळे काँग्रेसच्या नेत्यांनी अखेर भारताची फाळणी मान्य केली. जयप्रकाश नारायण यांनी फाळणीला काँग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकीत विरोध केला. परंतु यापलीकडे जयप्रकाशजी आणि त्यांचा काँग्रेस समाजवादी पक्ष काही करू शकला नाही. हिंदू महासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि अन्य हिंदुत्ववादी गटांनी गांधीजीं आणि काँग्रेसवर टीकास्त्र सोडले, परंतु तेही फाळणीच्या विरोधात प्रत्यक्षात काही करू शकले नाहीत. नारायणराव गोरे यांनी या संदर्भात एका लेखामध्ये लिहिले आहे, 'स्वातंत्र्यलढ्यात तुरुंगवास भोगताना मनाला जी उभारी, उत्साह वाटत होता तो उत्साह, १९४५ नंतरच्या राजकीय वाटाघाटी आणि अखेर झालेला देशाच्या फाळणीचा निर्णय यामुळे पार ओसरून गेला. फाळणीच्या दिवसात पंजाब आणि बंगालमध्ये जे हत्याकांड झाले, ते माणुसकीला काळिमा आणणारे होते. हे सर्व घडताना आपण हे टाळण्यासाठी काही करू शकत नाही, ही असहायता मला शरमिंदी करीत होती. कालचक्र वेगाने फिरत होते. अनेकांचे बळी जात होते आणि मी भकास नजरेने हे सारे पाहणारा प्रेक्षक होतो. हा माझ्या जीवनातील अत्यंत दाहक अनुभव होता.' अखेर १५ ऑगस्ट १९४७ ला गुलामीच्या श्रृंखला तुटल्या आणि भारत स्वतंत्र झाला.

## प्रकरण ४

## संपादक आणि गोवा सत्याग्रही

स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी समाजवादी पक्ष काँग्रेसमध्ये राहून १९४२च्या स्वातंत्र्य संग्रामात धडाडीने लढला. त्यावेळी काँग्रेस हे देशव्यापी व्यासपीठ होते. या व्यासपीठावर विविध मतांचे, वेगवेगळे हितसंबंध असलेले पक्ष, संघटना, व्यक्ती एकत्र येऊ शकत होत्या. परंतु स्वातंत्र्य प्राप्तीनंतर काँग्रेसने पक्षाची घटना बदलून काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत अन्य पक्षाचे अस्तित्व असणार नाही, अशी तरतूद केली. म्हणजेच यापुढे काँग्रेस समाजवादी पक्षाला स्वतंत्र अस्तित्व ठेवता येणार नाही, हे स्पष्ट झाले. या परिस्थितीत काय करावयाचे यासंबंधी काँग्रेस समाजवादी पक्षाच्या कार्यकारिणीत आणि देशातील समाजवादी कार्यकर्त्यांमध्ये चर्चा झाली. अखेर काँग्रेसमधून बाहेर पडून स्वतंत्रपणे राजकीय कार्य करण्याचा आणि जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी व मार्गांसाठी काम करण्याचा निर्णय समाजवादी पक्षाने घेतला. १९४८ साली नाशिक येथे समाजवादी पक्षाचे अखिल भारतीय अधिवेशन भरले आणि त्या अधिवेशनात काँग्रेसमधून बाहेर पडण्याचा ठराव सर्वांच्या संमतीने मंजूर करण्यात आला. ज्यांना हा निर्णय मान्य नव्हता, असे संपूर्णानंदांच्यासारखे नेते या अधिवेशनास आलेच नाहीत. जयप्रकाश नारायण हे सोशलिस्ट पार्टीचे सरचिटणीस झाले. विभागीय चिटणीसांमध्ये नारायणराव गोरे यांची पश्चिम विभागासाठी नियुक्ती करण्यात आली. १९४६ पासून 'उषा' हे साप्ताहिक समाजवादी चालवीत. १९४७च्या १५ ऑगस्टपासून समाजवादी पक्षाच्या महाराष्ट्र शाखेने 'जनवाणी' हे मराठी साप्ताहिक सुरू केले. ना. ग. गोरे हे त्याचे संपादक होते आणि मा. ग. बुद्धिसागर हे सहसंपादक होते. त्याचवेळी समाजवादी विचारांचे 'जनता' हे साप्ताहिक मुंबईमधून रोहित दवे यांच्या संपादकत्वाखाली प्रसिद्ध होऊ लागले. १९४८ साली काँग्रेसमधून बाहेर पडून समाजवादी पक्ष स्वतंत्रपणे काम करू लागल्यावर 'जनता' हे इंग्रजी साप्ताहिक पक्षाचे अधिकृत मुखपत्र म्हणून प्रसिद्ध होऊ लागले. जनता साप्ताहिकात जयप्रकाश नारायण यांनी 'माय पिक्चर ऑफ सोशॅलिझम' या शीर्षकाखाली चार विस्तृत लेख लिहिले. या लेखांमध्ये जयप्रकाश नारायण यांनी समाजावादाचा आर्थिक आशय स्पष्ट करतानाच, समाजवादाच्या नैतिक भूमिकेचीही चर्चा केली असून साधनशुचितेचा विचार स्पष्टपणे मांडला आहे. 'जनवाणी'मध्ये या चार लेखांचे मराठी भाषांतर प्रसिद्ध करण्यात आले.

१९४२च्या स्वातंत्र्यलढ्यात समाजवादी नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी भूमिगत

चळवळीत केलेल्या कामामुळे तरुणांना स्वाभाविकपणेच या नेत्यांबद्दल व कार्यकर्त्यांबद्दल आदर आणि प्रेम वाटत होते. राष्ट्र सेवादलातीलही अनेक कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात धडाडीने काम केले होते. १९४२ साली जे विद्यार्थी हायस्कूलमध्ये शिकत होते, त्यांना त्यावेळी लहान वयामुळे चळवळीत प्रत्यक्ष काम करणे शक्य नव्हते. तरी त्यांना स्वातंत्र्य चळवळीबद्दल, म. गांधी, पं. नेहरू, सुभाषचंद्र बोस आदी नेत्यांबद्दल आकर्षण वाटत होते. १९४६ साली यातील बरेच विद्यार्थी महाविद्यालयांमध्ये शिकत होते. तेही राष्ट्र सेवादल आणि समाजवादी पक्ष याकडे आकृष्ट झाले. एस. एम. जोशी हे सेवादलाचे प्रमुख होते. त्यांच्या नेतृत्वाखाली सातारा येथे फेब्रुवारी १९४७ साली राष्ट्र सेवादलाच्या दहा हजाराहून अधिक सैनिकांचा मेळावा भरला होता. ना. ग. गोरे, शिरुभाऊ लिमये, अच्युतराव पटवर्धन आदी समाजवादी नेतेही या मेळाव्याला हजर होते. मेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून आझाद हिंद सेनेतील कॅप्टन शहानवाज हे आले होते. सेवादलातील या सैनिकांचे राजकीय शिक्षण करून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आता नवसमाजनिर्मितीचे कार्य कसे करावयाचे, यासंबंधी त्यांना मार्गदर्शन करावयाचे असे राष्ट्र सेवादलाने आणि समाजवादी पक्षानेही ठरविले. एस. एम. जोशी, साने गुरुजी, नानासाहेब गोरे आदींनी यासाठी अनेक शिबिरांतून बौद्धिके घेतली. हे नेते महाराष्ट्रभर सतत संचार करीत होते आणि तरुण त्यांचे विचार ऐकण्यास उत्सुक होते. साने गुरुजींनी पंढरपूरचे मंदिर हरिजनांना खुले व्हावे, हा विचार मांडण्यासाठी सेनापती बापट यांच्यासमवेत एक वर्षभर महाराष्ट्राचा दौरा केला या आणि नंतर पंढरपूर येथे उपोषणही केले. त्याचा फार मोठा परिणाम तरुणांच्या मनावर झाला. या सुमारास अन्य जटिल प्रश्न उपस्थित झाले की समाजवादी पक्ष त्यांच्यावर खंबीर भूमिका घेऊन सत्याग्रह करीत असे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी संस्थाने भारतात विलीन झाली. त्यांचे प्रतिनिधी लोकसभेवर व विधानसभेत नियुक्त करण्यात आले. त्यांच्यापैकी बहुसंख्य प्रतिनिधी पूर्वीच्या संस्थानांमध्ये अधिकाराच्या जागांवर होते. समाजवादी पक्षाने याला विरोध केला आणि या प्रतिनिधींची लोकशाही पद्धतीने निवडणूक व्हावी या मागणीसाठी सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे नारायणराव गोरे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील संस्थानातून आलेल्या तीस तरुण कार्यकर्त्यांनी पुण्यामध्ये सत्याग्रह केला आणि त्यांना दोन महिन्यांची शिक्षा झाली. जेलमध्ये नारायणराव गोरे, वरचा वर्ग न स्वीकारता, या कार्यकर्त्यांच्यासमवेत राहिले. त्यांनी या कार्यकर्त्यांची तुरुंगात बौद्धिके घेतली, त्यांच्याकडून ‘आधुनिक भारत’सारख्या ग्रंथांचे वाचनही करून घेतले. यावेळी गोरे यांच्यासमवेत असलेले सावंतवाडीचे

तरुण कार्यकर्ते जयानंद मठकर यांनी एका लेखात लिहिले आहे, 'मी सत्याग्रह केला, त्यावेळी केवळ एक उत्साही तरुण होतो. परंतु गोरे यांनी जे आमचे सर्वतरुण कार्यकर्त्यांचे शिक्षण केले. त्यामुळे माझ्या विचारांना दिशा मिळाली आणि मी पुढे आयुष्यभर समाजवादी पक्षात कार्य केले.' गोरे हे उत्तम शिक्षक होते. ते या तरुण कार्यकर्त्यांना टिपणे कशी करावयाची हेही शिकवीत. गोरे यांना त्यांचे समकालीन 'नारायणराव' अशी हाक मारीत. परंतु हे तरुण कार्यकर्ते त्यांना 'नानसाहेब' म्हणू लागले आणि पुढे त्यांचे तेच नाव समाजवादी पक्षात, सेवादलात आणि समाजातही रूढ झाले. राष्ट्र सेवादलातील तरुण कार्यकर्ते एस. एम. जोशींना 'अण्णा' आणि गोरे यांना 'नानसाहेब' म्हणून संबोधू लागले. हे दोघेही नेते आणि साने गुरुजी यांनी १९४६ ते १९५१ या पाच वर्षांमध्ये भाषणे, बौद्धिक, चर्चासत्रे यांच्याद्वारा जे प्रबोधन केले आणि आर्थिक व सामाजिक समतेचे जे विचार समर्थपणे मांडले त्यांचा फार मोठा संस्कार महाराष्ट्रातील तरुण कार्यकर्त्यांवर झाला. सेवादलाच्या प्रांतिक शिबिरांमध्ये आचार्य भागवत, आचार्य जावडेकर, पां. वा. गाडगीळ आदींचीही बौद्धिके होत. समाजवादी पक्षातील तरुण कार्यकर्त्यांपैकी बंडू गोरे आणि मधु लिमये यांनीही समाजवादी विचारांचा संस्कार तरुणांच्या मनावर करण्यात आणि तरुण कार्यकर्त्यांची शिबिरे घेण्यात फार मोठा पुढाकार घेतला. बंडू गोरे यांच्याभोवती मुंबईच्या उपनगरातील जे तरुण विद्यार्थी-विद्यार्थीनी गोळा झाले होते. त्यांना बंडू गोरे व मधु लिमये यांनी समाजवाद, लोकशाही हे विचार सांगतानाच, भारतीय समाजजीवन आमूलाग्र बदलण्यासाठी संघर्ष कसा करावा लागेल, याचाही दृष्टिकोन दिला.

'जनवाणी' साप्ताहिकातील नानासाहेब गोरे यांचे अग्रलेख मार्मिक आणि प्रभावी असत. कोयना प्रकल्पाच्या समर्थनार्थ हेळवाक येथे शंकरराव किर्लोस्कर यांच्या पुढाकाराने एक परिषद भरली होती. त्यावेळी कोयना प्रकल्पाच्या भावी स्वरूपाबद्दल नानासाहेब गोरे यांनी जनवाणीत लिहिलेल्या अग्रलेखाची आचार्य अत्रे यांनी मुक्तकंठाने स्तुती केली. म. गांधींच्या हत्येनंतर नानासाहेब गोरे यांनी महाराष्ट्रात हिदुंत्ववाद्यांनी केलेला विषारी प्रचार आणि त्याविरुद्ध बहुजन समाजाची झालेली तीव्र प्रतिक्रिया यावर जो अग्रलेख लिहिला त्यामुळे हिंदुत्ववादी त्यांच्यावर अतिशय संतप्त झाले. नानासाहेबांनी हे टीकेचे आघात धैर्याने सहन केले.

याच सुमारास नानासाहेबांचे चुलतभाऊ आणि धडाडीचे समाजवादी कार्यकर्ते बंडू गोरे यांनी 'रचना' हे मासिक सुरू केले. या मासिकात नानासाहेब नियमाने ललित लेखन करीत आणि वैचारिक लेखही लिहीत. कोकणातील हिंदळे या

गावातील समाजरचनेचे जे चित्र गोरे यांनी एका लेखात रेखाटले होते ते प्रातिनिधीकच होते. या लेखात गोरे यांनी हिंदळे गावात जातिव्यवस्थेप्रमाणे वेगवेगळ्या आळ्या (वस्त्या) कशा होत्या. पाण्याची व्यवस्थाही उच्च-नीच भाव राखूनच कशी केली होती, ब्राह्मण कुटुंबे वरच्या बाजूस, त्यांच्या खाली गावातील शेतकरी आणि सुतार, लोहार आदी बलुतेदार जातींची कुटुंबे आणि अगदी खालच्या बाजूस बौद्ध, मातंग कुटुंबे अशा रीतीने पाणी वापरीत असत, हे सांगून ग्रामीण भागातील सामाजिक विषमतेचे वास्तवदर्शन या लेखात घडविले होते. त्या वेळी मुंबई झोपडपट्ट्या नुकत्याच उभ्या राहू लागल्या होत्या. त्यांच्यावर नानासाहेब गोरे यांनी 'वस्ती नंबर अकरा' हा कठोर वास्तवाचे चित्रण करणारा लेख लिहिला. त्या बकाल वस्तीमध्ये अठरा पगड समाजातील माणसे एकत्र कशी राहात होती, अस्तित्वासाठी धडपड करताना त्यांचे जीवन कसे उग्र, काही वेळा आक्रमक बनत होते, त्या वस्तीमध्ये भीषण अस्वच्छ परिसरातही माणसे एकत्र कशी जगत होती, येथील संमिश्र भाषा आणि सहज येणाऱ्या शिव्या यांचा कोलाहल कसा चालू असे, येथील नीती-अनीतीचे संकेतही किती वेगळे होते, आदींचे भेदक वर्णन या लेखात गोरे यांनी केले होते.

'रचना' मासिकात नानासाहेबांनी कथा लेखन करण्यास सुरुवात केली. या कथा आणि काही ललित लेख पुढे 'सीतेचे पोहे' या कथासंग्रहात आणि 'डाली' या ललित लेखांच्या संग्रहात प्रसिद्ध झाले; आणि नानासाहेब गोरे यांना ललित लेखक म्हणून मान्यता मिळाली. वि. द. घाटे यांच्यासारख्या थोर लेखकांनी नानासाहेब गोरे यांच्या शैलीबद्दल व स्वभावलेखनाबद्दल प्रशंसोद्गार काढले. माणसांच्या स्वभावातील विविध छटांचे अत्यंत सूक्ष्म निरीक्षण गोरे यांनी केले होते आणि कथेत रंगवलेल्या प्रसंगातून मानवी मनातील वेगवेगळ्या भाव-भावनांचा उत्कट आणि काही वेळा अनोखा आविष्कार ते घडवीत असत. 'कातळातील झरा' या सुंदर कथेत कोकणातल्या एका ओबडधोबड राठ माणसाच्या मनात दडलेल्या आणि एका दुर्दैवी मुलीच्या मृत्यूमुळे हेलावलेल्या भावनांचे वर्णन नानासाहेबांनी विलक्षण तरलपणे केले आहे. त्याचबरोबर नेहमी प्रेमळपणे वागणारी माणसे काही क्षणी किती हिंस्त्र बनतात हेही नानासाहेबांनी पाहिले होते. फाळणीच्या काळातील दिल्लीतील दंगलीतील एका भीषण घटनेचे दाहक वर्णन त्यांनी 'चुळकाभर पाणी, चुळकाभर रक्त' या कथेत केले होते. 'उसासा' ही कथा नानासाहेब गोरे यांनी स्वातंत्र्य चळवळीतील त्यांच्या एका निकटच्या सहकारी मित्राच्या मृत्युनंतर लिहिली. या अत्यंत ध्येयवादी आणि त्यागी कार्यकर्त्याकडून त्याच्या पत्नीची जी उपेक्षा झाली

आणि त्यामुळे तिच्या भावनांचा जो चोळामोळा झाला ते सारे नानासाहेबांनी पाहिले होते. या कार्यकर्त्यांच्या अकाली मृत्युनंतर त्याच्या पत्नीच्या मनात उठलेल्या भावनांच्या कल्लोळाचे वर्णन 'उसासा' या कथेत आहे. पतीला सर्वस्व अर्पण केल्यावरही त्याने पाठ फिरविल्यामुळे उद्ध्वस्त झालेल्या या अभागिनीच्या मनोभंगाचे हृदयद्रावक रूप या कथेत तिच्या विलक्षण कातर शब्दांतून आर्ततेने व्यक्त होते. पतीने आपल्याला त्याच्या ध्येयसाधनेच्या मार्गातील धोंड मानले, या जाणीवेने अत्यंत दुखावलेली आणि संतप्त झालेली या कथेची नायिका म्हणजे, 'एकदा लेण्यातील सुंदर शिल्पाकृती छिन्नविछिन्न केलेल्या पाहिल्या, तेव्हा मला शंका आली की सगळ्या ठिकाणच्या लेण्यातील शिल्पाकृती मुसलमानांनीच फोडल्या हे खरे असेल का? की स्त्रीदेहाचा आणि सौंदर्याचा मनातून धाक बाळगणाऱ्या तुमच्यासारख्यांनीही ही सुंदर शिल्पे विछिन्न करण्यामध्ये हातभार लावला असेल?' हे उद्गार पोटतिडिकीने काढणारी त्या कार्यकर्त्याची पत्नी शेवटी खोल उसासा टाकून म्हणते, 'तुझ्यासाठी गोळा झालेले तुझे इष्ट मित्र हळूहळू त्यांच्या घराकडे निघाले आहेत.... लवकरच काळाच्या प्रवाहात आणि नव्या मोहिमांच्या आवेशात तुझा सगळ्यांना विसर पडेल. एकटी मी मात्र तुला विसरणार नाही; कारण तू माझा साथी नव्हतास, नेता नव्हतास, तू माझे सर्वस्व होतास!' 'उसासा'मुळे वाचकाच्या मनाला विलक्षण औदासीन्य येते.

नानासाहेब गोरे यांनी स्त्रियांना समान वागणूक मिळावी हा विचार मांडणारे अनेक लेख लिहिले, 'पंडिता रमाबाई-मुक्तीचा घंटानाद' हा त्यांचा लेख स्त्री मुक्तीबद्दलची उत्कट आकांक्षा व्यक्त करणारा असून पंडिता रमाबाईंच्या कार्याचे महत्त्व वर्णन करणारा आहे. परंतु 'उसासा' या कथेतील स्त्री-जीवनाच्या उपेक्षेचे चित्र त्यांच्या वैचारिक लेखांपेक्षा अधिक अस्वस्थ करणारे आहे.

नानासाहेबांनी लिहिलेल्या 'दिगंबर' या कथेत एका थोर कलावंतांच्या मनातील सृजनाच्या प्रक्रियेचे अत्यंत बहारीचे वर्णन आहे. गोमतेश्वराचे शिल्प कोरणाऱ्या शिल्पकार अरिशिनेमीवर लिहिलेली ही एक अपूर्व कथा आहे. अरिशिनेमीचे सुरुवातीचे वर्णन आहे... 'त्याच्या हाती दगड मेणासारखे मऊ होत आणि त्याच्या हातोडी-छिन्नीतून निर्माण होणारे शिल्पकाव्य पाहून चंदनावर आणि हस्तिदंतावर कोरीव काम करणारे म्हैसूरचे कसबी कारागीर आश्चर्याने तोंडात बोटे घालीत. पुढे चामुंडरायाने अरिशिनेमीला गोमतेश्वराचे देऊळ बांधायचा आदेश दिला. हे कळल्यावर अरिशिनेमीच्याभोवती जमलेल्यापैकी एकाने विचारलं, 'मंदिर किती खांबांचं? त्याला दारं किती? त्याचे मंडप किती?' आणि अरिशिनेमीने

तऱ्हेवाईकपणे उत्तर दिले, 'या मंदिराला खांब नाहीत, दार नाही, मंडप नाही.' पुढे गोरे लिहितात, 'इंद्रगिरीच्या टेकडीवर अरिशिनेमी गेला आणि तेथे एकदम वादळ सुरू झाले. बेभान पाऊस पडू लागला आणि वीजेचा लोळ तेथील दहा पुरुष उंचीच्या शिलाखंडावर तुटून पडला आहे असे त्याला भासले. अरिशिनेमीला त्या क्षणी आपल्या मनात न मावणारा एक कोंभ फुटत आहे असे वाटले.' आणि कथेचा शेवट पुढीलप्रमाणे होतो...

'दुसऱ्या दिवशी त्याने पुन्हा इंद्रगिरीकडे दृष्टी वळविली. रात्रीच्या वादळात चढवलेला अग्निवेषाचा त्याग करून तो शिलाखंड सरळ नग्न उभा होता. कामक्रोधावर विजय मिळविलेल्या तीर्थकरासारखा सौम्य, शांत, सस्मित, अविचल. अरिशिनेमी त्या ताठ उभ्या असलेल्या शिलेकडे पाहात राहिला... अरिशिनेमी मनात म्हणाला, 'या शिलाखंडातून माझे हात तासून काढतील ती या मंदिरातील मूर्ती. ती झंझावातात अचल राहील. जगाच्या व्यवहाराकडे सस्मित मुखाने पाहील पंचमहाभूतांच्या मांडीवर ती निःशंक उभी ठाकेल.' गोमतेश्वराची मूर्ती घडविणाऱ्या शिल्पकाराच्या मनातील सृजनाचे दर्शन घडविणारी ही कथा अपूर्व आहे.

साने गुरुजी आणि नानासाहेब गोरे हे स्वातंत्र्य चळवळीतील सहकारी. १९४६ साली सुटल्यानंतर साने गुरुजी दादरला 'मेघा-भुवन'मध्ये राहत असत. त्यावेळी नानासाहेब मुंबईला आले की सतत 'मेघा-भुवन'मध्येच राहात असत. साने गुरुजी आणि नानासाहेब या दोघांचे स्वभाव एकमेकांपेक्षा अगदी वेगळे. नानासाहेब हे कठोर बुद्धिवादी, तर श्रेष्ठ दर्जाची बुद्धिमत्ता आणि अफाट वाचन, व्यासंग असलेले साने गुरुजी कमालीचे भावनाप्रधान. तरीही या दोघांमध्ये हार्दिक स्नेह होता.

साने गुरुजींनी १९५० साली स्वतःच्या जीवनाची ज्योती विझवून टाकली. त्यानंतर काही दिवासांनी नानासाहेब गोरे यांनी साने गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणारा 'स्वप्न-भाषण' हा अविस्मरणीय लेख लिहिला. या लेखात नानासाहेबांनी लेखाच्या सुरुवातीस 'मेघा-भुवन'मध्ये साने गुरुजींचे छायाचित्र होते, त्याचा उल्लेख करून लिहिले आहे, 'ते छायाचित्र तुमच्या मनाचे, तुमच्या अंतःकरणाचे; डोळे टिपता टिपता हसणाऱ्या आणि हसता हसता डोळे टिपणाऱ्या तुमच्या मनाचे, अर्ध्या फुललेल्या, अर्ध्या घामाळलेल्या तुमच्या अंतःकरणाचे.'

नानासाहेब पुढे लिहितात, '१९३१ साली मी प्रथम तुम्हांला पनवेलीस पाहिले. तेव्हापासून गेल्या अठरा-एकोणीस वर्षांत तुमच्या प्रकृतीत फरक पडल्याचे मला कधी आढळले नाही. ते मौन, ते देह जाळीत राहिलेले दुःख, ती सदा व्यथित दृष्टी.

सारे पूर्वीसारखेच... तुम्हांला किती सूक्ष्म, तरल आणि संवेदनाक्षम मन प्राप्त झाले आहे!... तुमच्या आयुष्यात कर्तव्य-यज्ञ अखंड चालू राहिला, पण अखेरपर्यंत प्रसन्नतेचे पायस तुम्हांला लाभले नाही... तुमच्यासारखे जे साधक आहेत, त्यांना आमच्यासारख्या जडांचे समाधान तर मिळत नाहीच; कारण तुमच्या संवेदना अतिसूक्ष्म, नाजूक आणि चोखंदळ असतात. पण त्या संवेदनांमुळे मनात उठणारे कल्लोळ प्रसन्न दृष्टीने पाहता यावेत, यासाठी जी बैठक साध्य करून घ्यावी लागते तीही तुम्हांला प्राप्त झालेली नसते... मार्गावरील काटे दूर करता करता तुमचे हात रक्तबंबाळ झाले, पण काटे सरत ना आणि तुमच्याने थांबणे होईना." लेखाच्या शेवटी नानासाहेबांनी लिहिले आहे, 'अशी निवांत वेळ मिळाली की तुम्हांला बोलावून घेण्याचे मोह मनाला पडतो. असे वाटते की तुमच्या ओठावरले ते रडवेले हसू जरा अधिक प्रगट व्हावे आणि आईच्या हातासारख्या तुमच्या त्या खरबरीत व मऊ हातांनी माझा हात एक वेळ तरी पुन्हा दाबला जावा.'

नानासाहेब गोरे यांनी कथा लिहिल्या, अनेक ललित लेख लिहिले. धकाधकीच्या राजकीय जीवनात त्यांच्या हातून मोजकेच पण सुंदर ललितलेखन झाले. विषयाला अनुरूप सुंदर शैली हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य. संस्कृत भाषेचा सुसंस्कार झालेली त्यांची शैली सुश्लिष्ट आणि आल्हाददायक आहे. नानासाहेब गोरे यांच्या लेखनात अभिजात सौंदर्य आहे; परंतु काही कथा वगळता जीवनातील वादळांचे चित्रण त्यांच्या ललित लेखनात नाही. आयुष्य उद्ध्वस्त करून टाकणाऱ्या पराभवांचे, आशा-आकांक्षांचा जाळून कोळसा करून टाकणाऱ्या भीषण दुःखांचे किंवा प्रमत्त वासनांच्या तांडवांचे चित्रण नानासाहेबांनी त्यांच्या ललित लेखनात केलेले नाही. त्यांच्यातील चिंतनशील विचारवंताने त्यांच्यातील कलावंतावर जणू बंधने घातली आहेत. ज्याचे जसे व्यक्तिमत्व, तसे त्याचे साहित्य, नानासाहेब गोरे यांच्या अनेक मित्रांना, विशेषतः गोपीनाथ तळवलकर यांना वाटे की नानासाहेब गोरे यांनी ललित लेखन अधिक करावयाला हवे होते. यासंबंधी नानासाहेब गोरे एका भाषणात म्हणाले, "मी जीवनातील सौंदर्यावर प्रेम करतो. मला निसर्ग प्रिय असला, चित्रकला, संगीत, नृत्य आवडत असले तरी मी केवळ निसर्गातील आणि कलेतील सौंदर्यावर प्रेम करीत नाही. सर्व जीवन सुंदर असावे, असे मला वाटते. आपल्या देशाचे पारतंत्र्य आणि त्यामुळे समाजात आलेली लाचारी ही कुरुपता मला सहन झाली नाही; त्यामुळे मी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला. आपल्या समाजातील दरिद्य आणि सामाजिक व आर्थिक विषमता ही कुरुपताच आहे. ती नष्ट झाली पाहिजे. समाजजीवन आणि व्यक्तिजीवन सतेज पराक्रमी आणि

निर्भय व्हावे असे मला वाटते, म्हणून मी आयुष्यभर आर्थिक, सामाजिक समता प्रस्थापित व्हावी, यासाठी झालेल्या चळवळीत भाग घेतला अशा चळवळीत भाग घेणे ही जीवनातील सौंदर्याची उपासनाच आहे.”

नानासाहेबांच्या सौंदर्यदृष्टीला गबाळेपणा रुचत नसे, त्यामुळे विनाकारण अघळपघळ बोलणे, वायफळ गप्पा मारून स्वतःचा, त्याचप्रमाणे दुसऱ्याचा वेळ घालविणे त्यांना पसंत पडत नसे. वेळेप्रमाणे पैशाच्याही बाबतीत ते काटेकोर होते. परंतु त्यांना प्रिय असणाऱ्या कार्यासाठी व संस्थांसाठी ते किती सढळ हाताने मदत करीत ते आम्हा त्यांच्याजवळच्या व्यक्तींनाच माहीत होते. ज्या ज्या वेळी समाजवादी पक्षाला आर्थिक साहाय्याची गरज पडली त्या त्या वेळी नानासाहेबांनी त्यांच्या वाटा उचलला. ‘साधना’, ‘मातृमंदिर’, ‘रचना विद्यालय’ या संस्थांनाही त्यांनी शक्य ती मदत केली.

नानासाहेबांची राहणी टापटिपीची स्वच्छ व नीटस, त्यांच्या घरी, खोलीत आणि घरी इस्त्री केलेल्या कपड्यांतही ही टापटीप दिसून येई. वेळेचे त्यांना महत्त्व वाटे. म्हणून त्यांना अनियमितपणा खपत नसे. त्यांच्या अनेक सभा मी आयोजित केल्या होत्या. सभेची वेळ झाली की ‘चला, निघायचंय ना?’ असा लकडा ते लावत. परंतु ठरलेल्या वेळेपेक्षा लोकही उशिरा येतात, हा आपल्याकडचा पायंडा असल्यामुळे. ‘गर्दी जमली की आम्ही फोन करू; नंतर नानासाहेबांना घेऊन या’ असे कार्यकर्त्यांनी मला सांगितलेले असे, त्यामुळे माझी फार पंचाईत होत असे.

एका बैठकीला नानासाहेबांना बोलाविले होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री त्या बैठकीला संबोधित करणार होते. नानासाहेब वेळेवर गेले. ठरलेल्या वेळेपेक्षा अर्धा तास होऊन गेल्यावर नानासाहेब उठून परत निघाले. काँग्रेस कार्यकर्ते म्हणाले. ‘थोडे थांबा; आत्ता मुख्यमंत्री येतीलच.’ तेव्हा नानासाहेब त्यांना म्हणाले, ‘मी अर्धा तास थांबून परत गेलो, असे मुख्यमंत्र्यांना सांगा.’

घटना समितीने मंजूर केलेल्या राज्य घटनेनुसार २६ जानेवारी १९५०ला भारत हे सार्वभौम प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून अस्तित्वात आल्यानंतर १९५२ मध्ये पहिल्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या. या निवडणुकांमध्ये काँग्रेसला लोकसभेत आणि सर्व राज्यांमध्ये प्रचंड बहुमत मिळाले. पं. नेहरूंची लोकप्रियता आणि स्वातंत्र्य लढा हा काँग्रेसच्या नेतृत्वखाली लढला गेला होता, या वस्तुस्थितीचा जनमानसावरील प्रभाव यामुळेच काँग्रेस पक्षाला घवघवीत यश मिळाले. समाजवादी पक्षाचा दारुण पराभव झाला, या निवडणुकीत एस. एम. जोशी हे पुणे लोकसभा मतदार संघातून आणि ना. ग. गोरे हे रत्नागिरी लोकसभा मतदारसंघातून

निवडणुकीस उभे होते. हे दोघेही समाजवादी नेते पराभूत झाले. समाजवादी पक्षाच्या देशभरातील पराभवासंबंधी गोरे यांनी 'जनवाणी'त अग्रलेख लिहिताना समाजवादी पक्षाला आपल्या राजकीय ताकदीचा अंदाज आला नव्हता अशी प्रांजळ कबूली दिली. त्याचप्रमाणे समाजवादी पक्षाने संघटनेकडे पुरेसे लक्ष दिले नव्हते, हेही मान्य केले. कम्युनिस्ट पक्षात कार्यकर्त्यांचे राजकीय शिक्षण आणि पक्षाच्या आदेशानुसार त्याने शिस्तबद्धपणे करावयाचे कार्य यांवर भर दिला जात असल्यामुळेच त्या पक्षाने काही मतदारसंघांत मजबूत पाय रोवले आहेत आणि त्यामुळेच त्यांनी तेथे विजय संपादन केल आहे, याकडे गोरे यांनी लक्ष वेधले असून समाजवादी पक्षातील क्रियाशील कार्यकर्त्यांचे असे गट (केडर्स) बांधण्याची आवश्यकता प्रतिपादन केली होती.

१९५२च्या निवडणुकीत समाजवादी पक्षाचा सपशेल पराभव तरी या पक्षामध्ये अनेक बुद्धिमान नेते आणि कार्यकर्ते आहेत याची जाणीव पं. नेहरूंना होती. म्हणून त्यांनी जयप्रकाश नारायण यांना मंत्रिमंडळात येण्यासाठी १९५३ मध्ये आवाहन केले. परंतु काँग्रेस जोपर्यंत तातडीने समाजवादी कार्यक्रम स्वीकारत नाही, तोपर्यंत मंत्रिमंडळात जाणे अगर काँग्रेसशी सहकार्य करणे आत्मघातकी ठरेल अशी प्रखर भूमिका डॉ. राममनोहर लोहिया यांनी घेतल्यामुळे पं. नेहरूंच्या आवाहनास प्रतिसाद मिळाला नाही. १९५३ सालानंतर समाजवादी पक्षात मतभेदांना सुरूवात झाली आणि डॉ. राममनोहर लोहिया व त्यांचे सहकारी कार्यकर्ते पक्षातून बाहेर पडले. कृपलानींच्या कृषक मजदूर पक्षाबरोबर समाजवादी पक्षाचे एकीकरण होऊन प्रजासमाजवादी पक्ष अस्तित्वात आला. याच सुरामास आचार्य विनोबा भावे यांनी भूदान आंदोलन सुरू केले. जयप्रकाश नारायण यांना या आंदोलनामुळे भारतातील जमीन वाटपाची समस्या सुटू शकेल आणि भूमिहीन शेतमजुरांना व दलितांना जमीन मिळू शकेल, असे वाटत होते. त्याचप्रमाणे जयप्रकाश नारायण यांना असेही वाटू लागले की राजकीय पक्ष हे समाजपरिवर्तनाचे साधन होऊ शकणार नाहीत. पाटणा येथे भरलेल्या सर्वोदय कार्यकर्त्यांच्या संमेलनामध्ये जयप्रकाश नारायण यांनी भूदानासाठी जीवनदान करण्याचे जाहीर केले आणि समाजवादी पक्ष सोडला. एस. एम. जोशी आणि गोरे यामुळे फार व्यथित झाले. नानासाहेब गोरे यांनी यासंबंधी 'जनवाणी'त पुढील आशयाचा अग्रलेख लिहिता होता;

"भारतातील जमिनीची समस्या, 'कसणाराची जमीन' हे तत्त्व स्वीकारले गेले तरच न्याय्य रीतीने सुटू शकेल. उत्तर प्रदेश, बिहार तसेच आंध्र आदी राज्यांमध्ये मोठे जमीनदार आहेत आणि कसलेही कष्ट न करता ते या जमिनीतून कुळांच्या

कष्टाने निर्माण झालेल्या उत्पन्नाचा मोठा भाग स्वतःकडेच ठेवीत आहेत. जमीनदारी नष्ट करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असला, तरी अनेक राज्य सारकारांच्यावर तेथील जमीनदार वर्गांचाच प्रभाव असल्यामुळे केंद्राचा निर्णय डावलून तेथील जमीनदारांचा पूर्वी चालू असलेलाच जुलूम चालू आहे. या जुलमाविरुद्ध १९४८ मध्ये तेलंगणातील कम्युनिस्ट पक्षाने शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी सशस्त्र आंदोलन केले, परंतु ते सरकारने ते मोडून काढले. अशा परिस्थितीत जमिनीचा प्रश्न सुटावा आणि भूमिहीन शेतमजुरांना व दलितांना जमीन मिळावी म्हणून आचार्य विनोबा भावे यांनी जे भूदान आंदोलन सुरू केले आहे, ते अभिनव आहे हे मान्यच केले पाहिजे. परंतु भूसमस्या सोडविण्याचा तोच एकमेव मार्ग आहे असे मला वाटत नाही. या देशातील पुरोगामी राजकीय पक्षांनी शेतकऱ्यांची आंदोलने केली पाहिजेत आणि केंद्र सरकारने कठोर धोरण घेऊन सर्व राज्यांमधील जमीनदारी नष्ट होण्यासाठी राज्यांना तसे कायदे करण्यास व त्यांची अंमलबजावणी करण्यास भाग पाडले पाहिजे. केंद्रामध्ये काँग्रेसच्या हातात सत्ता आहे आणि सर्व राज्यांमध्येही त्याच पक्षाची मंत्रिमंडळे आहेत म्हणून मी ही सूचना करीत आहे. परंतु पं. नेहरू हे पंतप्रधान असले व जमीनदारी नष्ट व्हावी असे त्यांना वाटत असले तरी काँग्रेस पक्षावर धनिक वर्गाची आणि जमीनदारांची पकड असल्यामुळे हे होणार नाही. म्हणूनच ही भूमी समस्या सोडविण्यासाठी आचार्य विनोबा भावे यांनी सुरू केलेल्या भूदान आंदोलनाचे मी स्वागत करतो. परंतु या आंदोलनाला मर्यादा आहेत, हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. भू-समस्या सोडविण्याचा तो एकमेव मार्ग नाही आणि म्हणून जयप्रकाश नारायण यांनी समाजवादी पक्ष सोडण्याचा जो निर्णय घेतला आहे तो योग्य नाही, असे माझे स्पष्ट मत आहे. भारतातील समाजवादी पक्षाचे नेतृत्व करीत असताना त्यांनी भूदानाला पाठिंबा द्यावा. परंतु आज समाजवादी पक्षाचे जे कार्यकर्ते देशभर पसरले आहेत त्यांचे नेतृत्व करणे ही जयप्रकाशजींची जबाबदारी आहे. पक्षातील अंतर्गत मतभेद विकोपाला जाऊ न देणे हे केवळ जयप्रकाश नारायण हेच करू शकतात. आचार्य नरेंद्र देव या थोर आणि ज्येष्ठ समाजवादी नेत्यांनी भूदान आंदोलनाच्या मर्यादा स्पष्टपणे मांडल्या आहेत. जमीनदारांचे हृदयपरिवर्तन करता येईल ही विनोबा भावे यांची समजूत हे स्वप्नरंजन आहे असे नरेंद्र देव यांनी स्पष्टपणे मांडले आहे आणि मला आचार्य नरेंद्र देव यांचे मत पूर्णपणे मान्य आहे. सरकारने जमीनदारी नष्ट करणारे कायदे करणे आणि शेतकरी व शेतमजूर यांचे हित करू इच्छिणाऱ्या सर्व राजकीय पक्षांनी व संघटनांनी आंदोलने करून सरकारला भूमीसमस्या

सोडविण्यास भाग पाडणे हाच मार्ग शेवटी प्रभावी ठरेल, हे आचार्य नरेंद्र देव यांचे म्हणणे सर्वथैव योग्य आहे. मी त्यांचा एक सहकारी व अनुयायी म्हणून हीच भूमिका आग्रहाने मांडू इच्छितो.'

कार्यकर्त्यांची वैचारिक भूमिका खंबीर व्हावी यासाठी त्यांची बौद्धिके घेत असतानाच गोरे त्यांना सांगत की आपल्या विचारांप्रमाणेच आपण वागले पाहिजे. मुंबईला गिरणी कामगार तरुणांचा एक गट समाजवादी चळवळीत होता. नायगाव भागात राहणारे हे सर्व तरुण रत्नागिरी जिल्ह्यातून आलेले होते. नानासाहेबांचे एक भाषण ऐकल्यानंतर हे तरुण त्यांना म्हणाले. 'तुम्ही आम्हांला कार्यक्रम द्या.' नानासाहेब गोरे म्हणाले, 'तुम्ही प्रत्येकी दहा रुपये देऊन तुमच्यापुरते सहकारी तत्त्वावर रेशनचे दुकान सुरू करा. सहकारी चळवळ हा समाजवादी चळवळीचा महत्त्वाचा पैलू आहे. हे स्वस्त धान्याचे दुकान तुम्ही चोखपणे चालवा. पुढचे पाऊल काय टाकायचे तो मार्ग तुम्हांला सापडेल." नानासाहेबांच्या सांगण्याप्रमाणे त्या तरुणांनी प्रथम रेशनच्या धान्याचे नंतर किराणा मालाचे सहकारी दुकान अशी वाटचाल सुरू केली. त्यातुनच या कार्यकर्त्यांनी 'मुंबई कामगार ग्राहक सहकारी मंडळ' ही संस्था स्थापन केली. त्यातून 'अपना बझार' हे डिपार्टमेंटल स्टोअर उभे राहिले व त्याच्या अनेक शाखा मुंबईच्या आसपास निघाल्या. काहीजण सर्ववेळ 'अपना बझार'चेच काम करू लागले. नानासाहेब या कार्यकर्त्यांना नियमाने भेटत, त्यांच्याशी बोलत, राजकीय परिस्थितीबाबत आणि अन्य कामांबद्दल मार्गदर्शन करताना नानासाहेब त्यांना म्हणाले, 'आपली संस्था एक आदर्श सहकारी संस्था बनविणे हे समाजवादी पक्षाचे काम आहे. समाजवादी चळवळीला दोन पैलू आहेत. एक संघर्ष आणि दुसरी रचना विधायक वृत्तीने काम करून 'अपना बझार' आदर्श रीतीने चालवून तुम्ही समाजवादी चळवळ संपन्न करीत आहात.'

राष्ट्र सेवादलाने हाती घेतलेला 'साने गुरुजी सेवापथका'चा कार्यक्रम नानासाहेब गोरे यांना फार महत्त्वाचा वाटे. ते सेवापथकाच्या अनेक केंद्रांवर गेले, श्रमदान करून तरुणांच्या विधायक कार्यात ते सहभागी झाले आणि कार्यकर्त्यांशी चर्चा करताना त्यांनी नवनवीन योजनांना पाठिंबा दिला. नानासाहेब गोरे राजापूर तालुक्यातील मूर या लहान गावाजवळ झालेल्या श्रमदान शिबिरात गेले असताना तेथील सेवादल कार्यकर्त्या चंद्राताई किर्लोस्कर यांनी त्यांची देवरूखला मातृमंदिर उभारण्याची योजना नानासाहेबांना सांगितली. तेव्हा नानासाहेब म्हणाले, 'तू आणि इंदिराबाई हळबे यांचा मातृमंदिर सुरू करण्याचा विचार ऐकल्याने मला फार समाधान वाटले. डॉ. मंडलिक, एस. एम., मी-आम्ही सर्वजण तुम्हांला शक्य ते

साहाय्य करू. “नानासाहेब दरवर्षी मातृमंदिराला नियमाने भेट देत आणि नेहमी म्हणत. ‘इंदिराबाई हळबे’ यांनी अनाथ मुलांना आधार देऊन आपल्या संस्थेचे ‘मातृमंदिर’ हे नाव सार्थ केले आहे.” देवरूखच्या कार्यकर्त्यांच्या समवेत नानासाहेब एकदा बोलत बसले असताना तेथील नारकर हे कार्यकर्ते म्हणाले, “नानासाहेब, ग्रामीण पुनर्रचनेच्या तुमच्या कल्पना आपल्या कार्यकर्त्यांना समजाव्यात म्हणून तुम्ही एक सोपे, लहानसे पुस्तक लिहा.” नानासाहेब पुण्याला आले. त्यांनी त्यांच्या ग्रामसुधारणेच्या कल्पना मांडणारे ‘मुरारीचे साळगाव’ असे शीर्षक असलेले सोपे सुंदर पुस्तक लिहिले. नानासाहेबांना या पुस्तकाबद्दल शासनाकडून पारितोषिक मिळाले तेव्हा नानासाहेब म्हणाले, ‘मी माझ्या कल्पनेतील आदर्श गावाचे चित्र या छोट्या पुस्तकात मांडले आहे. मी सुचविलेला प्रयोग समाजवादी कार्यकर्त्यांनी पाच गावात जरी यशस्वी करून दाखविला तरी मला खरे पारितोषिक मिळाल्यासारखे होईल.’

नानासाहेब सावंतवाडी, बेळगाव येथे नेहमी त. त्यावेळी त्यांना गोव्यातील कार्यकर्ते भेटत असत. गोव्यामध्ये १९४६ साली डॉ. राममनोर लोहिया गेले होते, त्यावेळी त्यांच्याभोवती पुरुषोत्तम काकोडकर, शिरोडकर, भेंब्रे आदी कार्यकर्ते गोळा झाले. गोव्यातील पोर्तुगीज सारकारने डॉ. लोहियांना अटक करून भारतीय हद्दीत आणून सोडले. त्यावेळी चळवळ करणाऱ्या काकोडकर, ब्रॅगान्झा कुन्हा, शिरोडकर आदी कार्यकर्त्यांना पोर्तुगीज सरकारने दीर्घ मुदतीच्या शिक्षा करून काही जणांना पोर्तुगालमध्ये आणि काही जणांना पश्चिम आफ्रिकेतील पोर्तुगीज वसाहती असलेल्या देशातील तुरुंगात ठेवले. भारत स्वतंत्र झाल्यानंतर गोव्यातील जनतेची स्वातंत्र्याची आकांक्षा तीव्र झाली. डॉ. गायतोंडे यांनी स्वाभिमानी वृत्तीने ती प्रगटही केली. गोव्यातील काही कार्यकर्ते मुंबईत होते. त्यांच्यापैकी पीटर अल्वारीस हे नानासाहेब गोरे यांचे समाजवादी पक्षातील सहकारी. अल्वारिस हे सतत गोव्यात जात. तेथील स्वातंत्र्य चळवळीसाठी उत्सुक असलेल्या सर्व कार्यकर्त्यांशी त्यांच्या निकटचा संबंध होता. ते नानासाहेबांना १९५३ साली म्हणाले, ‘भारताला स्वातंत्र्य मिळून येत्या १५ ऑगस्टला सहा वर्षे पूर्ण होतील, पण आम्ही गोवेकर अद्याप पोर्तुगीज सरकारच्याच जोखडाखाली आहोत. आमच्या लढ्याला भारत सरकार मदत करीत नाही. पण भारतातील जनतेने तरी आम्हांला पाठिंबा दिला पाहिजे.’ नानासाहेबांना हे पटत होते, पण काय करावे, ते सुचत नव्हते. १९५४ साली कारवारला गोमंतक साहित्य संमेलन भरले होते, नानासाहेब गोरे संमेलनाचे अध्यक्ष होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी पुढील विचार मांडले; ‘गोव्याच्या जनतेचे स्वातंत्र्याचे स्वप्न लवकर साकार

झाले पाहिजे आणि भारताचे सरकार जर यासाठी पावले उचलीत नसेल तर भारतीय जनतेने पुढाकार घेऊन काहीतरी केले पाहिजे.' कारवारहून परत आल्यावर नानासाहेब गोरे एस. एम. जोशींना भेटले आणि म्हणाले, 'गोव्यात सत्याग्रहींची तुकडी घेऊन जावी असे मला तीव्रतेने वाटते. काही दिवसांनी नानासाहेबांनी पुण्यात विरोधी पक्षाच्या पुण्यातील नेत्यांची बैठक बोलाविली आणि बैठकीच्या सुरुवातीस, 'गोव्यात सुरू झालेल्या मुक्तिसंग्रामास आपण पाठिंबा दिला पाहिजे'. असा विचार मांडला. त्यावर चर्चा होऊन गोवा विमोचन सहायक समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. तात्यासाहेब जेधे समितीचे अध्यक्ष झाले आणि नानासाहेब गोरे व जयंतराव टिळक हे दोघे सरचिटणीस झाले. नानासाहेब गोरे यांनी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी जाऊन त्यांचा सत्याग्रहाचा विचार कार्यकर्त्यांसमोर मांडला. सेनापती बापटांना हे समजल्यावर ते नानासाहेबांना म्हणाले, 'मी तुमच्याबरोबर सत्याग्रहींच्या पहिल्या तुकडीत येणार आहे.' शिरुभाऊ म्हणाले, 'मि दुसरी तुकडी घेऊन तुमच्या पाठोपाठ सत्याग्रह करीन.' नानासाहेब गोरे यांच्या नेतृत्वाखाली २५ सत्याग्रहींच्या पहिल्या तुकडीने १८ मे १९५५ ला भारताची सीमा ओलांडून गोव्याच्या हद्दीत प्रवेश केला. सेनापती बापट या तुकडीत होते. पोर्तुगीज सेनेतील मॉन्तेरो हा अधिकारी आणि त्याच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांनी सत्याग्रही तुकडीस अडविले आणि भीषण मारहाण केली. नानासाहेब गोरे यांना रक्त ओकेपर्यंत मारले. यानंतर नानासाहेबांना अटक करून तुरुंगात नेण्यात आले आणि बाकीच्या सत्याग्रहींना जखमी अवस्थेत सीमेवर आणून भारताच्या हद्दीत ढकलून देण्यात आले. या सत्याग्रहामुळे गोव्यातील स्वातंत्र्य चळवळीत नवे चैतन्य निर्माण झाले. भारतात ज्यावेळी गोरे यांना अमानुष मारहाण झाल्याची वार्ता आली त्यावेळी अनेकांनी तीव्र संताप व्यक्त केला आणि गोवा विमोचन सहायक समितीने ठरल्याप्रमाणे शिरुभाऊ लिमये यांच्या नेसृत्वाखाली दुसरी तुकडी पाठविली. त्याही तुकडीस भीषण मारहाण झाली. शिरुभाऊंनाही जबर मार बसला. तुकडीचे नेते म्हणून शिरुभाऊंना अटक करण्यात आली आणि बाकीच्या सत्याग्रहींना महाराष्ट्राच्या हद्दीत ढकलून देण्यात आले. गोव्यामध्ये दडपशाही, मारहाण, लांब मुदतीच्या शिक्षा यांना न भिता चळवळ चालू राहिली. सुधाताई जोशी या मूळच्या गोव्याच्या राहणाऱ्या, त्यांनी गुप्तपणे, सावंतवाडीमार्गे गोव्यात प्रवेश करून पोलिसांना चलवून म्हापशाला गोवा काँग्रेसच्या अधिवेशनाचे उद्घाटन केले. त्यांना पोलिसांनी मारहाण केली आणि नंतर अटकही केली. भारतातील सर्व विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रही तुकड्या गोव्यात

गेल्या. मधू लिमये, जगन्नाथराव जोशी, त्रिदीप चौधरी, वि. घ. देशपांडे आदी नेत्यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहींच्या तुकड्या गोव्यात गेल्या. काही तुकड्यांवर पोर्तुगीज सैनिकांनी गोळीबार केला आणि गोळीबारात काही सत्याग्रही हुतात्मे झाले. सर्व तुकड्यांच्या नेत्यांना अटक झाली. १५ ऑगस्ट १९५५ या दिवशी कम्युनिस्ट नेते भाई विष्णुपंत चितळे यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड मोठा सत्याग्रह झाला. गोळीबारात एकूण पाच हुतात्मे झाले. अनेकजण जखमी झाले. गोवा विमोचन सहायक समितीने आंदोलन थांबविले. मधु दंडवते यांच्या नेतृत्वाखालील तुकडी सावंतवाडीपासून गोव्यापर्यंत चालत गेली. त्या सर्वांना जबर मारहाण करून भारताच्या हद्दीत ढकलून देण्यात आले. पोर्तुगीज सरकारने सत्याग्रहाचे नेतृत्व केलेल्या सर्व नेत्यांवर लष्करी कोर्टात भरले आणि कोर्टाने त्यांना १२ वर्षांची शिक्षा ठोठावली. नानासाहेबांनी स्वातंत्र्यलढ्यात आठ वर्षांपेक्षा अधिक कारावास भोगला होता. आता त्यांचे आई-वडील वृद्धापकाळामुळे फार थकत चालले होते, आपण तुरुंगातून येईपर्यंत घरची अवस्था काय होईल ही चिंता त्यांच्या मनाला जाळीत होती. काही वेळा त्यांचे चित्त विचलित झाले. परंतु शिरुभाऊ लिमये यांनी त्यांना धीर दिला. त्यांच्या मनाला आधार दिला. आग्वादच्या किल्ल्यात या सर्व नेत्यांना ठेवण्यात आले. तेथे गोव्यातीलही काही प्रमुख कार्यकर्ते त्यांच्यासमवेत होते. आग्वादला नेल्यावर मधु लिमये, शिरुभाऊ या मित्रांच्या समवेत राहताना नानासाहेबांचे मन शांत झाले. तेथे त्यांनी 'अमेरिकेच्या इतिहासा'वरील काही ग्रंथ मागवून त्यांचा अभ्यास सुरू केला. यानंतर नानासाहेबांनी 'अमेरिकन संघराज्याचा इतिहास' हा ग्रंथ लिहावयास घेतला, वाचन-लेखन यास आवश्यक असलेली मनाची एकाग्रता ते या परिस्थितीतही करू शकले, यावरून त्यांच्या मनःपिंडाची कल्पना येते. नानासाहेबांनी लेखनासाठी आवश्यक ती टिपणे काढली, मात्र कारावासात हा ग्रंथ ते पुरा करू शकले नाहीत. पुढे तीन वर्षांनी नानासाहेबांनी या ग्रंथाचे लेखन पूर्ण केले. या ग्रंथामध्ये अमेरिकेच्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक जीवनातील परिवर्तनाचे चित्र रेखाटताना नानासाहेब गोरे यांनी अमेरिकेच्या जीवनात महान कामगिरी करणाऱ्या अब्राहम लिंकन, जेफरसन्, वुड्रो विल्सन, रुझवेल्ट आदींच्या कामगिरीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन केलेले आहे.

गोव्याच्या तुरुंगात १९ महिने काढल्यावर ॲम्नेस्टी इंटरनॅशनलच्या मध्यस्थीमुळे नानासाहेब गोरे, शिरुभाऊ लिमये, मधु लिमये, जगन्नाथराव जोशी, त्रिदीप चौधरी आदी नेत्यांची सुटका झाली. नानासाहेब, शिरुभाऊ आदी सुटून आल्यावर पुण्यामध्ये शनिवाड्यासमोर भरलेल्या सभेत नानासाहेब म्हणाले, 'आम्ही

सुटून आलो परंतु सुधाताई जोशी अद्याप तुरुंगात आहेत, हे मी विसरू शकत नाही.'

## प्रकरण ५

## राजकीय नेते आणि स्त्री-मुक्ती समर्थक

नानासाहेब गोरे ज्या काळात गोव्यात तुरुंगात होते, त्याच काळात 'मुंबई-बेळगाव-कारवार सह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' या मागणीसाठी संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे एस. एम. जोशी, कॉ. डांगे, आचार्य अत्रे, उद्धवराव पाटील आदी नेत्यांच्या नेतृत्वाखाली मराठी जनतेचा तीव्र लढा चालू होता. मोरारजी देसाई मुख्यमंत्री असताना मंबईत भीषण गोळीबार करण्यात आला आणि समितीचे १०५ कार्यकर्ते हुतात्मे झाले. १९५७ साली सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्या. त्यावेळी नानासाहेब गोरे तुरुंगात असतानाच संयुक्त महाराष्ट्र समितीने त्यांना लोकसभेसाठी उभे करण्याचे ठरविले. प्रचारमोहीम सुरू झाली आणि नानासाहेबांची सुटका झाली. काँग्रेसतर्फे काकासाहेब गाडगीळ हे गोरे यांच्याविरुद्ध पुण्यातून उभे होते. निवडणूक चुरशीची झाली आणि नानासाहेब गोरे निवडून आले. याच सार्वत्रिक निवडणुकीत पुण्यातील शुक्रवार पेठ वॉर्डातून एस.एम.जोशी हे काँग्रेसचे मातब्बर उमेदवार आणि पुण्याचे पहिले महापौर बाबुराव सणस यांचा पराभाव करून निवडून आले.

नानासाहेब गोरे हे लोकसभेवर निवडून गेल्यावर अभ्यासू वृत्ती आणि इंग्रजी व हिंदी या दोनही भाषांवरील प्रभुत्व यामुळे अल्पकाळातच त्यांनी आपले वैशिष्ट्य प्रस्थापित केले. १९६१ साली पार्लमेंटच्या एका शिष्टमंडळाचे सदस्य म्हणून नानासाहेब गोरे युरोपला गेले असताना पुण्याजवळचे पानशेत धरण फुटल्याची बातमी त्यांना समजली, त्यावेळी दौरा अर्धवट सोडून नानासाहेब तत्काळ पुण्याला परतले आणि अन्य स्वयंसेवकांसमवेत पूरग्रस्त भागातील सफाईच्या कामात सहभागी झाले. पं. नेहरूंनी पुण्याला भेट दिली त्यावेळी पुण्यातील लोकसभेचे सदस्य असलेले नानासाहेब गोरे पेठेत स्वयंसेवकांच्या तुकडीत सामील होऊन चिखल दूर करीत होते असे दृश्य पंडितजींना दिसले आणि ते स्तिमित झाले.

नानासाहेब गोरे यांच्या कामात कमालीची शिस्त असे. ते लोकसभेचे सदस्य असताना तेथे विचारावयाच्या प्रश्नासंबंधी ते संपूर्ण माहिती गोळा करीत. त्यामुळे त्यांनी विचारलेले उपप्रश्न अनेकदा मंत्र्यांना अडचणीत टाकीत असत. प्रश्न, लक्षवेधी सूचना, अल्पकाळ चर्चा, अशासकीय प्रस्ताव ही सर्व संसदीय आयुधे (डिव्हायसेस्) ते कुशलतेने वापरीत. अर्थसंकल्पाचा ते काळजीपूर्वक अभ्यास करीत आणि काही अडचण आल्यास दिल्ली विद्यापीठातील एका तरुण प्राध्यापकाची मदत

घेत. नानासाहेब आणि बॅ.नाथ पै हे नेहमी आपापसांत चर्चा करून कोणत्या विषयावर कोणी बोलावयाचे ते ठरवीत असत. नाथ पैंच्या भाषा प्रभुत्वाबद्दल, वक्तृत्वाबद्दल नानासाहेबांना फार मोठे कौतुक व अभिमानही वाटत असे. मधु लिमये यांच्या भेदक कार्यशैलीचीही ते नेहमी प्रशंसा करीत असत. नानासाहेब गोरे यांना पब्लिक अकौंटस् कमिटी आणि एस्टिमेटस् कमिटी यांच्यावर काम करायला मिळाले. पुण्यात आम्हा कार्यकर्त्यांसमोर बोलताना ते एकदा म्हणाले, 'लोकसभेतील आणि राज्यसभेतील सदस्यांच्या भाषणांना प्रसिद्धी मिळते ते योग्यच आहे, परंतु विविध समित्यांचे काम प्रकाशात आले नाही, तरी तेही फार महत्त्वाचे असते. लोकसभेत आणि राज्यसभेत प्रत्येक सदस्य त्याच्या पक्षाची भूमिका घेऊनच बोलत असतो. परंतु समित्यांच्या बैठकीत कोणाही सदस्याला त्याचा पक्ष आदेश देत नाही. त्यामुळे तेथील चर्चा अधिक खुली होते. मी मांडलेल्या मुद्यांना अनेकदा समितीतील काँग्रेस पक्षाचे व अन्य पक्षांचेही सदस्य पाठिंबा देत आणि आम्ही एकत्रितपणे त्या विभागाच्या सचिवांकडे स्पष्टीकरण मागत असू. आम्ही एकत्रितपणे केलेल्या काही सूचना शासन स्वीकारीत असे.'

नानासाहेब दिल्लीमध्ये असताना चिंतामणराव देशमुखांशी त्यांचा गाढ स्नेह होता. दोघेही महाराष्ट्राचे अभिमानी आणि दोघांचेही संस्कृत भाषेवर प्रेम आणि प्रभुत्व. त्यामुळे राजकारणाप्रमाणेच या दोन मित्रांमध्ये अनेकदा काव्य-शास्त्र-विनोदही चालत असे.

नानासाहेब गोरे यांनी संसद सदस्य असताना त्यावेळचे लोकसभा अध्यक्ष अनंतशयनम् अय्यंगार यांच्या समवेत संसदेची ओळख विद्यार्थ्यांना करून देणारे पुस्तक प्रथम इंग्रजीत लिहिले आणि नंतर त्याचा मराठीत 'आपली संसद' असा अनुवाद केला. ११० पानांच्या या छोट्या पुस्तकांचे भाषांतर हिंदी आणि अन्य सर्व भारतीय भाषांमध्ये शंकरन् नायर नावाचे संसदेचे एक सदस्य आपल्या मुलांशी बोलत आहेत आणि त्यांना माहिती सांगत आहेत, असे या पुस्तकाचे स्वरूप ठेवलेले आहे. सुरुवातीस आपल्या राज्यघटनेचे स्वरुप अत्यंत सोप्या रीतीने विद्यार्थ्यांना समजून सांगितले आहे. त्यानंतरची 'आपली हिंदुस्थान', 'आपली दिल्ली' ही दोन वर्णनपर प्रकारणेही चित्तवेधक आहेत. प्राचीन हिंदुस्थानातील लोकशाहीचे स्वरूप कसे होते, हे एका प्रकरणात सांगितल्यानंतर स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने लोकशाही राज्यपद्धती स्वीकारल्यावर आपली लोकसभा कशी अस्तित्वात आली याचे अत्यंत सुगम विवेचन आहे. शेवटच्या दोन प्रकरणांमध्ये विद्यार्थ्यांना सहज समजेल अशा रीतीने आपल्या संसदेच्या कार्याचे चित्र रेखाटलेले आहे.

नानासाहेबांची मुलगी शुभा ही ज्यावेळी हायस्कूलमध्ये शिकत होती, त्यावेळी तिला दौऱ्यावर असताना ते नेहमी पत्रे लिहीत. यापूर्वी साने गुरुजींनी त्यांची पुतणी सुधा हिला अशीच पत्रे लिहिली होती. साने गुरुजी ती पत्रे साधनेत प्रसिद्ध करीत; कारण ती पत्रे केवळ त्यांची पुतणी सुधा हिला लिहिलेली नव्हती. तिच्या वयाच्या सर्व मुला-मुलींना जीवनाची ओळख करून देणारी ती पत्रे होती. नानासाहेब गोरे यांनी त्यांची मुलगी शुभा हिला लिहिलेली पत्रेही अशीच, तिच्याप्रमाणेच बारा-तेरा वर्षांच्या असलेल्या मुला-मुलींशी संवाद साधणारी होती. साने गुरुजींनी लिहिलेल्या पत्रांचे तीन संग्रह ‘सुंदर पत्रे’ म्हणून प्रसिद्ध झाले. नानासाहेब गोरे यांनी शुभाला लिहिलेल्या पत्रांचा संग्रह ‘करवंदे’ म्हणून प्रसिद्ध झाला. या संग्रहातील एका पत्रात नानासाहेबांनी त्यांच्या विमानप्रवासाचे वर्णन केले आहे, तर एका पत्रात साने गुरुजींचे सुंदर व्यक्तिचित्र- ‘बालवाडीचा माळी’- म्हणून रेखाटले आहे. एका पत्रामध्ये नानासाहेबांनी साने गुरुजी सेवापथकातील त्यांचा अनुभव सांगतात श्रमदानाचे महत्त्व सांगितले आहे, तर ‘प्रवासातील नेत्रोत्सव’ या पत्रामध्ये रत्नागिरी आणि वेंगुर्ला येथील समुद्राचे बहारीचे वर्णन आहे. राष्ट्र सेवादलातर्फे पावसाळ्यात वर्षाविहार आयोजित केला जात असे. तरुण सैनिकांबरोबर खंडाळ्याच्या घाटात धो धो पाऊस पडणाऱ्या पावसात नानासाहेब ‘राजमाची दर्शन’पासून झपझप् चालत ‘नागफणी’ (ज्याला इंग्रजीत ड्यूकस् नोज म्हणत असत)ची दमछाक करणारी खडी चढण चढून सह्याद्रीच्या त्या शिखरावर पोहोचले. या अनुभवाचे वर्णन करणारे ‘नागफणी’ हे पत्र अविस्मरणीय आहे; तसेच मणिपूरचे वर्णन करणारे ‘चित्रांगदेचे माहेर’ हे पत्रही बहारीचे आहे. हा संग्रह आजही त्या वयाच्या वाचकांना मोह पाडील असा आहे.

संयुक्त महाराष्ट्र समितीने १९५५ पासून नेटाने चालविलेल्या लढ्याला अखेर यश आले आणि १ मे १९६०ला मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. बेळगावचा प्रश्न मात्र सुटला नाही. १९६० नंतर यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे मंख्यमंत्री झाले; आणि महाराष्ट्रातील राजकारणाचे स्वरूप आमूलाग्र बदलले. १९५७ मध्ये मुख्यमंत्री असताना यशवंतराव चव्हाण यांनी अत्यंत सहिष्णू व सर्वसमावेशक धोरण ठेवले होते. १९६० नंतर त्यांनी विरोधी पक्षांतील अनेक तरुण कार्यकर्त्यांना सत्तेत सहभागी होण्याचे आवाहन केले आणि शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी पक्ष या संयुक्त महाराष्ट्र समितीतील प्रमुख पक्षांचे अनेक तरुण कार्यकर्ते काँग्रेसमध्ये सामील झाले. त्यामुळे १९५७ मधील निवडणुकीचे चित्र १९६२ मध्ये आमूलाग्र बदलले. एस. एम. जोशी हे पूर्वीच्या मतदार संघातून त्यांचे पूर्वी सहकारी

असलेले आणि १९६० नंतर काँग्रेसमध्ये गेलेले श्री. राम तेलंग यांच्याकडून पराभूत झाले. पुणे शहर लोकसभा मतदार संघात प्रजासमाजवादी पक्षातर्फे नानासाहेब गोरे, संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे आचार्य अत्रे आणि काँग्रेसतर्फे शंकरराव मोरे हे उभे होते. विरोधी पक्षाची मते विभागली गेल्यामुळे शंकरराव मोरे हे विजयी झाले. ना. ग. गोरे यांना दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली. महाराष्ट्रात लोकसभा आणि विधानसभा यात काँग्रेसला भरघोश बहुमत मिळाले.

राजकारणाची ही सर्व धकाधक चालू असतानाही नानासाहेब गोरे समाजवादी पक्षातील आणि राष्ट्र सेवादलातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी 'जनवाणी', 'साधना', या साप्ताहिकांतून नियमाने लेखन करीत. या त्यांच्या लेखांमध्ये त्या वेळच्या महत्त्वाच्या राजकीय व सामाजिक प्रश्नांचे विवेचन असले, तरी ते केवळ प्रासंगिक नसे. कारण नानासाहेबांनी प्रत्येक लेखामध्ये पुरोगामी वैचारिक दृष्टिकोन कार्यकर्त्यांसमोर मांडलेला आहे. 'आव्हान आणि आवाहन' असा या लेखांचा संग्रह १९६३ साली प्रसिद्ध झाला. १९६१ साली नानासाहेब गोरे हे लोकसभेचे सदस्य असताना त्यांनी संसदेत माओत्से तुंगच्या आक्रमक धोरणाबद्दल सरकारला इशारा दिला होता. या भाषणाचा आशय त्यांच्या 'भारता, वैऱ्याची रात्र आहे जागा राहा' या लेखात आलेला होता. 'माओत्से तुंगच्या रणनीतीची चतुःसूत्री' हा चिनी आक्रमणापूर्वी लिहिलेला लेखही याच विषयावर आहे, पं.नेहरूंच्या परराष्ट्रविषयक धोरणातील कच्च्या दुव्यांवर नानासाहेब गोरे यांनी अचूक बोट ठेवले आहे. 'महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांप्रत' आणि 'नवा महाराष्ट्र धर्म' या दोन लेखांमध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या वेळी कार्यकर्त्यांनी बदलत्या परिस्थितीत काय केले पाहिजे याचे विवेचन आहे. 'जयप्रकाशांशी विचारविनिमय' या लेखात गोरे यांनी जयप्रकाशजींनी पक्षविरहित लोकशाहीचे जे समर्थन केले, त्यावर सडेतोड मतप्रदर्शन केलेले आहे. 'माझ्यामते आजची खरी समस्या राजकीय पक्ष कसे मोडावेत ही नसून लोकशाहीच्या मर्यादांचे भान ठेवून ते कसे चालवावेत, ही आहे', असे गोरे यांनी या लेखात स्पष्टपणे लिहून जयप्रकाशजींच्या भूमिकेचे खंडन केले आहे. गोरे यांच्या राजकीय लेखांच्या दुसरा संग्रह 'ऐरणीवरील प्रश्न' हाही अत्यंत उद्बोधक आहे. 'भारत आणि आधुनिकता' या लेखामध्ये म.फुले, लोकहितवादी आणि आगरकर यांनी केलेल्या सामाजिक सुधारणेच्या विचारांचे समर्थन करतानाच त्यांनी पं.नेहरूंनी त्यांच्या आत्मचरित्रात केलेल्या विज्ञान आणि मानवतेच्या पुरस्काराकडेही लक्ष वेधले आहे. 'नवराष्ट्र निर्मिती आणि शिक्षण' आणि 'आमचे विद्यार्थी असे का वागतात?' या दोन लेखांमधील ध्येयवादी उर्मी उसळून

येण्यासाठी आवश्यक अशी परिस्थिती व वातावरण भारतात नाही, याची प्रांजळ कबुलीही दिली आहे.

१९६५ साली वाराणशी येथे प्रजासमाजवादी पक्षाचे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनात समाजवाद्यांमध्ये फूट पडून संयुक्त समाजवादी पक्ष आणि प्रजासमाजवादी पक्ष असे दोन पक्ष एकमेकांपासून वेगळे झाले. एस. एम. जोशी संयुक्त समाजवादी पक्षाचे अध्यक्ष झाले आणि नानासाहेब गोरे हे प्रजासमाजवादी पक्षाचे अध्यक्ष झाले. आयुष्यभर एकमेकांना साथ देणारे हे मित्र १९६५ ते १९७२ अशी सात वर्षे एकमेकांपासून वेगळे राहिले. समाजवादी पक्षातील या फाटाफुटीमुळे चळवळीचे फार नुकसान झाले. कम्युनिस्ट पक्षात १९४८ आणि १९६२ मध्ये जी फाटाफूट झाली, त्यामुळे अनेक कार्यकर्त्यांनी राजकीय क्षेत्रच सोडले. समाजवाद्यांमधील फाटाफुटीमुळेही हेच घडले. या फाटाफुटीनंतर १९६७ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीत डॉ. राममनोहर लोहिया यांनी देशातील सर्व विरोधी पक्षांना एकत्र आणण्याची भूमिका घेतली आणि डाव्या कम्युनिस्टांपासून जनसंघापर्यंत सर्वांची आघाडी केली. प्रजासमाजवादी पक्ष या आघाडीतून बाहेर राहिला. डॉ.लोहिया यांची 'स्ट्रॅटेजी' विशेषतः उत्तर भारतात यशस्वी झाली आणि उत्तर प्रदेश, बिहार व मध्यप्रदेश येथे संयुक्त विधायक दलाची मंत्रिमंडळेही काही काळ अधिकारारूढ झाली. परंतु दुर्दैवाने याच वेळी डॉ.लोहिया यांचे आकस्मिक व अकाली निधन झाले. त्यानंतर आपापसांतील मतभेदांमुळे संयुक्त विधायक दलाची मंत्रिमंडळे कोसळली. लोकसभेत काँग्रेसलाच बहुमत मिळाले आणि १९६६ साली लालबहादूर शास्त्रींच्या निधनानंतर पंतप्रधान झालेल्या इंदिरा गांधी १९६७ नंतर पुन्हा पंतप्रधान झाल्या. १९६९ नंतर इंदिरा गांधी यांनी आक्रमक भूमिका घेतल्यामुळे काँग्रेसमधील मोरारजी देसाई आदी नेत्यांनी संघटना काँग्रेस हा वेगळा पक्ष स्थापन केला. १९७१च्या निवडणुकीत इंदिरा गांधी यांनी 'गरिबी हटाओ'ची घोषणा केली आणि त्यांना प्रचंड बहुमत मिळाले. या बदललेल्या राजकीय परिस्थितीत संयुक्त समाजवादी पक्ष व प्रजासमाजवादी पक्ष यांची एकजूत करण्यासाठी एस. एम. जोशी यांनी पुढाकार घेतला. नानासाहेब गोरे यांनी त्यांना तत्काळ उत्तम प्रतिसाद दिला आणि १९७२ मध्ये दोन्ही पक्षांचे एकीकरण होऊन पुनश्च समाजवादी पक्ष स्थापन झाला. मध्यंतरीच्या काळात १९७० साली नानासाहेब गोरे हे राज्यसभेवर निवडून गेले. १९५७ साली लोकसभेत केलेल्या कामाचा अनुभव असल्यामुळे आणि ज्येष्ठ नेते म्हणून मान्यताही असल्यामुळे नानासाहेब गोरे राज्यसभेत प्रभावीपणे कार्य करू लागले. मात्र दुर्दैवाने बॅ. नाथ पै यांचे १९७१ मध्ये अकाली निधन झाल्यामुळे संसदेत

ओरिसातील समाजवादी नेते सुरेंद्रनाथ द्विवेदी हेच नानासाहेब गोरे यांचे एकमेव जिव्हाळ्याचे स्नेही उरले होते. १९७१च्या निवडणुकीत मधु लिमये यांचा पराभव झाल्यामुळे संसदेत विरोधी पक्षातील समाजवादी पक्षाचे खासदार म्हणून नानासाहेबांवर मोठी जबाबदारी पडली आणि त्यांनी ती निर्धाराने, खंबीरपणे आणि प्रगल्भपणे पार पाडली.

विद्यार्थी चळवळीची सुरुवात गुजरातमध्ये चिमणभाई पटेल यांच्या भ्रष्टाचारी शासनाविरुद्ध झाली. नंतर ही चळवळ बिहारमध्ये पसरली. १९७२मध्ये जयप्रकाश नारायण यांनी 'भ्रष्टाचार हटाओ' अशी घोषणा केली. गुजरातमधील तरुणांच्या नवनिर्माण आंदोलनाला त्यांनी मार्गदर्शन केले. ही चळवळ बिहारमधील तरुणांनी जेव्हा प्रखरपणे सुरू केली, तेव्हा त्यांचे प्रेरणास्थान जयप्रकाशजीच होते. जयप्रकाश नारायण हे त्यांची संपूर्ण क्रांतीची कल्पना मांडीत असताना काँग्रेसच्या शासनातील भ्रष्टाचारावर टीका करीत. समावादी पक्ष, भारतीय जनसंघ, लोकदल आदी विरोधी पक्ष जयप्रकाशजींच्या नेतृत्वाखालील आंदोलनात सामील झाल्यावर आंदोलनाला राजकीय कलाटणी मिळाली आणि सुरुवातीच्या 'भ्रष्टाचार हटाओ'ऐवजी 'इंदिरा हटाओ' हीच घोषणा होऊ लागली. इंदिरा गांधींनी हे आंदोलन दडपून टाकण्यासाठी २६ जून १९७५ रोजी आणीबाणी जाहीर करून जयप्रकाश नारायण, मोरारजी देसाई, चरणसिंग, अटलबिहारी वाजपेयी आदी विरोधी पक्षनेत्यांना अटक केली. नानासाहेब गोरे आणि एस. एम. जोशी या दोन समाजवादी नेत्यांना मात्र अटक करण्यात आली नाही. २६जून नंतर काही दिवसांतच देशभरातील विरोधी पक्षाच्या अनेक कार्यकर्त्यांना तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सरसंघचालकांना 'मिसा'खाली स्थानबद्ध करण्यात आले. एस.एम. आणि गोरे या दोन्ही नेत्यांनी खंबीरपणे आणीबाणीच्या विरोधात भूमिका घेतली. नानासाहेब गोरे यांनी यावेळी विरोधी पक्षाचे खासदार म्हणून संसदेत आणीबाणी ही लोकशाही नष्ट करणारी आहे असे स्पष्टपणे मांडून इंदिरा गांधींच्या धोरणावर कठोर टीका केली. परंतु वृत्तपत्रांवर आणीबाणीत कडक सेन्सॉरशिप असल्यामुळे गोरे यांच्या भाषणांना प्रसिद्धी मिळू शकली नाही. एस. एम. जोशी यांनी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी जाऊन लोकांना निर्भयपणे आणीबाणीस विरोध करण्याचे आवाहन केले. गोरे यांनी अहमदनगर, नाशिक, सातारा, कराड, सांगली आदी शहरांतून भाषणे केली. परंतु भीतीमुळे या सभांना फार गर्दीही होत नसे. 'साधना' साप्ताहिकाने अत्यंत निर्भयपणे परंतु शक्य तो कायद्याच्या कचाट्यात सापडणार नाही, अशा रीतीने आणीबाणीला विरोध केला. साधनेची दोन वेळा झडती झाली. एस.एम. आणि गोरे खंबीरपणे 'साधना'

साप्ताहिकाचे संपादक यदुनाथ थत्ते यांना पाठबळ देत होते. 'साधना'वर शासनाने खटला भरला असताना हायकोर्टात ॲड. दळवी यांनी 'साधना'ची बाजू समर्थपणे मांडली आणि न्या.तुळजापूरकर यांनी साधनातील मजकूर देशविघातक नाही असा निर्णय दिला. एस.एम. आणि गोरे या नेत्यांना हायकोर्टातील नैतिक विजयामुळे फर समाधान वाटले. नानासाहेब गोरे यांनी लोकसभेमध्ये आणि उत्तर प्रदेश व बिहारमध्ये काही बैठका घेऊन जे विचार मांडले ते एकत्र करून 'आपात कालकी उलटी गंगा' अशी पुस्तिका 'साधना प्रकाशना'ने प्रसिद्ध केली. या पुस्तिकेमुळे नानासाहेबांचे आणीबाणीच्या विरोधातील विचार देशात अनेक ठिकाणी गेले. ५२ पानांच्या या पुस्तिकेत 'श्री. नानासाहेब गोरे यांचा 'प्रश्नोपनिषद' हा लेख, तसेच नानासाहेबांच्या 'दोन मुलाखती' असून आचार्य विनोबाजी भावे यांना उद्देशून नानासाहेबांनी लिहिलेला एक लेख आहे. भारतातील लोकशाहीवर आघात करणाऱ्या आणीबाणीवर अचूक शरसंधान करणारा नानासाहेबांच्या हा लेखांचा आणि मुलाखतींचा संग्रह आकाराने छोटा असला तरी अत्यंत सुस्पष्ट आणि प्रखर आहे.

सुमतीबाईंची प्रकृती १९७०पासून ढासळत गेली. नानासाहेबांनी त्यांच्या शुश्रूषेसाठी एक मुलगी ठेवली. ती सुमातीबाईंची काळजी घेत असली तरी नानासाहेबही त्यांची शक्य ती सेवा करीत. आणीबाणी जाहीर झाल्यानंतर लोकशाहीच्या समर्थनासाठी आणि आणीबाणीला विरोध करण्यासाठी नानासाहेब आणि एस. एम. या दोघांनी सतत दौरे केले... १९७६ मध्ये नानासाहेब बिहारमध्ये गेले असताना सुमतीबाई पडल्या आणि त्यांच्या मांडीचे हाड मोडले. कार्यकर्त्यांनी त्यांना तत्काळ हॉस्पिटलमध्ये हलविले. परंतु दुर्दैवाने त्यांची प्रकृती एकदम ढासळली आणि त्यांचे निधन झाले. सुमतीबाई पडल्याची तार मिळताच नानासाहेब तत्काळ पाटण्याहून परत फिरले. भुसावळ स्टेशनवर गाडी असतानाच त्यांना सुमतीबाईंच्या निधनाची वार्ता समजली. सुमतीबाईंनी जन्मभर नानासाहेबांना सर्व बाबतीत साथ दिली. त्यांनी सेवासदनमध्ये शिक्षिका म्हणून नोकरी केली आणि संसाराची आर्थिक जबाबदारी सांभाळली, त्यामुळेच नानासाहेब गोरे आयुष्यभर सर्व वेळ राजकीय व सामाजिक कार्य करू शकले. सुमतीबाई स्वभावाने करारी पण आतिथ्यशील होत्या. कार्यकर्त्यांना त्या कुटुंबीयांप्रमाणेच वागवीत. त्यांचा त्याग हा समजाला अपरिचितच राहिला. नानासाहेब तुरुंगात असताना सुमतीबाई नानासाहेबांच्या आईवडिलांची सर्व देखभाल करीत, शुभावर निरतिशय प्रेम करताना सुमतीबाईंनी तिच्यावर सुसंस्कार केले, तिला शिस्त लावली आणि

साधेपणाने राहायला शिकविले. स्वातंत्र्य लढ्यातील नानासाहेबांच्या तुरुंगवासाच्या वेळी आणि ते गोव्याच्या आग्वाद किल्ल्यात कारावास भोगत असताना सुमतीबाईंच्या मनावर खूप ताण पडे. परंतु त्यांनी ते दुःख मूकपणे सोसले. त्या अतिशय स्वाभिमानी होत्या, आणि इतरांनी कोणी आपली कीव करता कामा नये असे त्यांना वाटे. नानासाहेबांच्या देशभक्तीबद्दल आणि त्यागाबद्दल त्यांना फार अभिमान वाटे. नानासाहेब खासदार झाले, पुण्याचे महापौर झाले, त्यावेळी सुमतीबाईंना फार आनंद वाटला. १९४६ ते १९५१ अशी पाच वर्षे त्या असेंब्लीत आमदार होत्या. परंतु त्यांना राजकीय महत्त्वाकांक्षा नव्हती. नानासाहेबांना राजकीय कार्यात साथ देण्यातच त्यांना कृतार्थता वाटे. सुमतीबाईंच्या अंत्यसंस्कारांच्या वेळी नानासाहेब एसेमना म्हणाले, 'आयुष्यभर सुमतीने माझ्यासाठी फार सोसले, तिच्या शेवटच्या क्षणी मी तिच्याजवळ असायला हवा होतो.'

१९७७च्या जानेवारी महिन्यात इंदिरा गांधी यांनी लोकसभेच्या निवडणुका घेण्याचे जाहीर केले आणि त्यानंतर विरोधी पक्षाचे सर्व नेते आणि कार्यकर्जे यांची सुटका झाली. जयप्रकाश नारायण यांनी सर्व विरोधी पक्षांनी जनता पक्षात विलीन होऊन एकाच जाहीरनाम्यावर निवडणुका लढवाव्यात अशी भूमिका घेतली. त्यावेळी १९३२ सालापासून त्यांचे सहकारी असलेल्या नानासाहेब गोरे आणि एस.एम.जोशी यांनी जयप्रकाशजींना हार्दिक पाठिंबा दिला. आणीबाणीच्या काळात भारतातील जनतेने इंदिरा गांधींना उघड विरोध केला नव्हता. परंतु लोकांच्या मनात असंतोष धुमसत होता. तो असंतोष लोकांनी १९७७च्या निवडणुकीत मतपेटीद्वारेव्यक्त केला आणि इंदिरा गांधींच्या काँग्रेस पक्षाचा पराभव करून दाखविला. समाजवादी पक्ष, भारतीय जनसंघ, संघटना काँग्रेस, आणि लोकदल यांच्या नेतृत्वाखालील अकाली दल हे पत्र एकत्र येऊन निवडणुका लढल्यामुळेच हे घडले. निवडणुकीनंतर पंतप्रधान कोणी व्हावे हा प्रश्न उपस्थित झाला, त्यावेळी इंदिरा काँग्रेसमधून राजीनामा देऊन जनता पक्षात आलेल्या बाबू जगजीवनराम यांना पंतप्रधान करावे असे एस.एम.जोशी आणि नानासाहेब गोरे यांनी जयप्रकाशजींना सांगितले. परंतु चौधरी चरणसिंगाच्या विरोधामुळे जयप्रकाश नारायण यांनी मोरारजी देसाई यांना पंतप्रधान करण्याचा निर्णय घेतला. ३० एप्रिल १९७७ रोजी समाजवादी पक्षाची बैठक होऊन जनता पक्षात विलीन होण्याच्या निर्णयास अधिकृत मान्यता दिली गेली. एस.एम.जोशी आणि नानासाहेब गोरे या दोघांना हा निर्णय मान्यच होता. परंतु खाजगी संभाषणात नानासाहेब एस.एम.ना म्हणाले, '१९३४ साली आपण समाजवाद्यांनी एकत्र येऊन बांधलेले घर आज

आपणच पाडून टाकले; राजकीयदृष्ट्या विलिनीकरणाचा निर्णय योग्य आहे, परंतु मनाला अवघड वाटतेच. आपल्या काही कार्यकर्त्यांच्या डोळ्यांत पाणी आलेले पाहून मलाही गलबलून आले.' मधु लिमये आणि मृणालताई गोरे यांना मंत्रिपद मिळत असताना त्यांनी ते नाकारले. नानासाहेब मधूला म्हणाले, 'मधु, तुझा निर्णय मला पटला नाही. डॉ.लोहिया यांच्या आणि तुझ्या विचारांची प्रत्यक्षात कार्यवाही करून दाखविणे हे एक आव्हान होते. तू ते स्वीकारावयास हवे होते.' नानासाहेब गोरे यांनी भारताचे इंग्लंडमधील हायकमिशनर व्हावे, असे जनता पक्षाच्या कार्यकारिणीत सुचविण्यात आले. पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी ते मान्य केल्यावर नानासाहेब गोरे यांना विचारण्यात आले. त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली. समाजवादी विचारांचे समर्थक आणि मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेसनमध्ये डेप्युटी कमिशनर असलेले विठुभाऊ वैद्य यांना नानासाहेब गोरे यांनी त्यांची स्वीय सहायक म्हणून घेतले. त्यांनी हायकमिशनरच्या कार्यालयात पूर्वीपेक्षा अधिक शिस्त आणि कार्यक्षमता आणली. नानासाहेब हायकमिशनर असताना इंग्लंडमधील भारतीयांशी त्यांनी सौहार्दाचे नाते जोडले. स्वतंत्र नागालँडची मागणी करणारे पिझो हे नेते इंग्लंडमध्ये होते. त्यांच्याशी वाटाघाटी करण्यासाठी मोरारजी देसाई यांनी एस.एम.जोशी यांना इंग्लंडमध्ये पाठवले. नानासाहेबांच्या लंडनमधील निवासस्थानीच एस. एम. जोशी आणि नानासाहेब गोरे यांची पिझो यांच्याशी तीन दिवस बोलणी झाली. पिझो यांनी मनमोकळेपणाने त्यांची भूमिका मांडली. यासंबंधी नानासाहेबांनी एका लेखामध्ये लिहिले, "ब्रिटिशांनी आसाम पलीकडच्या ईशान्य भारताला नॉर्थ ईस्ट फ्राँटिअर एजन्सी असे नाव देऊन तो प्रवेश भारतापासून अलग ठेवला. तेथे फक्त ख्रिश्चन मिशनऱ्यांना प्रवेश दिला. या मिशनरी लोकांनी नागालँड, मिझोराम, मेघालय आदी ठिकाणच्या आदिवासींना इंग्रजीमधून शिक्षण दिले, त्यांच्यासाठी हॉस्पिटले काढली आणि त्यांना ख्रिश्चन धर्म स्वीकारायला लावताना त्यांच्या मूळ धर्माचे आचरण करण्यासही त्यांना परवानगी दिली. मणिपूरमधील वैष्णव मात्र खिस्ती झाले नाहीत. भारताची स्वातंत्र्य चळवळ या भागात ब्रिटिशांनी पोहोचूच दिली नाही. तरीदेखील सुभाषबाबूंच्या आझाद हिंद सेनेला या लोकांनी पाठिंबा दिला. पिझो हा आझाद हिंद सेनेत आधिकारी होता. डोंगरात राहणाऱ्या या स्वातंत्र्यप्रिय लोकांना भारतात राहिल्यास त्यांचे स्वातंत्र्य त्यांना उपभोगता येईल की नाही, याची शंका वाटते. या लोकांना समजून घेऊन त्यांच्यात भारताबद्दल विश्वास, आत्मीयता निर्माण केली पाहिजे. हे काम सोपे नाही." पिझोशी वाटाघाटी केल्यानंतर भारतात परत गेल्यावर एस.एम.जोशी यांनी पंतप्रधानांना पिझोशी

झालेल्या चर्चेचा अहवाल देऊन हा प्रश्न सोडविण्यासाठी काय केले पाहिजे याबाबत सूचनाही केल्या. इंग्लंडमध्ये हायकमिशनर असताना नानासाहेब गोरे यांनी ‘लोकसत्ता’ दैनिकाच्या रविवार पुरवणीत ‘तमसेच्या तीरावरून’ असे शीर्षक असलेले लेखन एक वर्षभर केले. या लेखांमधून नानासाहेब गोरे यांनी युरोपमधील साम्यवादी देशांतील नव्या विचारप्रवाहांचे तर्कशुद्ध विश्लेषण केले. त्याचप्रमाणे १९५० ते १९७५ या काळात तंत्रविज्ञानात झपाट्याने झालेल्या प्रगतीमुळे सर्व युरोपभर निर्माण होत असलेल्या नव्या प्रवृत्तींचेही साधार विवेचन केले. या काळात नानासाहेब रशियाला काही दिवस गेले आणि तेथील राजकीय परिस्थितीचे त्यांनी निरीक्षण केले. नानासाहेब गोरे यांना सुभाषबाबूंच्या मृत्यूसंबंधी माहिती मिळवावी असे वाटत होते. त्यांनी या संदर्भात लॉर्ड माऊंटबॅटन यांना पत्र लिहिले परंतु लॉर्ड माऊंबॅटन यांनी अधिकृत अहवालापलीकडे त्यांना अधिक काही सांगावयाचे नाही, असे उडवाउडवीचे उत्तर दिले. नानासाहेब गोरे यांना इंग्लंडमधील मुक्त विद्यापीठाबद्दल मोठे कुतूहल होते. त्यांनी मुक्त विद्यापीठास भेट देऊन त्या अभिनव शैक्षणिक प्रयोगाची सर्व माहिती देणारे साहित्य भारतात शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या मित्राला पाठविले.

१९७९ साली जनता पक्षातील अंतर्गत कलह वाढू लागला, तो पुढे विकोपाला गेला आणि अखेर जनता पक्षाचे सरकार पडले. जनता पक्षाने गोरे यांची हायकमिशनर म्हणून नेमणूक केली होती हे लक्षात घेऊन जनता पक्षाचे सरकार पडताच त्यांनी हायकमिशनर पदाचा राजीनामा दिला. १९८० नंतर नानासाहेब गोरे आणि एस. एम. जोशी या दोघांनी दैनंदिन क्रियाशील राजकारणातून दूर होण्याचा निर्णय घेतला. यावेळी एका मुलाखतीत नानासाहेब गोरे यांनी पुढील आशयाचे विचार व्यक्त केले...

“१९४८ साली काँग्रेस समाजवादी पक्षाने काँग्रेसमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. असा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्यानंतर निदान तीस चाळीस वर्षे एकजुटीने पक्षसंघटना करून भारतीय राजकारणाला दिशा देण्याचे प्रयत्न करण्याची आमची जबाबदारी होती. परंतु दुर्दैवाने आमच्यातील एक प्रभावी नेते अच्युतराव पटवर्धन यांनी अल्प काळातच राजकारण-संन्यास घेतला; आणि १९५३मध्ये आमच्यातील सर्वश्रेष्ठ नेते जयप्रकाश नारायण यांनी समाजवादी पक्षाकडे पाठ फिरवून भूदान-आंदोलनाला जीवनदान दिले. याच्यामुळे समाजवादी पक्षाची फार मोठी हानी झाली. आमच्यातील अशोक मेहता आणि डॉ.लोहिया या नेत्यांच्यामध्ये वैचारिक मतभेद झाले; राजकारणात मतभेद हे होणारच, परंतु ते टोकाला नेऊन पक्षात फूट

पडणे इष्ट नव्हते. समाजवादी पक्षात १९५३ साली आणि पुढे १९६५ साली झालेल्या फाटाफुटीमुळे समाजवादी चळवळीचे फार नुकसान झाले. आमच्या पक्षातील निष्ठापूर्वक, निरपेक्ष वृत्तीने काम करणाऱ्या सामान्य कार्यकर्त्यांचा फार मोठा मनोभंग आम्हा समाजवादी नेत्यांच्यामधील मतभेद व भांडणे यांच्यामुळे झाला. या सर्व घटनांमध्ये कोण बरोबर, कोण चूक अशी उणीदुणी काढत बसण्यात मला स्वारस्य वाटत नाही. आम्ही समाजवादी पक्षाचे काम एकजुटीने केले नाही. याबद्दल मला अपराधी वाटते. जनता पक्षात समाजवादी पक्षाचे विलिनीकरण करण्यात आमची चूक झाली, असे मला वाटत नाही. त्या विशिष्ट राजकीय परिस्थितीत लोकशाहीच्या पुनर्स्थापनेसाठी ते आवश्यक होते. परंतु जनता पक्षाचे सरकार पडल्यानंतर पूर्वीच्या समाजवादी पक्षाच्या स्थापनेबाबत विचार करावा अशी सूचना काही तरुण कार्यकर्ते करीत होते, तिचा आम्ही पुरेशा गंभीरपणे विचार केला नाही. एक मात्र अभिमानाने सांगितले पाहिजे की स्वातंत्र्य लढ्यामध्ये आणि १९७५ साली लोकशाहीच्या संरक्षणासाठी १९७७ साली लोकशाहीच्या पुनर्स्थापनेसाठी आम्ही समाजवाद्यांनी सर्वस्व देऊन प्रयत्न केले, याबद्दल मला कृतार्थ वाटते.'

नानासाहेबांना समाजवादी चळवळीच्या यशापयशाबद्दल विचारले असता ते म्हणाले, 'लोकशाही समाजवाद हा विचार भारतीयांना समजून सांगण्याचे श्रेय बव्हंशाने समाजवादी चळवळीसच द्यावे लागले. येथे एका वेळी कम्युनिस्ट पक्ष कामगारवर्गाच्या हुकूमशाहीची भाषा बोलत होता. समाजवाद आणि लोकशाही एकत्र नांदू शकणार नाहीत, अशी कम्युनिस्टांची भूमिका होती. आज त्यांनी ती भूमिका बदललेली आहे. लोकशाहीच्या चौकटीत राहून आर्थिक शोषण नाहीसे करणे व समताधिष्ठित समाज निर्माण करणे शक्य आहे, हे आज कम्युनिस्टांनी मान्य केले आहे,' नानासाहेब पुढे म्हणाले, 'माझे इतक्याने समाधान होत नाही. समाजवादाचा नेमका आशय काय, याबद्दलच्या विचारांमध्ये सुस्पष्टता आली पाहिजे. भारतीय परिस्थितीच्या संदर्भात येथील शेतकारी आणि शेजमजूर कामगारांपेक्षा अधिक महत्त्वाचे आहेत. तसेच सामाजिक विषमता नष्ट करणे हाही समाजवादाचा आशय असला पाहिजे. केवळ आर्थिक विषमतेविरुद्ध भूमिका घेणे ही अपूर्णता आता दूर केली पाहिजे.'

'साधना' साप्ताहिक साने गुरुजींनी १९४८ साली १५ ऑगस्टला सुरू केले. त्यांच्या विश्वासू आणि निष्ठावान सहकाऱ्यांमध्ये यदुनाथ थत्ते हे होते. साने गुरुजींच्या निधनानंतर यदुनाथ थत्ते यांनी संपादकीय विभागात काही वर्षे काम केले आणि पुढे साधना ट्रस्टच्या विश्वस्तांनी त्यांच्यावर संपादक पदाची जबाबदारी टाकली. त्यांनी

ती १९८१ सालापर्यंत समर्थपणे पार पाडली. आणीबाणीच्या काळात यदुनाथ थत्ते यांनी ‘साधना’ अग्निदिव्यातून जात असताना केलेले कार्य हा त्यांच्या जीवनातील परमोच्च बिंदू होता. १९८१ साली यदुनाथ थत्ते यांनी ‘साधना’च्या संपादक पदावरून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला, तेव्हा एस. एम. जोशी यांच्या सल्ल्यावरून नानासाहेब गोरे यांनी ‘साधना’चे संपादक होण्याचे मान्य केले. एका वार्ताहराने नानासाहेबांना विचारले, ‘आपण संसदेचे अकरा वर्षे सदस्य होता. भारताचे ब्रिटनमधील हायकमिशनर होतात. मग आता एका साप्ताहिकाचे आपण संपादक होणे हे उचित वाटते काय?’

नानासाहेबांनी उत्तर दिले, “सानेगुरुजी हे ‘साधना’चे संस्थापक आणि संपादक होते. मी त्यांचा स्वातंत्र्य लढ्यातील सहकारी. साने गुरुजींनी भूषविलेल्या संपादक पदावर काम करणे हा मी माझा गौरवच मानतो.” नानासाहेबांच्या प्रखर पुरोगामी विचारांमुळे आणि प्रभावी लेखन शैलीमुळे त्यांचे ‘साधना’मधील अग्रलेख चोखंदळ जाणकार वाचकांना अतिशय आवडत. राजकीय आणि सामाजित प्रश्नांवर लिहिताना नानासाहेब गोरे नेहमी सामाजिक न्याय आणि समता यांचा आग्रह त्यांच्या विवेचनात धरीत असत.

एस.एम.जोशी आणि नानासाहेब गोरे हे हायस्कूलमध्ये वर्गमित्र होते आणि आयुष्यभर ते मित्रच राहिले. एस.एम.जोशी यांच्या ८०व्या वाढदिवसाच्या वेळी नानासाहेबांनी ‘एसेम : एक विशेषनाम’ असा सुंदर लेख लिहिला. नानासाहेबांनी सुरुवातीस लिहिले आहे. ‘१९२२ मध्ये मी न्यू इंग्लिश स्कूलमध्ये इंग्रजीत पाचवीत दाखल झालो. तेव्हा मी एसेमना प्रथम बघितले. तेव्हापासून या घटकेपर्यंत एसेमच्या आणि माझ्या जीवनाचे रूळ एका दिशेने आणि समांतर जात आहेत.’ एस.एम.यांचे जीवन ही एक संघर्षाची गाथा असून स्वांतत्र्य लढ्यात, संयुक्त महाराष्ट्राचे नेतृत्व करताना आणि समाजवादी आंदोलनामध्ये एस.एम. यांनी स्वतःला झोकून देऊन प्राणपणाने काम केले, हे सांगून नानासाहेबांनी लिहिले आहे, ‘पदावाचून प्रतिष्ठा लाभलेली जी हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी माणसे समाजात असतात, त्यांपैकी एसेम एक आहेत. महाराष्ट्रात आणि इतर प्रांतांतही आपले नैतिक पितृत्व एसेमकडे जाते, असे सांगणारे शेकडो कार्यकर्ते आहेत.’

लेखाच्या शेवटी नानासाहेबांनी लिहिले आहे, ‘एसेम जेव्हा-केव्हा तू आपल्या प्रदीर्घ जीवनपटाकडे एखाद्या रात्रीच्या निवांत वेळी वघत बसशील, तेव्हा तुझ्या समानधर्मी असणाऱ्या बाबा आमट्यांच्या शब्दांत तू म्हणू शकशील... ‘प्रत्येक क्षणाची मागणी पुरवली आहे... आतल्या पशुत्वाशी आणि अंधाराशी सतत चितपट केली

आहे... अहंकार विरला आहे... आणि माझ्या मस्तीत मी झुलत आहे!'

एस.एम. यांनी लिहिलेली नानासाहेबांची पुढील आठवण अत्यांत हृदयस्पर्शी आहे : 'नानासाहेब आणि मी गेली ६० वर्षे एकत्र काम करीत आहोत. स्वभाव भिन्न असला तरी अंतरात्मा एकच. मध्यंतरी मी कर्करोगाने आजारी होतो. मुंबईच्या हॉस्पिटलमधून येऊन याच सध्याच्या घरात राहात होतो. रात्री खूप थंडी वाजून ताप यायचा. मला वाटलं मी आता काही जगत नाही. मी बायकोला म्हणालो, 'तारा, आपण आपल्या घरी जायचं.' तिनं विचारलं, 'का?' मी म्हणालो, 'हे अजेयचं नवं घर आहे. या नव्या घरातून माझं प्रेत बाहेर पडू नये, असं मला वाटतं.' मी हे बोलल्यावर तिचा जीव कासावीस झाला. का कोणास ठाऊक, तिने ही गोष्ट नानासाहेबांना सांगितली आणि दुसऱ्या दिवशी माझ्याही कानी घातली. तेव्हा मी तिला विचारले, 'मग हे ऐकल्यावर नानासाहेब काय म्हणाले?' यावर तिने सांगितले, 'त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले.' मी म्हणालो, 'अग, त्यांना उगीच हे सांगितलेस!'

१९८०पासून आयुष्याच्या अखेरीपर्यंत नानासाहेब गोरे हे कार्यकर्त्यांचे शिक्षण करीत राहिले. डॉ. पी.व्ही. मंडलिक ट्रस्टतर्फे पालघर तालुक्यात मासवण येथे झालेल्या कार्यकर्त्यांच्या शिबिरात नानासाहेबांनी 'भारत काल, आज आणि उद्या' या विषयावर तीन व्याख्याने दिले आणि ती लिहून पुस्तक रूपाने प्रसिद्ध केली. या छोट्या पुस्तकात नानासाहेब गोरे यांनी भारताच्या इतिहासाचे विवेचन करताना, येथील पूर्वीच्या राज्यकर्त्यांच्या चुका दाखवून, ते जगाबरोबर न राहिल्यामुळे आणि त्यांनी भौतिक प्रगतीचे महत्त्व न ओळखल्यामुळेच भारताचे स्वातंत्र्य गेले, असा दृष्टीकोन मांडला आहे. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात ज्या नव्या विचारांचे वारे भारतात वाहू लागले, त्यांचे विश्लेषण गोरे यांनी थोडक्यात केले आहे. भारतीय घटनेचे, त्यामधील मूलभूत हक्क आणि निदर्शक तत्त्वे यांचेही विवेचन गोरे यांनी केले आहे. उद्याच्या भारताने विज्ञानाच्या आधारे देशात समृद्धी आणतानाच सामाजिक न्याय आणि सामाजिक व आर्थिक समता ही उद्दिष्टे साध्य केली पाहिजेत, असा विचार गोरे यांनी विवेचनाच्या शेवटी आग्रहाने मांडला आहे.

१९८३ साली नानासाहेब गोरे आणि मी पालघर तालुक्यातील मासवण या लहानशा गावी अनुताई लिमये चालवीत असलेल्या आदिवासी सहज शिक्षण परिवाराच्या केंद्रावर गेलो होतो. नानासाहेब पूर्वीही चार-पाच वेळा या केंद्रावर गेले होते. मासवणच्या आसपासच्या पाड्यांवर चालणाऱ्या आदिवासी मुलांच्या बालवाड्यांचे काम आणि शेतांत काम करणाऱ्या आदिवासी बायकांसाठी मासवणला

चालविलेले पाळणाघर पाहून नानासाहेबांना फार समाधान वाटले. एक दिवस तेथे राहून आम्ही दुसऱ्या दिवशी सकाळी मुंबईत परतलो. त्या दिवशी संध्याकाळी ताडदेवच्या जनता केंद्रामध्ये राष्ट्र सेवादलातील मुली व जनता केंद्रात येणाऱ्या मुलींच्यासाठी नानासाहेबांचे भाषण आयोजित केले होते. मी नानासाहेबांना विचारले, 'आज तुम्ही कशावर बोलणार आहात?' नानासाहेब म्हणाले, "मी आज तात्त्विक बोलणार नाही. महाराष्ट्रातीत काही प्रमुख स्त्री-कार्यकर्त्यांची माहिती मी मुलींना सांगणार आहे.' भाषणाला तरुण आणि प्रौढ स्त्रियाही भरपूर आल्या होत्या. नानासाहेब सोप्या शैलीमध्ये शिक्षकासारखे बोलले. मी त्या भाषणाचे सविस्तर वृत्त साधना साप्ताहिकासाठी लिहिले.

नानासाहेब सुरुवातीला म्हणाले, "भारतात स्त्रियांची चळवळ प्रामुख्याने महाराष्ट्र, बंगाल, आंध्र आणि केरळात आहे. महाराष्ट्रात स्त्रियांनी सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्याचा मला फार अभिमान वाटतो." त्यानंतर सावित्रीबाई फुल्यांच्या कार्याची माहिती सांगताना नानासाहेब म्हणाले, "त्या काळात सर्व जातीच्या मुलींच्यासाठी शाळा चालविणे सोपे नव्हते. जोतिबा फुले यांनी प्रथम सावित्रीबाईंना शिकविले आणि नंतर त्या मुलींच्यासाठी शाळा चालवू लागल्या. पुण्यातील विकृत प्रवृत्तीच्या सनातनी पुरुषांनी सावित्रीबाईंना अर्वाच्य शिव्या दिल्या, त्यांच्यावर शेणमारा केला; परंतु सावित्रीबाई डगमगल्या नाहीत आणि त्यांच्या निर्भय वागण्यामुळे त्यांना विरोध करणाऱ्या सनातन्यांनाही माघार घ्यावी लागली. ज्या काळात आपल्या समाजात जातिभेद अतिशय तीव्र होता, त्या काळात सर्व जातींच्या मुलींना शाळेत प्रवेश देणे, त्यांना शिकवणे हे फार अवघड काम होते; ते सावित्रीबाईंना केले. म.फुले यांनी त्यांच्या घरातील हौद सर्व जातीधर्मांच्या लोकांना पाणी भरण्यासाठी खुला केला. तेव्हा सावित्रीबाईंनी संमतीच नव्हे, तर जोतिबांना पाठिंबा दिला." सावित्रीबाईंच्या कार्याचे महत्त्व सांगितल्यानंतर नानासाहेबांनी पंडिता रमाबाईंच्या कार्यासंबंधी माहिती सांगितली. हे म्हणाले, 'पंडिता रमाबाई या असामान्य बुद्धिमान होत्या आणि त्यांचे कर्तृत्वही असामान्यच होते. पंडिता रमाबाईंचे चरित्र आणि विशेषतः त्यांची पत्रे सेवादलातील मुलींनी वाचली पाहिजेत." पंडिता रमाबाईंच्या कार्याच्या विविध पैलूंचे वर्णन करताना नानासाहेब म्हणाले, 'हिंदू समाजात आणि विशेषतः तथाकथित उच्च समजलेल्या जातींमध्ये स्त्रियांची जीवन कसे पायदळी तुडविले जात होते, केशवपनासारख्या दुष्ट रूढींमुळे स्त्रियांची विटंबना कशी होत होती हे पाहून त्याविरुद्ध पंडिता रमाबाईंनी खंबीर भूमिका घेतली. त्यांना टिळकांसारख्या मान्यवर पुढाऱ्यांच्या टीकेला, विरोधाला

तोंड द्यावे लागले. परंतु त्या डगमगल्या नाहीत. त्यांनी केडगावला मुक्तिमिशनचे जे कार्य केले, ते अत्यंत महत्त्वाचे व गौरवास्पद होते.' पं. रमाबाईंनी त्यांच्या पत्रांमधून जे विचार मांडले त्यासंबंधीही नानासाहेबांनी विवेचन केले.

नानासाहेब पुढे म्हणाले, 'म. गांधींनी स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व करताना, स्त्रियांना त्यात भाग घेण्याची प्रेरणा दिली. १९३० सालच्या मिठाच्या सत्याग्रहात अनेक स्त्रियांनी लाठीमार सोसला आणि सत्याग्रह करून कारावासही भोगला.' स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या परिस्थितीसंबंधी बोलण्यापूर्वी नानासाहेबांनी प्रश्न केला, 'तुमच्यापैकी किती जणींनी गोदावरीबाई परुळेकरांचे 'माणूस जेव्हा जागा होतो', हे पुस्तक वाचले आहे?' यावर फक्त दोन शिक्षकांचे हात वर झाले. नानासाहेब त्या शिक्षिकांना म्हणाले, 'तुम्ही जनता केंद्रातील आणि सेवादलातील मुलींना ते पुस्तक वाचायला द्या,' नानासाहेब पुढे म्हणाले, 'गोदावरीबाई या पुण्याच्या एका बड्या वकिलांच्या कन्या. सुखात वाढलेल्या या बाई आपले घरकुल सोडून ठाणे जिल्ह्यातील वारली या आदिवासी जमातीच्या वस्तीत गेल्या, त्यांच्या झोपडीत राहिल्या, वारली स्त्रियांबरोबर त्यांनी नागलीची भाकर खाल्ली, गुळाचा चहा प्याल्या. वारली लोकांच्या सुख-दुःखाशी एकरूप होताना त्यांनी त्या साध्याभोळ्या, वारली स्त्री-पुरुषांना त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाची जाणीव दिली आणि 'घरगडी' व्यवस्थेत त्यांना कसे लुबाडले जाते हे समजून सांगितले. गोदावरीबाई परुळेकरांनी एका वेळच्या भित्र्या, लाचार वारली लोकांना माणूस म्हणून जगायला शिकविले, त्यांच्यातला स्वाभिमानी माणूस जागा केला आणि मग त्यांना अन्यायाविरुद्ध बंड करायला उभे केले.' नानासाहेब म्हणाले, 'माझे कम्युनिस्ट पक्षाची राजकीय मतभेद आहेत. हिंसेच्या मार्गाने लढा केला तर सरकार तो लढा चिरडून टाकते हे लक्षात घ्यावयास हवे, असे मला वाटते आणि तरीही गोदावरीबाई परुळेकरांच्या कामाबद्दल मला फार आदर वाटतो.'

नानासाहेब पुढे म्हणाले, 'गोदावरीबाई परुळेकरांनी वारली लोकांना संघर्ष करायला शिकविले, हे जितके महत्त्वाचे तितकेच ताराबाई मोडकांनी वारली मुलांना शिक्षण देण्याचे जे काम केले, ते कामही महत्त्वाचे आहे. ताराबाईंनी वारली लोकांमध्ये हे काम सुरू केले, तेव्हा बोर्डीच्या एका श्रीमंत गृहस्थांनी त्यांना विचारले, 'गुरे राखणारी वारली मुळे तुमच्या शाळेत येतील असे तुम्हांला वाटते का?' ताराबाईंनी त्यांना उत्तर दिले, 'ती मुले गुरे राखत असतील तिथे जाऊन मी त्या मुलांना शिकवीन. शाळा इमारतीत ती असलीच पाहिजेत असे मला वाटत नाही.' ताराबाई मोडकांनी त्या मुलांना गोष्टी सांगितल्या, गाणी म्हणायला शिकवले.

ती वारली मुळे शाळेत आल्यावर त्यांच्यातली अनेक मुले उपाशी पोटीच शाळेत आलेली आहेत हे समजून घेऊन ताराबाई प्रथम सगळ्या मुलांना भाताची पेज देत आणि मन वर्ग सुरू करीत. ताराबाई मोडक, अनुताई वाघ यांनी आईच्या मायेने मुलांना शिकविले. गोदावरीबाईंच्या इतकेच ताराबाईंचे आणि अनुताई वाघांचे कामही महत्त्वाचे. मला त्यांच्याबद्दल फार मोठा आदर वाटतो.” नानासाहेब पुढे म्हणाले, ‘मी आजच पालघर तालुक्यातील मासवणला जाऊन आलो. आपल्या अनुताई लिमये यांनी ‘आदिवासी सहज शिक्षण परिवार’ ही संस्था स्थापन केली आहे. मासवण व आसपासच्या खेड्यांमध्ये वारली मुलांसाठी त्या बालवाड्या चालवीत आहेत. ताराबाई मोडक, अनुताई वाघ यांच्यासारखे काम अनुताई आणि त्यांच्या सहकारी महिला कार्यकर्त्या करीत आहेत.” भाषणाच्या ओघात महाराष्ट्रात अनेक ठिकाणी महिला कार्यकर्त्या जे काम करतात त्यांच्यापैकी काही जणींची माहितीही नानासाहेबांनी सांगितली. ते म्हणाले, ‘रत्नागिरी जिल्ह्यात राजापूर तालुक्यात पाचलला आबा नारकरांच्या भगिनी जानकीबाईंनी स्त्रियांच्यात जे काम केले, त्यांची लांज्याला जी स्त्रियांची संस्था आहे, या सर्व कामांची तुम्ही तरुण मुलींनी माहिती करून घेतली पाहिजे. देवरुखला चंद्रा किर्लोस्कर, इंदिराबाई हळबे यांनी चालविलेले ‘मातृ-मंदिर’ तुम्ही तिकडे जाऊन पाहिले पाहिजे.” नानासाहेब म्हणाले, ‘या विधायक कामाप्रमाणेच स्त्रियांच्या हक्कांसाठी संघर्ष करणेही जरूरीचे आहे.’ या संदर्भात त्यांनी मृणालताईंनी केलेल्या कामाबद्दल गौरवोद्गार काढले आणि प्रमिला दंडवते यांनी दिल्लीत राहून केलेल्या कामाचीही थोडीशी माहिती सांगितली. नानासाहेब गोरे भाषणाच्या शेवटी म्हणाले, “महाराष्ट्रात सावित्रीबाई फुले यांनी प्रथम केलेली वाटचाल आज अनेक स्त्री-कार्यकर्त्यांनी जोमाने पुढे चालविली आहे. याचे मला फार समाधान वाटते. या सर्व झुंजार महिलांच्याबद्दल मला फार आदर वाटतो.” नानासाहेबांच्या त्या भाषणाने जमलेल्या तरुण स्त्री कार्यकर्त्या अतिशय प्रभावित झाल्या होत्या.

स्त्री-शिक्षण हा नानासाहेबांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. नाशिकला कुसुमताई पटवर्धन आणि शांताबाई लिमये यांनी पुढाकार घेऊन मुलींचे रचना हायस्कूल सुरू केले आणि ते ध्येयवादी वृत्तीने आणि कार्यक्षमतेने चालविले. १९६९ साली रचना ट्रस्ट स्थापना झाला तेव्हापासून नानासाहेब गोरे ट्रस्टच्या कामात आपुलकीने लक्ष घालीत असत. १९४२च्या स्वातंत्र्यलढ्यात धडाडीने काम करणारे आणि नंतर नाशिकमध्ये विधायक कार्य करणारे विठ्ठलराव पटवर्धन आणि समाजवादी कार्यकर्ते आणि पत्रकार माधवराव लिमये हे रचना ट्रस्टमध्ये

पदाधिकारी होते. नानासाहेब माधवराव लिमयांना म्हणाले, ‘आपल्या पक्षाचे आमदार असताना विधान परिषदेचे काम करतानाच तू रचना ट्रस्टचा कार्यकारी विश्वस्त म्हणून काम करतोस, याचे मला फार समाधान वाटते,’ शांताबाई लिमये या १९८५ पर्यंत रचना ट्रस्टच्या सेक्रेटरी होत्या. नानासाहेब गोरे यांना आणि ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनाही रचना विद्यालयानंतर ट्रस्टने पुढचे पाऊल टाकले पाहिजे असे वाटे. रचना विद्यालयात महादेव-कोळी, कोकणा या आदिवासी समाजातील काही विद्यार्थिनी होत्या. नाशिकमध्ये राहण्या-जेवणाची सोय नसल्यामुळे अनेक गरीब मुली शिकण्याची इच्छा असून त्या शाळेत येत नसत हे लक्षात आल्यावर अशा विद्यार्थिनींसाठी वसतिगृह असावे असे नानासाहेबांना आणि रचना ट्रस्टमधील अन्य पदाधिकाऱ्यांना वाटू लागले. यानंतर १९७४ साली नानासाहेब गोरे यांनी या कामासाठी रचना ट्रस्टला पन्नास हजार रुपयांची वैयक्तिक देणगी दिली आणि मुख्यतः त्या देणगीतून वसतिगृह उभे राहिले. पुढे १९८९ साली रचना ट्रस्टने नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृह (वर्किंग वुईमेन्स होस्टेल) बांधले आणि १९९४ साली आपत्कालीन महिला निवास बांधला. नानासाहेब गोरे हे ट्रस्टच्या प्रत्येक बैठकीत हजर राहात असत. अन्य कोणतेही राजकीय वा सामाजिक काम, अगर व्याख्यानाचे निमंत्रण त्या दिवशी घ्यावयाचे नाही हे ते कटाक्षाने पाळीत. शांताबाई लिमये यांच्या निधनानंतर त्यांची कन्या डॉ. शोभा नेर्लीकर ट्रस्टचे काम करू लागली तेव्हा नानासाहेबांना फार समाधान वाटले.

समाजवादी महिला सभेच्या कार्यकर्त्यांनाही नानासाहेब सतत साहाय्य व मार्गदर्शन करीत. स्वातंत्र्य चळवळीत आणि राष्ट्र सेवादलात धडाडीने काम करणाऱ्या तारा फाटक यांचे निधन झाल्यानंतर समाजवादी महिला सभेने ‘तारा फाटक स्मृती व्याख्यानमाला’ सुरू केली. या व्याख्यानमालेचे उद्घाटन नानासाहेब गोरे यांनीच केले. धुळ्याला विजया चौक समाजवादी महिला सभेचे कार्य करीत असताना त्यांच्या कार्यात अनेक अडचणी आल्यावरही त्यांच्यावर मात करून त्यांनी निर्भयपणे काम चालविले, याचे नानासाहेब गोरे यांना फार कौतुक वाटत असे.

अनुताई लिमये यांच्या आदिवासी सहज शिक्षण परिवाराचे येथील केंद्र आणि देवरूखचे मातृमंदिर येथे नानासाहेब वर्षातून एकदा तरी अगत्यपूर्वक जात. एकदा बोलता बोलता ते म्हणाले, “वारकरी ज्याप्रमाणे नियमाने पंढरपूर, आळंदीची वारी करतात त्याप्रमाणे स्त्रियांचे विधायक काम प्रभावीपणे चाललेल्या मासवण, देवरूख, नाशिक या केंद्रात मी नियमाने जात असतो.” या संदर्भात ते समाजवादी पक्षाच्या उत्तर प्रदेशातील, बिहारमधील आणि मध्य प्रदेशातील समाजवादी नेत्यांवर

आणि कार्यकर्त्यांवर फार नाराज असत. ते मला म्हणाले, ‘चंद्रशेखर हा एक मोठा समाजवादी नेता. परंतु त्याच्याबरोबर त्याच्या पत्नीला मी आजवर कधी पाहिले नाही. यमुना प्रसाद शास्त्री या आपल्या पक्षाच्या मध्य प्रदेशातील नेत्याबद्दल मला फार प्रेम आणि आदर वाटतो. त्याची निष्ठा, त्याचा त्याग असामान्य आहे. माझ्याबद्दल त्याला आपुलकी आहे. परंतु त्याच्या पत्नीशी मी कधी एक शब्द बोललो नाही. त्याच्या घरी मी जेवायला गेलो तर त्याचा मुलगा किंवा भाऊ वाढीत असे. मी यमुना प्रसादला याबद्दल बोललो, माझी नापसंती व्यक्त केली. परंतु ओशाळून हसण्यापलीकडे त्याने काही केले नाही. जयप्रकाशजींच्या पत्नी प्रभावतीदेवींनी सामाजिक काम केले. त्या सगळीकडे येत याचे मुख्य कारण त्या गांधीजींच्या आश्रमात राहिल्या. अर्थात जयप्रकाशजीही पुरोगामी मताचे आहेत. परंतु आपले बिहारमधील अनेक साथी स्त्रियांच्या बाबतीत पक्के सनातनी आहेत.’ नानासाहेब एका भाषणात म्हणाले, ‘स्त्रियांना पडदानशीन ठेवणे, त्यांना बुरखा घ्यायला लावणे हा शब्द रानटीपणा आहे. महाराष्ट्रात आणि बंगालमध्ये स्त्रिया ज्या मोकळेपणाने समाजात वापरतात, काम करतात, त्याचा मला अभिमान वाटतो. कष्टकरी वर्गातील, महिला निर्भय असतात. परंतु श्रीमंत आणि उच्च मध्यम वर्गातील अनेक स्त्रिया पुरुषांवरच सर्वस्वी अवलंबून असतात. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या परिस्थितीत मध्यम वर्गातील स्त्रियांनाही नोकऱ्या कराव्या लागल्या, त्यामुळे स्त्रिया अधिक स्ततंत्र झाल्या. स्तातंत्र्य चळवळीत, कम्युनिस्ट आणि सोशालिस्ट चळवळीत स्त्रियांनी भाग घेतला हे स्त्री-मुक्तीच्या दृष्टीने फार महत्त्वाचे. महाराष्ट्रातील सर्व समाजसुधारकांनी, ज्योतिबा फुले, अण्णसाहेब कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे आदींनी स्त्रियांच्या शिक्षणावर भर दिल्यामुळेच आपल्या समाजाची फार मोठी प्रगती झाली, हे आपण सतत लक्षात ठेवले पाहिजे.’

सुधा वर्दे यांनी लिहिले आहे... ‘नानासाहेब बोलत तसे वागत. ‘स्त्रियांना समानतेने वागवलं पाहिजे असं म्हणणाऱ्या नानासाहेबांनी सुमतीबाईंना नेहमी आपल्याबरोबरीनं वागवलं. आमच्या अनेक समाजवादी नेत्यांमधील ‘नवरा’ त्यांच्या नकळत डोकावतो. म्हातारपणी आजारपणामुळे सुमतीबाई फार विकल झाल्या होत्या. त्यावेळी नानासाहेब त्यांची शक्य ती सेवा करीत. ते मला एकदी म्हणाले, ‘मला माहीत आहे सुमतीबाईंना आता धड समजत नाही. पण आपलं माणूस आहे ते. शेवटपर्यंत केल्याशिवाय राहवत नाही.’ नानासाहेबांचे हे शब्द ऐकून मला भरून आलं.’

स्त्री-मुक्तीच्या प्रश्नावर श्री. नानासाहेब गोरे यांची एक मुलाखात नाशिकच्या

कुसुमताई पटवर्धन यांनी घेतली. त्याचा हा संक्षिप्त अहवाल. यावरून नानासाहेब हे स्त्री-मुक्तीच्या प्रश्नावर किती सुसंगत व स्पष्ट विचार करीत आहेत, यांचे दर्शन होईल.

**कुसुमताई** : *स्त्रियांबाबतचे प्रश्न, त्यांच्यावरील वाढते अत्याचार हे आताच प्रकर्षाने जाणवतात, असे वाटते. याचे कारण काय?*

**नानासाहेब** : स्त्रियांबद्दल आपल्या समाजात समानतेची भावना कधीच वंचित राहिली. पूर्वीपासून मुलींना शिक्षण म्हणजे मुख्यतः घरकाम, स्वयंपाक, सेवेची कामे, कशिदा, शिवण हेच अभिप्रेत होते. स्त्रिया घराबाहेर पडतच नव्हत्या. मागे बिहारच्या दुष्काळानंतर घरदार सोडून पळालेल्या अनेक स्त्रियांचा प्रश्न आला. त्यांना स्वतःचे घर, पत्ता, गावाचे नावही माहीत नव्हते, अशी स्थिती होती.

आज काळ बदलत आहे. स्त्रीला समान शिक्षण मिळाले. अर्थार्जनाचे मार्ग मोकळे झाले. नवे विचार तिला मिळाले, पण जुन्या परंपरा मात्र कायम राहिल्या आहेत. सुशिक्षित मिळवती स्त्री ही पूर्वीप्रमाणे घरात कशी बसेल? घरातला रगाडा एकटी का ओढील? मुकाट्याने सर्व सहन का करील? म्हणून आज या युगायुगाच्या अन्यायांना वाचा फुटली आहे.

० *आजची छोटी कुटुंबे व बदलते कौटुंबिक संबंध यामुळे हे प्रश्न वाढत आहेत, असे वाटते का?*

०० आज सर्वत्र कुटुंबसंस्था नष्ट होत आहे. परदेशात १६-१७ वर्षांची मुले-मुलीही आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होतात. सर्व बंधने झुगारून देण्याची वृत्ती वाढत आहे. स्त्री-मुक्ती म्हणजे कुटुंबपद्धती नष्ट करणे असे मला वाटत नाही.

कुटुंबव्यवस्थेला आज पर्याय नाही. लहान मुलांच्या निकोप व सुरक्षित संस्कारित वाढीसाठी त्यांना आईवडिलांचे प्रेम हवे. म्हातारपणी मुले-नातवंडे यांच्यामध्ये राहणे व समाधानाचे आयुष्य कंठणे हेच भाग्यशाली जीवन असते. स्त्रीने कौटुंबिक बंधने तोडून स्वैराचारी बनणे म्हणजे स्त्री-मुक्ती नव्हे. स्त्री-पुरुष समानतेची व परस्परप्रेमाची येथे अपेक्षा आहे. कुटुंबसंस्था परस्पर विश्वास, सहकार्य, संरक्षण व प्रेम यांवर उभी आहे. तोच आदर्श आपण कायम ठेवला पाहिजे.

मात्र आपल्या पारंपारिक विचारांनुसार स्त्रीला समानतेची वागणूक मिळत नाही. मिळवती स्त्री ही दुप्पट कष्टसकरते. बाहेर अर्थार्जन व घरातील सर्व कामे, स्वयंपाकपाणी, मुलाबाळांचे काम, नवरा व अन्य सर्वांची सेवा; इतकेच नव्हे तर सण-वार, व्रतवैकल्ये हे सर्व तिने सांभाळावे, अशी अपेक्षा असते. इतकेही करून तिला मानाचे स्थान नसते. तिची जुनी सर्व बंधने कायम आहेत आणि तिला नव्या

बाहेरील धकाधकीलाही सामोरे जावे लागते. तिच्याबद्दल सतत संशय व्यक्त केला जातो. मिळवती स्त्री म्हणून तिचा मान वाढत नाहीच, उलट तिच्या पैशावरच नवरा अनेकदा मजा मारतो. तिच्या मिळकतीवरही तिचा ताबा नसतो.

अर्थात कधी काही स्त्रियाही अतिरेकी भूमिका घेतात. थोडीही तडजोड स्वीकारत नाहीत. स्वावलंबी झाल्या तरी मुलांचा, कुटुंबाचा विचार आवश्यकच आहे. तडजोड, समजूत ही सर्वत्र करावीच लागते. मुलांसाठी आपल्या कामावर, आकांक्षांवर बंधने स्वीकारणे योग्यच आहे. मुलांवर, पतीवर, कुटुंबीयांवर प्रेम असेल तरच संसार सुखाचे होतील. सर्व गोष्टी कायद्याने किंवा धाकाने होऊ शकणार नाहीत. व्यक्तिविकासासाठी मी कुटुंबव्यवस्था आवश्यक मानतो. मात्र त्यासाठी सर्वांनी त्याग करावा. केवळ स्त्रीनेच मन मारून सर्व त्याग करावा, अशी अपेक्षा करू नये.

० *व्यसनामुळे विशेषतः दारूमुळे अनेक संसार उद्‌ध्वस्त होतात. पुरुषच व्यसनाधीन जास्त का होतात?*

०० मलाही या प्रश्नाचे उत्तर कळत नाही. मानसिक ताणतणाव हे काय पुरुषांनाच असतात? मला वाटतं की, केवळ फॅशन म्हणून आणि परंपरेने पुरुषांना सूट आहे म्हणून पुरुषांमध्ये हे व्यसन वाढत आहे. याला कोणतीही सबब चालू देऊ नये. परवाच 'ए. ए.' (अल्कोहोलिक ॲनॉनिमस) या संस्थेच्या एका सभेला मी गेलो होतो. एक गृहस्थ डोळ्यात पाणी आणूण सांगत होता, "मी रस्त्याने हेलपटत जात होतो, अन् माझी बायको समोरून आली . तिने मला ओळखही दिली नाही." मी म्हटले, "का तिने ओळख द्यावी? नवरा दारू पिऊन गटारात पडतो, याचा तिला गर्व वाटावा काय? तुमच्या वायका दारू प्यायल्या तर तुम्हांला चालेला का?" मला हे पुरुषवर्गाचे कौतुक कळत नाही. अशा नवऱ्यांच्या लाथा खात मुला-बाळांचे व स्वतःचे हाल करीत बाईने सारा संसार करावा का? अशा 'सिंधू' मुळीच बनू नका. असे नवरे सोडून बाईने स्वाभिमानाने व स्वतंत्रपणे राहायला शिकावे.

एक गोष्ट मुख्य आहे. मुक्ती म्हणजे कोणताही स्वैराचार नव्हे. तर समान अधिकार आणि स्वयंशासन याला मी मुक्ती समजतो.

० *आज कोणताही राजकीय पक्ष स्त्री-मुक्तीसाठी विशेष काही करताना दिसत नाही, असे का?*

०० असा सर्व राजकीय पक्ष केवळ मतांच्या मागे आहेत. समाजाला जे रुचेल तेवढेच ते बोलतात. कुणी सुधारणांच्या विरोधी नाहीत; पण त्यांच्यासाठी परखडपणे बोलणार नाहीत. प्रबोधनात्मक काम आज कुणी करीत नाही. मुस्लिम-स्त्री-

विधेयक पाहा. याला सर्वांनीच खूप विरोध केला पाहिजे. पण बोलत नाहीत. केरळमध्ये तर मार्क्सिस्टांनीही मुस्लिमधार्जिणे नाही असे दाखविण्यासाठी विवेकानंद इत्यादिंच्या वचनांचा उपयोग केला. शहाबुद्दीन तर पूर्ण धर्माच्या बंधनांच्या पुरस्कार करणार. पण या मुद्यांवर कुणी कुणाला काढणार नाही. एक तर मुद्दाम समाजपुरुषाला दुखावतो कोण? दुसऱ्या बाजूने, स्त्री मतदार पूर्णपणे पुरुषांच्या गुलामीत आहे. त्यांना जागृत केले पाहिजे. त्यांना ही विधेयके, त्यांचे परिणाम यांबद्दल अजिबात जाणीव नाही.

○ *श्री. शरद जोशींनी असे महिला अधिवेशन घेतले. याबद्दल तुमची भूमिका काय?*

○○ त्यांची स्त्री-विधायक प्रश्नांची जाण उत्तम आहे. 'चांदवडची शिदोरी' हे त्यांचे विचार करायला लावणारे पुस्तक आहे. सर्व पक्षांनी व सर्व महिला संस्थांनी यासाठी त्यांना सहकार्य दिले पाहिजे.

○ *हुंडा, दारुबंदी, अत्याचार-विरोध यांसाठी अनेक पक्षांतील स्त्रिया कार्यक्रमाच्या पातळीवर एकत्र येतात. पण अशी आघाडी टिकेल का?*

○○ सर्वच पक्षांतील स्त्रियांनी महिला-प्रबोधनाचे काम केले पाहिजे, तरच पक्षीय कार्यक्रमात याला प्राधान्य मिळेल. पण वैचारिक पातळीवर याचा सखोल विचारही जरूर आहे. केवळ कार्यक्रम सारखे असले तरी मूलभूत विचारसरणींमध्ये फरक आहे.

धार्मिक समजुती, रूढी आणि परंपरा यांबद्दही समाजाचे प्रबोधन करावे लागेल व तेथे विविध पक्षांच्या मूलभूत विचारसरणीमधला फरक जाणवेल. उदाहरणार्थ, मुलाखेरीज स्वर्गप्राप्ती नाही, हा विचार पाहा. यामुळे आता मुली मारणे, गर्भजलपरीक्षेचा दुरुपयोग यांसारखे भयानक परिणाम होत आहेत. यालाच विरोध केला पाहिजे. नरजन्म म्हणजेच 'फॉलिंग फ्रॉम ग्रेस,' 'बाई हे मोहाचे मूळ', 'बाईचा संग सोडल्यावाचून मोक्षप्राप्ती नाही' या कल्पना काय सांगतात? शिवाय आत्मा हाही पुरुषवाचकच आहे ! आणि देह ही स्त्री! आत्मा शुद्ध, शरीर अपवित्र. परमात्म्यालाही लिंग आहेच. तेही फक्त पुरुषांचे! या कल्पनांचे काय? म्हणून वैचारिक प्रबोधन करताना धर्मकल्पनांवरही आघात होणारच, आणि तेथे कार्यक्रमाच्या पातळीवर केलेल्या आघाड्या मोडून पडतील. स्त्री-मुक्ती म्हणजे कुटुंब नको, मुक्त लैंगिक संबंध असावे, अशा कल्पना असणाऱ्या अतिजहाल स्त्रीवादी संघटना आहेत. त्यांच्याशीही आघाडी होणे कठीण आहे.

○ *आंतरजातीय विवाहसंस्था आज निघत आहेत. तुम्हांला याबद्दल काय वाटते?*

०० जातीपाती नष्ट करण्यासाठी असे कार्यक्रम उपयुक्त आहेत, पण दोन गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. आपल्या प्रत्येक जातीच्या रीतीरिवाजात फरक खूप असतात व तेच पुढे भांडणांना कारणीभूत होतात. म्हणून परिपत्नींची मने जुळलेली असणे महत्त्वाचे आहे. म्हणून प्रेमविवाह असावेत. दुसरे असे की, समाजाच्या असे विरोधात जाण्यासाठी वैचारिक बैठक हवी, अन् धैर्य आणि संयम हवा. नाही तर यातून जास्त दुःखे निर्माण होतात. सजातीय लग्नेही मोडतात, त्येवळी जातिसंस्था काहीही करीत नाहीत; पण आंतरजातीय लग्न मोडले का पुढच्यांचा रस्ता बंद होतो.

आज नवे नवे समाज नव्याने सुशिक्षित होते आहेत आणि सुस्थितीमध्ये येत आहेत. बुभुक्षित समाजात पैशाची हाव जास्त. गैरप्रकार, स्वैराचार, भ्रष्टाचार हेही जास्ट. कुटुंबनियोजन, गर्भपाताची सुलभता अशा नव्या वैद्यकशास्त्रामुळेही स्वैराचार वाढतो. जुनी बंधने संपतात. कर्म व त्याचे अपरिहार्य फळ यांतील संबंध तुटला की प्रथम स्वैराचार वाढेलच व त्यामुळे जुन्या कल्पना, परंपरा यांवर आघात होतातच. या सर्वांचा सखोल विचार स्त्री-मुक्तीसाठी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांनी केला पाहिजे.

## प्रकरण ६

## पुरोगामी विचारवंत

१९८०नंतर नानासाहेब गोरे यांनी जे वैचारिक लेखन केले, त्यामध्ये त्यांनी भारतीय जीवनाच्या संदर्भात सामाजिक समतेला अग्रस्थान द्यावे लागेल हा विचार परखडपणे मांडला आहे. महात्मा ज्योतिराव फुले, आगरकर आणि डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे समर्थन नानासाहेबांनी आग्रहाने केले. समाजवादी विचारांना सामाजिक समतेचे अधिष्ठान असलेच पाहिजे, अशी भूमिका स्पष्टपणे मांडली. हिंदू धर्मातील जातिभेदांवर कठोर टीका केल्याबद्दल त्यांना जहरी टीकेला तोंड द्यावे लागले. हिंदुत्वावादी विचारांच्या काही विकृत मनोवृत्तीच्या लोकांनी नानासाहेबांना बीभत्स पत्रे लिहिली आणि फोनवरून गलिच्छ शिव्या दिल्या. परंतु नानासाहेब डगमगले नाहीत. त्यांनी त्यांच्या विचारांना कधीही मुरड घातली नाही.

पुण्यामध्ये काही महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शंकरराव खरात यांच्या 'तराळ-अंतराळ' या आत्मचरित्रावर चर्चा आयोजित केली होती. त्या चर्चेचे उद्घाटन नानासाहेब गोरे यांनी केले. या चर्चेला मी हजर होतो. नानासाहेबांच्या भाषणाचे सविस्तर वृत्त मी वृत्तपत्रांत दिले होते. नानासाहेबांच्या भाषणाचा आशय पुढीलप्रमाणे होता - नानासाहेब म्हमाले, "मी समाजवादी चळवळीत अनेक वर्षे काम केले आणि आर्थिक व सामाजिक समतेचा पुरस्कार केला. मात्र आपल्या समाजातील दलितांच्या जीवनाच्या भीषण वास्तवाची दाहक जाणीव मला शंकरराव खरातांचे आत्मचरित्र वाचले तेव्हाच झाली. शरमेने माझी मान खाली झाली. मी मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबात वाढलो. आमच्या घरात वर्षात एकदा तरी मुलांना नवे कपडे मिळत असत. परंतु शंकरराव लहान असताना त्यांच्या वडिलांना हे करणे शक्य नव्हते. गावात कोणाचा मृत्यू झाला की त्या मढ्यावरील कापडाचा कपडा मुलांना मिळे. ही भयानक घटना वाचताना अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीला किती दुःख सोसावे लागले, हे समजले आणि सामाजिक विषमतेचा खरा अर्थही उमगला. शंकरराव खरातांचे लहानपणीचे जीवन, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यामुळे त्यांना आलेले आत्मभान आणि पुढे जिद्दीने शिक्षण पुरे करून गरिबांची वकिली करणारे आणि निर्भयपणे विचार मांडणारे, समतेसाठी संघर्ष करणारे शंकरराव खरात हा त्यांच्या जीवनाचा प्रवास मला उद्बोधक वाटतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा निकटचा सहवास लाभल्यामुळे खरातांचे आयुष्य कसे बदलून गेले, हे वाचताना बाबासाहेबांचे कार्य कसे क्रांतिकारी होते हेही समजून येते. शंकरराव खरातांच्या आत्मचरित्राने

मराठी साहित्यात फार मोलाची भर पडली आहे असे मला वाटते." नानासाहेब घरी जाताना मला म्हणाले, 'प्रधान, आपण पांढरपेशी माणसं जे सुरक्षित जीवन जगतो, त्यामुळे आपल्याला शंकररावांच्या वाट्याला लहानपणी इतके कटु अनुभव आले असतील, याची कल्पनाही नसते. आपल्या समाजात जाती-जातींच्यामध्ये किती प्रचंड भिंती आहेत, याची आपल्याला अद्यापही पुरेशी कल्पना नाही."

डॉ. बाबा आढाव यांच्या 'एक गाव, एक पाणवठा' या मोहिमेबद्दल नानासाहेबांनी डॉ. आढावांचे एका सभेत अभिनंदन करताना जे भाषण केले त्याचा आशय पुढीप्रमाणे होता... "महात्मा ज्योतिबा फुले यांची त्यांच्या घरातील हौद सर्व जातींच्यासाठी महार-मातंग या त्यावेळी अस्पृश्य मानलेल्या जातीतील लोकांसाठी खुला केला हे क्रांतिकारक कार्य होते. मी विद्यार्थी असताना मला या गोष्टींचे महत्त्व कळत नव्हते, परंतु पुढे चळवळीत काम करताना मला आपल्या समाजातील जातिव्यवस्थेमुळे दलितांच्यावर किती भयंकर अन्याय झाला हे मला कळून आले. डॉ.बाबा आढाव हे म.फुले यांच्या समाजमानसातील अस्तृश्यतेची विकृत भावना नष्ट झालेली नाही ही दुर्दैवी आणि शरम वाटावी अशी गोष्ट आहे."

दुसऱ्या एका साहित्यचर्चेत नानासाहेब गोरे म्हणाले, "आधुनिक मराठी साहित्य लिहिणारे लेखक मुख्यतः पांढरपेशे मध्यमवर्गीय होते. त्यांच्या अनुभवांचे क्षेत्र मर्यादित होते. डॉ.केतकर यांनी या साहित्याला सदाशिवपेठी म्हटले. त्यावेळी लिहू लागले, त्यावेळी मराठी साहित्यात मोलाची भर पडली असे मला वाटते. बापूसाहेब माटे यांचा एक लेख आहे, त्यामध्ये विविध उद्योग करणारे सुतार, चर्मकार आदी समाजातील लोक लिहू लागले तर मराठी भाषा कशी संपन्न होईल, हे त्यांनी फार सुंदर रीतीने सांगितले आहे. केवळ मराठी भाषाच नव्हे, तर मराठी साहित्याचा आशयही व्यापक, विशाल झाला पाहिजे असे मला वाटते. दलित समाजातील लेखकांच्या आत्मचरित्रामुळे मराठी वाचकांना पूर्वी अपरिचित असलेल्या, भीषण अन्यायाने ग्रासलेल्या दलित समाजाच्या जीवनाची ओळख झाली. रावसाहेब मोरे यांचे 'गबाळ' हे आत्मचरित्र मी वाचले, तेव्हा भटक्या जमातीला जगणे किती दुष्कर होते, हे त्यावेळी मला उमगले. खेडेगावातील लोक जेथे शौचाला जातात, त्या जागेच्या जवळ या भटक्या जमातीतील लोकांना राहावे लागे, तेथेच त्यांच्या बायका भाकरी करीत, स्वयंपाक करीत हे वाचताना मला आपल्या समाजस्थितीबद्दल संतापही आला आणि अपराधीही वाटले.

आपल्या समाजात विशेषतः कर्नाटकाला लागून असलेल्या प्रदेशात देवदासीची प्रथा आहे. या देवदासींच्या जीवनाचे वर्णव करणाऱ्या कादंबऱ्यामुळे या

दुर्दैवी स्त्रीयांच्या हालअपेष्टांची मराठी वाचकाला कल्पना आली. अशा साहित्याचे मूल्यामापन कलेचे निकष लावून करण्यात मला स्वारस्य वाटत नाही. आपल्या समाजस्थितीचे, उपेक्षितांच्या जीवनाचे चित्रण करणाऱ्या या साहित्याचा संवेदनशील वाचकांवर जो परिणाम होतो, तो मला फार महत्त्वाचा वाटतो. अशा साहित्यामुळे सामाजिक सुधारणेच्या चळवळीलाही गती येते, हेच फार महत्त्वाचे आहे.”

राजकारणातील नैतिकता या विषयावर एक चर्चा झाली, तेव्हा सुरुवातीच्या वक्त्यांनी ना.गोपाळ कृष्ण गोखले यांच्या राजकारणाचे अध्यात्मीकरण झाले पाहिजे, या उद्गाराच्या नैतिकतेचा आशय स्पष्ट केला. म. गांधींनी त्यांचे गुरू ना. गोखले यांची परंपरा अधिक संपन्न कशी केली ते सांगितले. पुढे जयप्रकाश नारायण यांनी साधनशुचितेवर कसा भर दिला यावरही ते बोलले. त्यांच्यानंतर बोलताना नानासाहेब म्हणाले, “गांधीजींनी राजकारणात साध्य-साधन विवेक सांगताना साधने ही साध्याला अनुरूप असली पाहिजेच आणि उदात्त ध्येये सुद्ध साधनांनी नैतिक मार्गानेच साध्य होतील असे सांगितले. मार्क्सने ‘एन्ड जस्टिफाइज दी मीन्स’ - साध्य उदात्त असेल तर साधने कशीही, कोणतीही असली तरी हरकत नाही, ही जी भूमिका मांडली, त्याच्याविरुद्ध गांधीजींची भूमिका आहे. मार्क्सच्या भूमिकेचे दुष्परिणाम आपण रशियात व अन्यत्रही पाहिले आहेत. मला गांधीजींची भूमिकाच योग्य वाटते. परंतु आज या विषयाच्या एका वेगळ्याच बाजूवर मी बोलणार आहे…” नानासाहेब म्हणाले, “नैतिकता या शब्दाचा आशय प्रथम स्पष्ट करणे आवश्यक आहे. एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राने स्वातंत्र्या नष्ट करून त्या राष्ट्राला गुलाम करणे, हे अनैतिक आहे. लो. टिळकांनी म्हटल्याप्रमाणे स्वराज्य हा प्रत्येक व्यक्तिचा, राष्ट्राचा जन्मसिद्ध हक्क आहे. या अर्थाने आपल्या स्वातंत्र्यसंग्राम हा नैतिक भूमिकेवर अधिष्ठित होता. त्याचप्रमाणे धनिकांच्या वर्गाने, भांडवलदारांनी आणि जमीनदारांनी कामगारांचे आणि शेतकऱ्यांचे शोषण करणे, त्यांच्या श्रमांचे योग्य मूल्य त्यांना न देणे हे अनैतिक आहे. समाजवादी विचार हा अशा श्रमिकांच्या आर्थिक शोषणाला, पिळवणुकीला विरोध करणारा आहे आणि समाजवादी चळवळ या नैतिक विचारावर आधारलेली आहे. भारतामध्ये म. फुले, महर्षी शिंदे, डॉ. आंबेडकर आदींनी सामाजिक विषमतेविरुद्ध जो लढा दिला, त्यालाही असेच नैतिक अधिष्ठान आहे. आपल्याकडील जातिव्यवस्था ही अन्याय करणारी आहे. जन्मावर आधारलेली उच्चनीच जातींची व्यवस्था ही सर्वथैव अनैतिक आहे. तथाकथित उच्च जातींनी दलितांना ज्ञानाचे दरवाजे बंद केले; सर्व बाबतींत हीन लेखून त्यांना अमानुष रीतीने

वागविले. बहुजन समाजाच्या श्रमिकांना, शेतकऱ्यांनाही उच्च जातींनी तुच्छ लेखले. हे सर्व अनैतिकच होते, म्हणूनच सामाजिक समतेसाठी केलेला संघर्ष, हा नैतिकतेवर आधारलेली चळवळ होती.

स्त्री-मुक्ती आंदोलनाचे स्वरुपही असेच नैतिक आहे. स्त्रियांचे शोषण, त्यांच्यावरील अन्याय यांचे विस्ताराने वर्णन करण्याची या चर्चेत आवश्यकता नाही. स्त्रियांना आपल्या समाजात ज्ञानापासून कसे वंचित राहावे लागले, त्यांच्यावर आपल्या समाजात किती बंधने होती, पांढरपेशा समाजातील विधवा स्त्रियांची अवस्था कशी दयनीय होती, कुटुंबात पुरुषांची अरेरावी कशी चालत असे आणि बऱ्याच ठिकाणी ती अद्यापही कशी चालू आहे, ते आपण जाणता. स्त्रियांना आणि पुरुषांना समान हक्क असणे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. ही समानता प्रस्थापित करण्यासाठी चाललेल्या स्त्री-मुक्तीच्या चळवळीचे स्वरूप नैतिकच आहे. मी असे मानतो की, प्रत्येक माणसाच्या अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा ज्याप्रमाणे भागल्या पाहिजेत, त्याचप्रमाणे त्याच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी त्याला शिक्षणाची संधी मिळालीच पाहिजे. इतकेच नव्हे तर ज्या जलित समाजाचा शतकानुशतके छळ झाला, ज्या दलितांना आणि अन्य मागासवर्गीयांना ज्ञानापासून वंचित ठेवले गेले, त्यांना शिक्षणासाठी जादा संधी दिली पाहिजे. मंडळ आयोगाच्या शिफारसींना उच्च मानल्या जाणाऱ्या जातींनी केलेला विरोध सर्वथैव अयोग्य होता. मंडल आयोगाची भूमिका सामाजिक न्यायाची होती. सामाजिक न्याय हाच नैतिकतेचा आशय आहे असे मी मानतो.”

शंकरराव खरातांनी नानासाहेबांवर लिहिले आहे, ‘दलितांच्यावर होणाऱ्या अत्याचारांबाबत नानासाहेबांनी त्यांचे जे विचार निर्भीडपणे मांडले आहेत, ते फारच मोलाचे असून नव्या पिढीला योग्य दिशा दाखविणारे असेच आहेत.’ नानासाहेबांनी आपल्या एका लेखात लिहिले आहे, ‘आम्ही त्रैवर्णिकांनी शूद्रांशी म्हणा, नागांशी म्हणा की अनार्यांशी म्हणा, जे वैर महाभारतकालात धरले ते कायमचे असून आजही त्यांना जाळण्याचा, उघडेनागडे करण्याचा आमचा निंद्य धंदा आम्ही चालूच ठेवला आहे... सगळा उपनिषदांचा वेदांत, भगवद्गीतेची आणि संतांची सर्वांभूती ईश्वर पाहण्याची शिकवण, एकनाथांची सगळी उदारता, महात्मा फुल्यांपासूनच्या सामाजिक क्रांतिकारकांचा अट्टाहास आणि आमच्या घटनेतील सगळी कलमे आमच्या कृतींनी व्यर्थ ठरवली आहेत. हरिजनांबद्दलची आमची द्वेषभावना इतकी खोलवर व घट्ट रुजली आहे, की तिच्यावर ऐहिक विचारांचा किंवा आध्यात्मिक मूल्यांचाही परिणाम होत नाही.’

थोर समाजसुधारक, समाजवादी विचारांचे पत्रकार आणि मुस्लिम सत्यशोधक समाज या संस्थेचे संस्थापक हमीद दलवाई यांच्याबद्दल नानासाहेब गोरे यांना फार प्रेम वाटत असे. हमीद दलवाई यांचे अकाली निधन झाले, यामुळे एस.एम.जोशी आणि नानासाहेब गोरे या दोघांनाही फार वाईट वाटले. हमीद दलवाई यांच्या निधनानंतर त्यांच्या काही स्नेह्यांनी एक बैठक बोलावली होती. त्या बैठकीला नानासाहेब आणि मीही हजर होतो. नानासाहेब जे बोलले त्याचा आशय पुढीलप्रमाणे होता... "हमीद दलवाई यांना मुस्लिम समाज आधुनिक व्हावा, मुस्लिम तरुणांनी महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनाच्या प्रवाहात सामील व्हावे, असे वाटत असे. यासाठी त्यांनी शिक्षणाबाबत केलेली एक सूचना मला फार महत्त्वाची वाटते. ते म्हणत की मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांनी मराठी माध्यमाच्या शाळांतच शिकावे. या विद्यार्थ्यांनी उर्दू भाषेचा अभ्यास जरूर करावा; परंतु ते उर्दू माध्यमाच्या शाळांतून शिकले की त्यांना महाराष्ट्रातील नोकरी मिळण्यात उडचण येते आणि त्यापेक्षाही मराठी भाषिक समाजाला ते काहीसे दुरावातात. दलवाई यांची ही सूचना मुस्लिम विद्यार्थ्यांच्या हिताचीच आहे. असे असूनही मुस्लिमांनी ती स्वीकारली नाही, याचा मला खेद वाटतो. प्रत्येक राज्यात तेथील राज्यकारभार, शिक्षण आदी कामे त्या राज्यातील लोकांच्या मातृभाषेतच चालणे इष्ट आहे. दुर्दैवाने मुस्लिम समाजावर ज्या मुल्ला-मौलवींचा प्रभाव आहे, त्यांना मुस्लिम सामाजाने आपली वेगळी आयडेंटिटी टिकवावी असे वाटते आणि त्यामुळेच त्यांनी हमीद दलवाईंना मुस्लिम समाजाचे शत्रू मानले."

नानासाहेब पुढे म्हणाले, "आपल्या समाजात धर्माधर्मांमध्ये, जातिजातींमध्ये ज्या भिंती उभ्या आहेत, त्यामुळे आपल्या समाज जीवनाच्या चिरफळ्या झाल्या आहेत. माझ्या परिचयाचे, ओळखीचे मुस्लिम वकील आहेत, डॉक्टर आहेत, प्रोफेसर आहेत. परंतु माझ्याबरोबरीचा जिवाभावाचा मुस्लिम मित्र फक्त युसूफ मेहेरअलीच होता. यूथ लीगच्या कामामुळे, स्वातंत्र्य चळवळीत आम्ही एकत्र आलो, त्यावेळी मेहेरअलींचा उमदा स्वभाव, त्यांची देशभक्ती, त्यांची बुद्धीमत्ता, विविध विषयांचे त्यांचे वाचन यामुळे मला त्यांच्याबद्दल फार आपुलकी वाटे. काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना १९३४ साली त्यावेळी जयप्रकाश नारायण, एस. एम. जोशी, मी यांच्यासमवेत युसूफ मेहेरअलीही पक्षाचे संस्थापक-सदस्य होते. दुर्दैवाने त्यांची प्रकृती लवकर खालावली आणि त्यांचे अकाली निधन झाले. त्यावेळी त्यांच्या अंत्ययात्रेत आम्ही मित्र होतो, परंतु त्यांच्या समाजातील अनेकांनी मेहेरअलींचा देशाच्या फाळणीला विरोध असल्यामुळे त्यांना परकेच मानले. मेहेरअलींच्या

अंत्ययात्रेला ते आले नाहीत. हमीद दलवाई यांच्याबाबतही हेच घडले. दलवाई यांच्या स्वभावही युसूफ मेहेरअलींसारखा उमदा होता. ते धडाडीचे कार्यकर्ते होते. दलवाई यांना धमक्या देणारे फोन येत, पण ते कधी डगमगले नाहीत. सामाजिक सुधारणेचा त्यांच्या विचार मांडीत ते महाराष्ट्रभर फिरले. 'मुस्लिम सत्यशोधक समाज' हे त्यांच्या संस्थेची नावही मला फार आवडते. म.जोतिराव फुले यांनी सत्यशोधक समाज स्थपन केला, सामाजिक सुधारणा करण्यास स्वतःच्या घरापासून सुरुवात केली. त्यावेळी सनातनी हिंदूंचा त्यांना कडवा विरोध होता. दलवाई यांनी म. फुले यांचाच वारसा निर्भयपणे पुढे चालविला व या संस्थेच्या कार्यकर्त्यांनी हमीद दलवाईंचे काम पुढे चालविले पाहिजे, वाढविले पाहिजे. पुरोगामी विचारांच्या सर्व व्यक्तींनी, संस्थांनी दलवाई यांना पाठिंबा दिला होता. पुरोगामी विचारांच्या सर्व व्यक्तींनी, संस्थांनी दलवाई यांना पाठिंबा दिला होता. हे कार्य करीत राहणाऱ्या तरुण कार्यकर्त्यांनाही आपण सर्वांनी पाठिंबा द्यावयास हवा."
सभेनंतर घरी जाताना नानासाहेब मला म्हणाले, "मुस्लिमांच्यात समाजसुधारणेचे काम करणे फारच अवघड आहे. कालानुरूप जुन्या रुढी बदलल्या पाहिजेत; मुस्लिम स्त्रियांवरील अन्याय दूर झाला पाहिजे, हे ज्यावेळी हमीद हलवाई कंठशोष करून सांगत होता, त्यावेळी तो इस्लामच्या विरोधी आहे, इस्लामचा शत्रू आहे, असेच बहुसंख्य मुस्लिमांनी मानले. सगळ्याच धर्मांतील कर्मठ लोकांनी समाजसुधारकांचा छळ केला. ब्रूनोने पृथ्वी सूर्याभोवती फिरते हे सांगितल्याबद्दल ख्रिस्ती धर्मगुरूंनी त्याला जिवंत जाळले. आपल्या देशात कायद्याचे राज्य नसते, तर मुल्ला-मौलवींनी हमीदला अशीच देहांताची शिक्षा दिली असती. हमीदचे उदात्त हेतू समजून घेणारे मुस्लिम पुढारी बोटावर मोजण्याइतकेही नाहीत, याचे मला फार वाईट वाटते."

नानासाहेबांनी लिहिलेल्या निवडक प्रस्तावनांच्या 'पारख' या संग्रहाला त्यांच्या वैचारिक लेखानामध्ये विशेष महत्त्वाचे स्थान आहे. नानासाहेब गोरे यांनी अनेक पुस्तकांना प्रस्तावना लिहिल्या. या प्रस्तावनांमध्ये पुस्तकाचा सारांश सांगणे किंवा लेखकाच्या पाठीवर थाप मारणे असा जुजबी प्रकार कोठे केलेला आढळत नाही. ज्या पुस्तकाला प्रस्तावना लिहावयाची त्या पुस्तकाचे मूल्यमापन करतानाच त्या पुस्तकात मांडलेल्या आणि चर्चा केलेल्या विषयांसंबंधी मूलग्राही आणि रोखठोक विवेचन नानासाहेब करीत असत. बा. न. राजहंस यांनी लिहिलेल्या 'लोकनायक जयप्रकाश - चरित्र व कार्य' या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेत नानासाहेबांनी जयप्रकाश नारायण यांच्या व्यक्तिमत्वातील उदात्तता आणि अपूर्णता या दोन्हींसंबंधी

सुस्पष्ट विवेचन केले आहे. जयप्रकाशजींच्या जीवनदानाची चिकित्सा करून त्या निर्णयाशी नानासाहेबांनी त्यांचा असलेला मतभेद स्पष्टपणे मांडला आहे. त्याचबरोबर त्यांच्या जीवनाबद्दल साकल्याने लिहिताना म्हटले आहे, "तमामधून प्रकाशात, जडामधून तरलात आणि पार्थिवामधून अवकाशात यथेच्छ संचार करण्याची शक्ती असणारे पंख ज्या व्यक्तींना लाभतात त्या व्यक्ती असामान्य ठरतात. 'ज्ञानाच्या कुंपणापलीकडे' पाहण्याची शक्ती ज्यांच्यामध्ये आहे अशा सामर्थ्यवान, द्रष्ट्या व्यक्तीपैकी जयप्रकाश एक आहेत, असे मी मानतो." आणीबाणीतील जयप्रकाशजींच्या-बद्दलची पुढील आठवण नानासाहेबांनी लिहिली. प्रकृती अतिशय खालावल्यामुळे जयप्रकाशजींची तुरुंगातून सुटका झालेली होती, परंतु आणीबाणी चालूच होती. त्यावेळी नानासाहेब पाटण्याला गेले असताना एक दिवस ते उठले तेव्हा जयप्रकाशजींच्या आरामखुर्ची शेजारी पं. नेहरूंचा मोठा फोटो आणि त्यासमोर ताजा पुष्पगुच्छ त्यांना दिसला. नानासाहेबांनी त्याबद्दल विचारल्यावर जयप्रकाशजी म्हणजे, 'आज पंडितजी की जन्मतिथी है ना?' नानासाहेबांनी पुढे लिहिले आहे; 'जवाहरलालजींच्या कन्येचीच हुकूमशाही भारतभर चालू आहे आणि तिनेच आपल्याला बंदिवासात ठेवले हे सर्व जणू जायप्रकाश विसरले होते. हा देखावा नव्हता. घराच्या घरी पं.नेहरूंना वाहिलेली ही श्रद्धांजली होती... मला हा बोध झाला की ही मनाची सरलता, वैर विसरण्याची शक्तीच लोकशासनाचा व सज्जन जीवनाचा पाया बनू शकतो."

साने गुरुजींनी त्यांची पुतणी सुधा हिला जी पत्रे लिहिली ती दर आठवड्याला ते 'साधना' साप्ताहिकात प्रसिद्ध करीत. कारण ही पत्रे केवळ सुधाला लिहिलेली नाहीत. ती सुधाच्या बरोबरीच्या मुला-मुलींनाही लिहिलेली. या पत्रांचे तीन खंड 'सुंदर पत्रे' म्हणून प्रसिद्ध झाले. 'सुंदर पत्रे'ची प्रस्तावना म्हणून नानासाहेब गोरे यांनी सुधास पुढील पत्रच लिहिले आहे-

"सुधा,

तुला तुझा अण्णांनी-साने गुरुजींनी लिहिली तशी पत्रे पूर्वी मराठीत कोणी लिहिली नाहीत, आणि पुढेही कोणी लिहीत असे वाटत नाही. काचेच्या पात्रात ठेवलेल्या सोनेरी माशांची प्रत्येक हालचाल ज्याप्रमाणे बाहेरून दिसते, त्याप्रमाणे तुला लिहिलेल्या प्रत्येक पत्रातून गुरुजींचे-तुझ्या अण्णांचे मन स्पष्ट दिसून येत असे. त्यांचे आभाळाएवढे विशाल मन, शिरीषासारखे कोमल मन, धरित्रीसारखे पावन मन त्या पत्रातून व्यक्त झाले आहे... साने गुरुजींना लिहिताना पाहण्यातसुद्धा मजा होती. कोठे अडणे माहीत नाही. कोठे खाडाखोड सापडायची नाही. मशिनची जशी

टीप पडत जाते तसे त्यांच्या लेखणीतून टपटप् शब्द पडत जात. अक्षर बारीक अन् स्वच्छ. जिरग्याच्या तांदुळासारखे... लिहू लागले की त्यांना जगाचे भान उरत नसे. त्यांना कसलाही कागद चाले. टेबल नको, एकांत नको, संदर्भासाठी आजूबाजूला ग्रंथ नकोत. उखाणे, म्हणी, ओव्या, अभंग, ऋचा आठवणी सारे त्यांच्यासमोर हात जोडून उभे असे. लिहू लागले म्हणजे जशी साने गुरुजींची लेखणी चाले त्याप्रमाणे बोलू लागले की त्यांची वाणी चाले... जशा श्रावणातल्या सरीच. इमर्सनच्या निबंधातलं वाक्य, शेक्सपिअरची एखादी उक्ती, वेदातील ऋचा भर्तृहरी राजाचा श्लोक, ज्ञानेश्वरांची ओवी, तुकोबारायांचा अभंग, टागोराची भव्य भरारी... काय काय त्यांना आठवे. त्यामुळे सुधा, ही पत्रे म्हणजे स्मृतिरत्नांनी भरलेले बेचाळीस रांजण. पक्षीण दूर दूर रानावनात भटकते आणि वेचक चाऱ्याचे घास आपल्या पिलांसाठी घेऊन येते. त्याप्रमाणे गुरुजींनी - तुझ्या अण्णांनी हे बेचाळीस घास तुझ्यासाठी आणले आहेत." नानासाहेबांनी लिहिलेली ही प्रतावना म्हणजे एक आदर्श रसग्रहण आहे.

'सत्यशोधनाची वाटचाल' या डॉ. बाबा आढाव यांच्या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेत नानासाहेब गोरे यांनी बाबा आढाव हे म. जोतिराव फुले यांचा समाजक्रांतीचा वारसा निर्भयपणे आणि समर्थपणे कसा चालवीत आहेत, याचे अत्यंत मार्मिक विवेचन केले आहे.

डॉ. अनिल अवचट यांच्या 'माणसं' या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेत नानासाहेब गोरे यांनी डोंबारी, कोल्हाटी, फासेपारधी आदी अनेक सर्वथा दुर्लक्षित जमातींच्या जीवनाचा अचूक वेध घेतल्याबद्दल डॉ.अनिल अवचट यांची प्रशंसा केली आहे. अवचट यांच्या भाषेत मनाला चटका बसेल अशी धग, वाचकाला बरोबर ओढून नेईल असा तिचा ओघ आहे, हे सांगून नानासाहेबांनी अवचटांच्या परदुःख पाहून गहिवरणाऱ्या मनाचे कौतुक केले आहे. प्रस्तावनेच्या शेवटी सांदीकोपऱ्यात पडून राहिलेल्या अनेक जाती-जमाती व मानवसमूह यांच्या समस्यांचे स्वरूप मराठी वाचकाला समजावून सांगितल्याबद्दल डॉ. अनिल अवचट यांना नानासाहेबांनी मनःपूर्वक धन्यवाद दिले आहेत.

१९७५ ते १९७७ या आणीबाणीतील काळात काही राजबंद्यांनी आपल्या आप्तांना, मित्रांना लिहिलेली पत्रे आणि त्यांना आलेली पत्रे यांचे दोन खंड डॉ.अरुण लिमये यांनी संपदित केले. या पत्रसंग्रहांना शीर्षक दिले होते, 'गाथा स्वतंत्रेची'. या संग्रहाला नानासाहेब गोरे यांनी 'बिकट वाटेवरील सहप्रवासी' अशी प्रस्तावना लिहिली आहे. त्यात त्यांनी लिहिले आहे -

“हे सर्व साहित्य अस्सल आहे. जी पत्रे या संग्रहात समाविष्ट केलेली आहेत, ती सर्व प्रांजळ आहेत आणि निर्भेळ आहेत. त्यात कोणताही देखावा नाही. ‘थाट समरीचा’ तर नाहीच नाही, कारण हे सर्व साहित्य म्हणजे दीर्घ विश्वब्धालाप आहे. आपण आज जे लिहीत आहोत, ते पुढे कधी प्रसिद्ध होणार आहे, अशी जाणीव यांपैकी कोणाही पत्रलेखकाला पुसटपणानेसुद्धा नव्हती.

या संग्रहातील मनाला अतिशय सुखद वाटणारा भाग म्हणजे बंदिशाळेतून बाबा आढाव, बापू काळदाते, मधु दंडवते, अरुण लिमये, कुमार सप्तर्षी, संदिपान, मृणाल गोरे, प्रमिला दंडवते, बा. न. राजहंस, अमर हबीब इत्यादींनी लिहिलेल्या पत्रांतील कणखर विचार आणि मनोज्ञ वाग्विलास. बाबा आढावांचे जे सविस्तर पत्र पृष्ठ १९ ते ३४ मध्ये दिलेले आहे, त्या पत्रामधून बाबा आढावांचे समग्र व्यक्तिमत्व वाचकांच्या डोळ्यांसमोर उभे ठाकते. उपेक्षितांबद्दलचा केवळ कळवळाच त्यांच्या मनात नाही; तर ते वाचन, मनन करणारे आणि मानवतावादाचा निदिध्यास घेतलेले एक श्रेष्ठ कार्यकर्ते आहेत, हे आपणास पटते.

श्री. मधु लिमये यांनी इंदिराजींच्या अजमेर येथे व्हावयाच्या संकल्पित स्वागताबद्दल नरसिंहगडच्या कारागृहातून जे पत्र खडसावून लिहिले आहे, त्याचाही उल्लेख येथे करायावस हवा. मधु लिमये लिहितात, ‘कहते है की मुगले आझमने अजमेरकी सफर चिलचिलाती धूप में नंगे पैर की थी। अंग्रेजोके बडे लाटसाहब के लिए भी स्वागत का ऐसा इंतजाम शायद ही हुआ था। फिर दो-तिहाई कंगाल दुनियाके नेताके लिए शानका ऐसा अभद्र प्रदर्शन क्यूँ? (पृ.१००). इंदिराबाई ज्या रस्त्याने जाणार होत्या, त्यावर गुलाबपुष्पांची चादर पसरण्याचा ठराव स्वागत-समितीने केला होता, त्याच्या संदर्भात हे पत्र मधु लिमये यांनी लिहिले होते.

मधू लिमये आणि भाई वैद्य यांची पत्रे तर अपेक्षेप्रमाणे बहारदार आहेतच. पण विशेष आनंद होतो तो भाई वैद्यांचा मुलगा अभिजित आणि प्रा. सदानंद वर्दे यांची मुलगी झेलम यांची पत्रे वाचून. मधु व प्रमिला दंडवते यांचा मुलगा उदय याचे पत्रदेखील झोकेदार आहे. या मुलांच्या मनात निराशेचे सावट कोठेही दिसत नाही. उलट उत्साहाने त्यांची मने फुललेली दिसतात!”

‘भ्रम आणि निरास’ या डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेत नानासाहेब म्हणतात, ‘ज्याला ज्याला अंधश्रद्धेविरुद्ध उभे ठाकावयाचे असेल, त्याला त्याला आपल्या घरापासूनच नव्हे तर स्वतःपासूनच प्रारंभ करावा लागणार आहे आणि एक एक पाश तोडीत पुढे सरकावयास लागणार आहे. ‘सत्य

असत्यासी मन केले ग्वाही, मानियले नाही बहुमता।' अशा निर्धाराने त्याला काम करावे लागणार आहे. माझी क्रांती माझ्यापासून सुरू होते, असे गांधीजी म्हणत, ते याच अर्थाने.

नरेंद्र दाभोळकरांचे पुस्तक अशा निर्धाराच्या कार्यकर्त्यांना उपयोगी पडेल याबद्दल मला शंका वाटत नाही. प्रामाणिक अभ्यासूला आणि कार्यकर्त्याला युक्तीवादाने चालू अंधश्रद्धांचे स्वरूप आणि त्यांची व्याप्ती उलगडून दाखवील अशी ही पोथी आहे."

'भारतातील युद्धाशास्त्राची उपेक्षा' या ज. द. जोगळेकर यांच्या प्रबंधाला लिहिलेल्या प्रस्तावनेत नानासाहेब गोरे यांनी पुढील विचार मांडला आहे.

"युद्धशास्त्राची उपेक्षा झाली, असे जेव्हा श्री. जोगळेकर म्हणतात, तेव्हा त्यांना वास्तविक असे म्हणावयाचे आहे की, सर्व शास्त्रांची म्हणजे विज्ञानाचीच उपेक्षा भारतामध्ये दोन हजार वर्षे चालू राहिली... कारण युद्धतंत्र हे समाजाच्या विशिष्ट अवस्थेचाच एक भाग असते. भारतीय समाज चातुर्वर्ण्याच्या चौकटीत एकदा घट्ट बांधला गेल्यानंतर आणि त्यातील श्रेष्ठ जे ब्राह्मण, त्यांनी जी काय एकदा विद्या हस्तगत केली, तिच्या पलीकडे विद्या म्हणून काही नाही, असू शकत नाही, हा चाचुर्वर्ण्याचा उपसिद्धांता कायम झाला आणि त्यामुळेच विज्ञानाची ही उपेक्षा झाली....

स्वदेशाबद्दल व स्वकीयांबद्दल वृथाभिमान धरणे; स्वतःचे दोष झाकणे, हाच देशाभिमान आहे, असे ज्यांचे मत आहे त्यांना जोगळेकरांचा प्रबंध आवडणार नाही. पण ज्यांचे स्वदेशाबद्दलचे प्रेम डोळस आहे, त्यांना श्री. जोगळेकरांचे विवेचन अधिक डोळस करील असा मला विश्वास वाटतो."

'लोकशाहीची आराधना' हे बॅ.नाथ पै यांच्या भाषणाचे पुस्तक श्री. वासू देशपांडे यांनी संपादित केले. त्याच्या प्रस्तावनेत नानासाहेब गोरे यांनी लिहिले आहे... "नाथ पैंच्या आवाजात एक कमावलेले मार्दव असे. त्यांच्या वाणीला विलक्षण वेग होता, धार होती. मला पुष्कळदा वाटे की नाथ पै अव्वल दर्जाचे गायक बनले असते. पण नाथ पैंची मदार केवळ आवाजावर कधी नसे. संसदेमध्ये बोलायचे असले की नाथ पै किती तयारी करीत ते मी पाहिलेले आहे. त्यांनी केलेली भारभर टिपणे त्यांच्या फायलीत ठेवीत. पुरावे गोळा करीत, पण एवढ्यावर ते थांबत नसत, एखादे संस्कृत वचन, एखादे जर्मन किंवा फ्रेंच वाक्य. एखादा विनोदी चुटका अशी सगळी आयुधे घेऊन ते सभागृहात येत. त्यांची स्मरणशक्ती प्रखर होती. ते नेहरूंना उद्धृत करू लागले की, नेहरूच बोलताहेत असे वाटावे. आचार्य अत्र्यांचा किस्सा ते सांगू

लागले तर आचार्यांचा आवाज ते ऐकवीत... तथापि याचा अर्थ असा नाही, की नाथच्या वक्तृत्वकलेत बोट ठेवण्यास कोठे जागा नव्हती. स्वतःचे भाषण ऐकता ऐकता स्वतः नाथच तल्लीन होऊन वेळ विसरल्यासारखे कधी कधी वागत. श्रोत्यांसमोर हृदय मोकळे करण्याच्या भरात ते भावनावेशाने फाटते की काय, असे प्रसंग येत... पण नाथच्या वक्तृत्वाचे सामर्थ्य कोणीही नाकारणार नाही. नाथच्या शब्दकळेचे कोणतेही रूप पाहा. ते वक्त्याच्या आंतरिक सत्यनिष्ठेने, सौंदर्याने व शिवसंकल्पाने लखलकत असल्याचे लक्षात येईल. त्याच्या या सामर्थ्याची झलक हा त्यांच्या भाषणांचा संग्रह दाखवू शकेल. नानासाहेबांनी या प्रस्तावनेत वक्तृत्वकलेचे अत्यंत मार्मिक विश्लेषण केले आहे.

वसंतराव बापटांचे 'जिंकुनी मरणाला' या बारा निबंधांच्या संग्रहाच्या प्रस्तावनेला 'चरित निबंधांचे इंद्रधनुष्य' असे शीर्षक नानासाहेब गोरे यांनी दिले आहे आणि प्रस्तावनेत लिहिले आहे... 'कोणतेही लेखन वाचताना पुलकित झाल्याचा अनुभव आला. पुनःप्रत्ययाचा आनंद मिळाला की लेखकाच्या यशस्वितेची वेगळी पावती देण्याचे कारणच उरत नाही. वसंतराव बापटांचे लेखन वाचताना हा अनुभव मला अनेकावर आला. हा संग्रह वाचताना माझ्या कितीतरी पुराण्या स्मृतींना जाग आली.

वसंतरावांचे सगळे निबंध नर्तकीच्या पदन्यासाप्रमाणे रुमझुमणारे आहेत. हवा तो भाव क्षणात साकर करण्याचे कौशल्य त्यांच्या लेखणीत आहे. संस्कृत व मराठी भाषांच्या संगमात भिजून चिंब झालेली त्यांची लेखणी परिच्छेदांमागून परिच्छेद अशा अशा प्रकारे फुलवीत जाते की वाचकाला हा ताटवा अधिक मनोहरी होता, की तो, असा भ्रम पडावा. पण असे असले तरीसुद्धा 'राऊसाहेब पहिले आणि शेवटले', 'प्रिय मित्र नाथ' आणि 'चैतन्याची पुतळी हरपली', हे तीन निबंध मला कमालीचे हृदयस्पर्शी वाटले. आचार्य अत्र्यांवर इतक्या स्नेहभावनेने वसंतरावांनी लिहिले, याबद्दल त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. कारण त्यांनी आमच्यापैकी ज्या अनेकांवर अन्याय केलेला होता, त्यातले वसंतराव हे एक, पण आचार्यांचे व्यक्तित्व एवढे प्रचंड आणि बलदंड की ते त्यांच्या दोषांनी झाकोळले जाऊ शकणार नाही. मराठी साहित्याचे कोणतेही क्षेत्र नव्हते की जे आचार्यांच्या प्रतिभेने पादक्रांत केले नाही. तरवारीपेक्षा लेखणीची धार अधिक विदारक असते, याचे प्रत्यंतर आचार्यांच्या लेखणीने आमच्या पिढीला आणून दिले...

सेनापती बापट, साने गुरुजी, बापूसाहेब अशांना वसंतरावांनी त्यांच्या अभिमंत्रित शब्दांच्या शिडकाव्याने जणू काही पुनश्च जिवंत केले आहे. असे हे

व्यक्तींचे इंद्रधनुष्य वसंतरावांनी रेखाटले आहे. त्यात आचार्य अत्रे यांच्या जळजळीत तांबड्यापासून आवाबेनच्या शांत जांभळ्यापर्यंतच्या सगळ्या रंगांचा समावेश आहे आणि म्हणूनच ते इतक सुंदर दिसते आहे.”

प्रा. श्रीपाल सबनीस यांच्या डॉ. आंबेडकर यांच्यावरील पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेत नानासाहेब गोरे यांनी दलित समाजात जीवनाची नवी आकांक्ष बाबासाहेबांचे कार्य किती महान आहे हे सांगतानाच काही प्रश्नांबाबात डॉ. आंबेडकरांशी असलेले आपले मतभेदही स्पष्टपणे मांडले आहेत. त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकरांबद्दलचा आदर व्यक्त करताना लिहिले आहे - ‘डॉ. आंबेडकर त्यांचा विचार, त्यांच्या अफाट वाचनाच्या आधारे अत्यंत तर्कशुद्ध रीतीने आणि उत्कट निष्ठेने मांडत राहिले. त्यांचा प्रत्येक ग्रंथ म्हणजे एक एक तर्कशुद्ध चिरेबंदी प्रबंधच आहे.’

चिनी ब्रह्मवेत्यांचे आत्मदर्शन, अर्थात ‘ताओ ते चिंग’ची प्रस्तावना अन्य प्रस्तावनांपेक्षा अगदी वेगळी वैशिष्ट्यपूर्ण आहे.

नानासाहेब गोरे यांनी चिनी तत्त्वज्ञानाचा परिचय व्हावा म्हणून आर्थर वॅली यांचा ‘ताओ ते चिंग’चा इंग्रजी अनुवाद वाचला. ‘ए शॉर्ट हिस्टरी ऑफ चायनीज फिलॉसॉफी’ हा फुंग यू-लान यांचा ग्रंथ वाचला आणि चिनी तत्त्वज्ञान्यांमध्ये लाओ त्सू यांचे स्थान कसे वेगळे आणि किती उच्च आहे ते त्यांना समजले. त्यानंतर त्यांनी आर्थर वॅलीच्या पुस्तकावरून आचार्य लाओंच्या वचनाचा अनुवाद केला. या अनुवादाला नानासाहेब गोरे यांनी जी प्रस्तावना लिहिली. त्यामधून त्यांची भूमिका समजून येते. ती त्यांच्याच शब्दात देणे उचित होईल. नानासाहेब लिहितात... ‘आचार्य लाओंच्या वचनांचा मी अनुवाद केला, म्हणजे मला त्यांची मते पटली असा अर्थ मात्र कोणी लावू नये. सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाचे टप्पे निरनिराळे मानवसमूह कसे गाठतात, ते पडताळून पाहण्यात मला रस आहे.’ या बौद्धिक कुतूहलाने नानासाहेब गोरे यांनी जे वाचन केले त्यानंतर त्यांचा विचार त्यांनी या प्रस्तावनेच्या शेवटी मांडला आहे तो पुढीलप्रमाणे...

‘केवळ ऐहिक व्यवहारातच नव्हे तर तात्त्विक आणि पारमार्थिक विचारांमध्येसुद्धा साम्य दिसू लागते, तेव्हा असा विचार अपरिहार्यपणे सुचतो की हे साम्य ऐहिक परिस्थितीमधील साम्यामुळे परिणामस्वरूप म्हणून तर साधले जात नसेल? एका संस्कृतीत निर्माण झालेल्या विचारांचे अनुकरण अथवा आरोपण दुसऱ्या संस्कृतीत होते ते दोन मार्गांनी. एक मार्ग शस्त्रविजयाचा तर दुसरा संस्कृती किंवा विचार या अर्थी धर्मविजयाचा. बुद्ध धर्माचा प्रचार पश्चिमेकडे इराणपर्यंत आणि

चीन कोरियापर्यंत झाला तो रेशमी रस्त्याच्या वाटेने आणि श्रीलंक जावा सुमात्रा इत्यादी दक्षिण पूर्वेकडील प्रदेशात झाला तो जलमार्गाने. तसाच केरळात ख्रिस्ती धर्ममतांचा प्रचार पहिल्या शतकात झाला तो सीरिअन ख्रिश्चन इस्राएल ते भारत या जलमार्गांनी आले त्यामुळे. ही धर्मविजयाची उदाहरणे होत. पुढे सातव्या शतकापासून इस्लामचा प्रसार झाला तो मुख्यत्वे करून शस्त्रविजय होता. तसेच सोळाव्या आणि सतराव्या शतकात ख्रिस्ती धर्म शस्त्रबळानेच भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर आणि आफ्रिका, दक्षिण अमेरिका इत्यादी खंडात पसरला. बळाच्या धाकाने धर्मप्रचार किंवा तत्त्वप्रसार ही कल्पना भारतीय तत्त्वचिंतनात दिसत नाही; तशीच ती चिनी तत्त्वचिंतनातही दिसत नाही.'

नानासाहेब गोरे यांच्या 'पारख' या प्रस्तावना संग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावनेत थोर विचारवंत मधु लिमये यांनी लिहिले आहे; 'नानासाहेबांच्या ठायी रसग्रहण शक्ती, नीरक्षीर विवेक, डौलदार व अर्थवाही भाषाशैली आणि आवश्यक तो परखडपणा यांचा समुचित मिलाफ झाला असल्यामुळेच त्यांच्या प्रस्तावना अतिशय वाचनीय झाल्या आहेत.'

नानासाहेब गोरे उत्तरायुष्यात, १९८४ नंतर दरवर्षी काही दिवस त्यांची कन्या शुभा हिच्याकडे अमेरिकेत जात. नानासाहेब त्यांच्या जुई आणि सायली या नातींचे लाड करताना पाहून शुभा त्यांना एकदा म्हणाली, 'नाना, तुम्ही माझे इतके लाड कधी केले नाहीत.' यावर नानासाहेब हसून म्हणाले, 'तू लहान होतीस तेव्हा माझ्या जेलच्या वाऱ्या चालू होत्या, आणि राजकारणाची धकाधक होती. आता मी निवृत्त झालो आहे.' अमेरिकेतील वास्तव्यात त्यांनी जे पाहिले आणि अनुभवले, त्याबद्दलचे चिंतन 'पिटस्बर्ग डायरी' या त्यांच्या पुस्तकात आले आहे. या 'डायरी'त त्यांनी एका ठिकाणी लिहिले आहे, 'अमेरिकेतील व्यक्तिस्वातंत्र्य कधी कधी असे बेताल की माझ्यासारख्याला ते हास्यास्पद व भयावह वाटू लागते.' लोकशाहीच्या लंब्या-चौड्या बाता मारणाऱ्या अमेरिकेत निग्रोंना कशी वागणूक मिळते आणि रेड इंडियन समाजाचा कसा पाचोळा झाला आहे, याच्यावर गोरे यांनी नेमके बोट ठेवले आहे.

नानासाहेब गोरे यांच्या वयाला ज्यावेळी ८०वर्षे पूर्ण झाली. त्यावेळी मी त्यांना म्हणालो, "तुम्ही आत्मचरित्र लिहिले नसले, तरी तुमचा वैचारिक प्रवास कसा झाला हे तरी निदान लिहा." नानासाहेबांनी ते मान्य केले आणि 'तिमिरातुनी तेजाकडे' हा विस्तृत लेख लिहिला. या लेखातील काही भाग उद्धृत करणे मला आवश्यक वाटते, कारण नानासाहेबांच्या शब्दांतच त्यांच्या वैचारिक वाटचालीचे

स्वरूप समजून घेणे इष्ट होईल.

नानासाहेबांनी लिहिले आहे -

“गेली जवळजवळ पन्नास वर्षे मी कधी हौसेने तर कधी कर्तव्यबुद्धीने अभ्यास करीत आलो आहे; लिहीत आलो आहे. परंतु हे लिहीत असताना वा अभ्यास करीत असताना या सर्वांचा कोठेतरी प्रवाह बनला पाहिजे, अशी योजना बुद्धीपुरस्सर आखलेली नव्हती. आता मागे वळून पाहताना मात्र असे दिसते की, या सर्व अभ्यासाचा, चिंतनाचा आणि लेखनाचा एक ओघ सहजपणेच बनत होता... आपल्याला अमुक एक विचारधारा आत्मसात करावयाची असा निश्चय करून मी कोणत्याही विचाराच्या अभ्यासाला सुरुवात केली नव्हती. माणसे भेटत गेली, प्रसंग घडत राहिले, विचारांचा परिचय होत राहिला. चिंतन सुरू झाले आणि विचारप्रवाहाला दिशा लाभू लागली. आजदेखील ही प्रक्रिया चालू आहे. माझ्यामते ज्ञानाच्या किंवा विचारांच्या बाबतीत- मग ते ज्ञान अथवा विचार ऐहिक असोत की पारमार्थिक - पूर्णविरामाला जागाच नसते आणि ती नसावीही... जग हे पूर्वी घडले आणि अनंत काळपर्यंत घडत राहणार आहे, बदलत राहणार आहे आणि त्याच्यासंबंधीचे ज्ञानही बदलत वाढत राहणार आहे. म्हणून जे कोणी वेदांपाशी थांबतात, कुराणापाशी थांबतात, बायबल अथवा ग्रंथसाहेब हा अखेरचा शब्द समजतात, बुद्धं शरणं गच्छामि म्हणतात, त्या सर्वांशीच माझा मतभेद आहे. माझ्या आयुष्यातल्या पहिल्या दहा-बारा वर्षात ज्याला विचार असे म्हणता येईल, असे काही अस्तित्वात होते, असे मला वाटत नाही. त्यावेळचे माझे क्षितिज हे अगदी मर्यादित परंपरेशी जखडलेले आणि जागाकडे एका अत्यंत लहान गवाक्षातून पाहणारे होते... सर्व बाजूंनी समाज खुरटलेला होता. परंपरेमध्ये लपेटलेले माझे मन भोवताली पाहात असावे आणि त्यामुळे काही प्रश्नांचे आकडे आणि विचारांचे तंतू माझ्या डोक्यात निर्माण होत राहिले असावेत... एकदा मी कोकणात गेलो असताना माझ्या वडिलांबरोबर कालभैरवाच्या मंदिराकडे जाताना समोरून येणारा, घोंगडी खांद्यावर टाकलेला आणि कासेला फक्त लंगोटी असणारा एक झिलगा (तरुण मनुष्य) आम्हांला दिसला. आम्हांला पाहताच तो एकदम खाली बसला आणि आम्ही त्याला ओलांडून गेल्यावर तो उठून चालू लागला. मी वडिलांना विचारले, की तो आपल्याला पाहून खाली का बसला? वडील म्हणाले, “तो महार ना? त्याची सावली आपल्या अंगावर पडू नये म्हणून तो खाली बसला.” माझ्या लहानशा मेंदूतील चक्रे त्या प्रसंगाने थोडीशी फिरली असतील... माझ्या थोरल्या बहिणीचे लग्न झाल्यानंतर प्रत्येक वेळी ती सासरी जाताना डोळ्यांतून टिपे गाळी. सासरची

माणसे तिला जाच करतात, असे आई म्हणे. त्यावेळी माझ्या पारंपरिक मनातील समाधानाची साथ डुचमळली असेल; किंवा आमच्याच वाड्यातल्या सदैव तांबडी आलवणे नेसलेल्या बाया मला हळूच खुणावीत आणि आप्पा बळवंत चौकातल्या एखाद्या न्हाव्याला बोलावून आण, असे हळूच सांगत. त्यावेळी इतर बायकांचा साजश्रृंगार आणि या काकूंचे किंवा मावशींचे सदैव पांढरे राहणारे कपाळ यांमधील फरकाची बोच लागून माझे मन अस्वस्थ झाले असेल. असे अनेक प्रसंग येत होते आणि त्यामुळे माझ्या मनावर चढलेली परंपरेची पुटे थोडीफार खरवडली जात होती. मॅट्रिकची परीक्षा देण्याआधीच मी बरेच वाचलेले होते. परंतु त्या पुस्तकांकडे सामाजिक दृष्टीने पाहण्याचे सामर्थ्य माझ्या ठिकाणी त्यावेळी अजिबात नव्हते. ती शक्ती अथवा ती दृष्टी मला प्रथमतः मी आगरकरांचे निबंध वाचू लागलो, तेव्हापासून प्राप्त होऊ लागली.

१९१८ ते १९२५ पर्यंतचा काळ निरनिराळ्या घटनांनी इतका भरला होता तरी त्या घटनांचा अर्थबोध होण्याइतपत पक्वता माझ्या मनाला आली नव्हती. मॅट्रिक झालो त्या वेळेपर्यंत मी ब्रिटिश सत्तेच्या विरोधी बनलो असलो तरी मी कोठल्याही चळवळीचा, संघटनेचा किंवा वादांचा स्वीकार केला नव्हता. एस. एम. किंवा खाडिलकर या माझ्या वर्गमित्रांच्या मानाने माझे या घडामोडींबाबतचे ज्ञान अगदी मामुली होते. मी जोतिबा फुल्यांचे एक अक्षरही वाचले नव्हते, आणि मार्क्सचे तर नावही ऐकले नव्हते. शिवाजी, तानाजी, पहिले बाजीराव, तात्या टोपे, झाशीची राणी, चापेकर बंधू, सावरकर ही आमची त्यावेळची श्रद्धास्थाने. न्या. रानडे, गोपाळकृष्ण गोखले यांना आम्ही 'मवाळ' म्हणून निकालात काढीत असू... १९२५च्या जूनमध्ये फर्ग्युसन महाविद्यालयात मी पाऊल टाकले आणि माझ्या मेंदूला विचारांचे पैलू पडायला सुरुवात झाली. या अगोदर मी आगरकरांसंबंधी उल्लेख केला, तो या काळातला. फर्ग्युसन कॉलेजच्या 'ओपन शेल्फ लायब्ररी'ने मला घडविले.

१९२० मध्ये लोकमान्य टिळक यांचे देहावसान होऊन महात्मा गांधीचा उदय झाल्यापासून देशात वेगळ्याच प्रकारचे वारे वाहू लागण्यास प्रारंभ झाला होता. रशियन राज्यक्रांती, जालियनवाला बाग हत्याकांड, असहकार आंदोलन यांसारखी जनमानसाला आलेली उधाणे आपल्या खुणा जनमानसावर उमटवून गेलेली होती. सत्यशोधक चळवळीचा अतिरेक आणि त्यातून निर्माण होऊ लागलेले आत्मसंशोधन या दोन्ही प्रक्रिया त्याच काळामधील.

विचाराप्रमाणे आचार हा मंत्र कोणा एका गुरूकडून एका मंगलप्रसंगी मी

स्वीकारला नाही. माझ्या वाचनापासून आणि चिंतनामधूनच मी माझे निर्णय घेत गेलो. आगरकर, हरिभाऊ आपटे, वामन मल्हार जोशी आदींच्या लेखनाच्या वाचनातून माझे मन आकार घेत गेले. बी.ए.च्या वर्गात असतानाच मी विधवेशी विवाह करण्याचा निश्चय केला... १९३० साल उजाडले. संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव काँग्रसने लाहोर अधिवेशनात मान्य केला होता; आणि गांधीजींनी मिठाच्या सत्याग्रहाची हाक दिली. त्या आवाहनामध्ये देशाला चहूबाजूंनी वेढून बसलेला तटबंदीला भेदण्याची शक्ती आहे असे मला वाटले, म्हणून मी त्या हाकेला ओ दिली. पहिलीवहिली चार महिन्यांची येरवडा तुरुंगवासाची सजा भोगून, चक्की दळून 'नमक की रोटी'ची सजा भोगून आलेला मी पूर्वीचा राहिलो नाही. त्या चार महिन्यांत सुरवंटाचे फुलपाखरू बनले होते, मानवतावादाची पदवी घेऊनच मी येरवडा तुरुंगातून बाहेर पडलो आणि मग 'कधि न थांबलो विश्रांतिस्तव, पाहिले न मागे । बांधू न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे॥' अशा कालखंडाचा प्रारंभ झाला.

'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' मी याच सुमारास वाचला. मार्क्सच्या त्या प्रतिपादनाने जो ठसा माझ्या मनावर आणि वृत्तीवर पडला त्याला माझ्या जीवनात तोड नाही. त्या पुस्तकाच्या वाचनाने माझे विचार बदलले एवढेच नव्हे तर माझी विचारप्रक्रियाच बदलून गेली. तो निर्जीव प्रबंध नसून झंझावात होत. मार्क्सने मला मार्क्सवादी बनविले नाही, पण बुद्धीवादी बनविले. तुरुंगात कम्युनिस्ट मॅफिफेस्टो वाचल्यावर गळ्यातले यज्ञोपवीत मी नाकारले... मी काही हाडाचा क्रांतिकारक नाही. १९०७ सालापासून १९३०पर्यंतची माझी २३ वर्षे परंपरेच्या चाकोरीतूनच वाहत राहिली. चाकोरीबाहेर पडण्याचे विचार येत; पण क्रियेमध्ये त्यांचे रूपांतर होत नसे. येरवड्यातील तुरुंगवासामुळे ती चाकोरी फोडून बाहेर येण्यासाठी आवश्यक असे शारीरिक सामर्थ्य मला लाभले आणि मार्क्समुळे मानसिक सामर्थ्यही.

मार्क्सवादाचा पूर्णतया स्वीकार मी प्रारंभीची काही वर्षे केला. सोविएत रशियातील व्यवस्था ही आदर्शव्यवस्था आहे असे आम्हा कित्येकांना वाटत होते. परंतु या भ्रमातून आमची सोडवणूक झाली ती स्टालिनच्या राजवटीतील हत्याकांडामुळे बुखारिनसारखे तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ, रशियन क्रांतीतील सेनानी अशांच्या आहुती जेव्हा शेकड्यांनी पडल्या, तेव्हा माझ्या मनातल्या मार्क्सवादाला चांगलाच हादरा बसला... दुसऱ्या महायुद्धाच्या काळात भारतातील कम्युनिस्टांनी ज्या उलटसुलट कोल्हाटउड्या मारीत स्वातंत्र्य चळवळीत विरोध केला, त्यामुळे मार्क्सवाद हादेखील अपुरा आहे हा माझ्या मनाला बोध झाला... त्याचवेळी गांधींच्या विचारसरणीचीही ओळख स्वानुभवामुळे अधिकाधिक पटत चालली होती. मार्क्सच्या

विचारसरणीत वर्ग हा केंद्रस्थानी आहे, तर गांधीच्या विचारसरणीत व्यक्ती, माणूस हा केंद्रस्थानी आहे. क्रांतीची सुरुवात स्वतःपासून झाली पाहिजे, हे गांधीचे वचन मला फार अर्थपूर्ण वाटले होते आणि आजही वाटते. तरीही मी जसा मार्क्सवादी झालो नाही, तसाच मी गांधीवादीही झालो नाही. 'हिंदस्वराज्य'मध्ये गांधीजींनी जे विचार मांडले त्यांतील अनेक विशेषतः यंत्र व तंत्र यांच्यासंबंधीचे विचार मला मान्य झाले नाहीत... समाजविकासाची अंतिम स्थिती म्हणजे दंडहीन समाज, असे मार्क्स व गांधी या दोघांचेही ईप्सित आहे, पण दंडहीन समाजाची कल्पना कधीही प्रत्यक्षात येणार नाही असे माझे मत आहे.

...माझ्या तरुणपणी माझ्या मित्रांनी आणि वडीलधाऱ्यांनी मला वारंवार इशारे दिले होते की, आज जरी तू ईश्वराविषयी साशंक असलास, अज्ञेयवादी असे स्वतःला म्हणवीत असलास तरी पुढल्या आयुष्यात तुझ्यावर असे प्रसंग येतील, की ज्यावेळी तुला ईश्वराचा किंवा तुला सध्या अज्ञात असलेल्या व्यक्तिचा आधार घ्यावा असे वाटेल. मीही तेव्हा प्रांजळपणे सांगे की, 'मला असा प्रत्यय आला तर माझे मत बदलण्यास मी केव्हाही तयार राहीन.' परंतु आता ती स्थिती पालटली आहे. ज्या प्रांजळपणाने मी ती अनाग्रही भूमिका तेव्हा स्वीकारली होती, त्याच प्रांजळपणाने मला आता माझ्या ऐंशीव्या वर्षी म्हणजे माझ्या पक्व वृद्धावस्थेत असे ठामपणे सांगावेसे वाटते की गेल्या साठ वर्षांच्या माझ्या जीवनात अतिशय कष्टमय अथवा दुःखमय परिस्थिती मला अनेकवार प्राप्त झाली असतानाही, मला माझ्या बुद्धीपलीकडचा कोणताही आधार शोधण्याची एकदाही गरज वाटलेली नाही... अनंत प्रश्न आणि त्यांची अनंत उत्तरे यांचा विचार करताना गौतम बुद्धाचा पुढी विचार मला पटतो. बुद्धांनी सांगितले की, ईश्वरासंबंधी चर्चा करणे म्हणजे वेळ व्यर्थ घालवणे आहे. त्यामुळे शोध करून शिणलेल्या माझ्या ईश्वरविषयक पृच्छेची कवाडेच मी लावून घेतली आणि ज्या सृष्टीमध्ये आणि ज्या समाजामध्ये आपण जगतो, ती सृष्टी आणि तो समाज यथाशक्ती सुधारण्याचा प्रयत्न करणे, हाच योग्य मार्ग आहे, अशा निर्णयाप्रत मी येऊन पोहोचलो आहे.

तत्त्वज्ञानाच्या वाटेपेक्षा विज्ञानाची वाट मला अधिक पसंत पडते... विज्ञानाच्या साहाय्याने आज जी शस्त्रास्त्र साधने माणसाला दिली आहेत, त्याच विज्ञानाने ती निष्फळ कशी करावीत, याचेही ज्ञान माणसाला दिले आहे. चिन्हे तर अशी दिसत आहेत, की मानवबुद्धी विघातक प्रवृत्तीवर मात करू शकेल आणि सर्वसंहारातून जगाला वाचवू शकेल. जगाचा संहार करणारा अणुबॉंब वापरायचा की विनोबांच्या 'जय जगत' या घोषणेला प्रत्यक्ष व्यवहाराचा आशय प्राप्त करून द्यायचा, हे आता

मानवानेच ठरवायचे आहे.

आतापर्यंत मी कोणालाही गुरू केले नाही. गांधी आणि मार्क्सलाही नाही, कारण या सतत बदलत्या विश्वाचे आणि मानव समाजाचे अक्षरचित्र, कोणापाशी कितीही दिव्यचक्षू असले, तरी ती रेखांकित करू शकेल असे मला वाटत नाही. आतापर्यंतच्या ऋषिमुनींनी, प्रेषितांनी, विचारवंतांनी आणि विद्वानांनी टिपलेली समाजचित्रे त्या काळाची, तत्त्वकालीन परिस्थितीची चित्रे आहेत. म्हणून वेदकालीन चिंतन, कुरुक्षेत्रावरील चिंतन, बोधिवृक्षाखालील चिंतन, गॅलिलीच्या आसमंतातील आणि हिरा डोंगरावरील चिंतन आजच्या चिंतनाला बंधनकारक ठरता कामा नये. नीरक्षीर न्यायानेच त्याचा स्वीकार करावयास हवा... आपापल्या मतीप्रमाणे कोणत्याही धर्मविचाराचा अथवा दर्शनाचा स्वीकार अथवा त्याग करण्याची मोकळीक जर व्यक्तिमात्राला राहिली, तर ती सर्वात उत्तम गोष्ट होईल. "लेखाच्या शेवटी नानासाहेब गोरे यांनी लिहिले आहे.

"माझ्या जीवनात मी भावनांपेक्षा विचारांना आणि विचारांहून कृतीला अधिक महत्त्व देत आलो आहे. म्हणून रामदासाहून शिवाजी थोर, रानड्यांपेक्षा फुले थोर, बर्ट्राण्ड रसेलपेक्षा श्वाइट्झर थोर, जे कृष्णमूर्तीपेक्षा मदर तेरेसा थोर आणि अस्पृश्यता निवारणासाठी स्पृशाची मने वळवू पाहणाऱ्या गांधीजीपेक्षा अस्पृश्यांनाच बंडासाठी उभे करणारे आंबेडकर मला थोर वाटतात. विचार, उच्चार आणि आचार यांची जेथे मिठी पडलेली दिसेल तेथे मी नतमस्तक होतो. 'तिमिरातून तेजाकडे' जाण्याचा तो एकच मार्ग आहे अशी माझी धारणा बनली आहे."

नानासाहेब गोरे यांच्या जीवनात आणि साहित्यात विचारांना प्राधान्य होते. त्यांच्या जीवनाला रसिकतेची किनार होती. स्वातंत्र्यसंग्राम आणि समाजवादी चळवळ यांमधून त्यांचे जीवन तावून सुलाखून निघाले. यशाने ते कधी मातले नाहीत, अपयशाने कधी खचले नाही. अखेरपर्यंत पराधीन झाले नाहीत. १ मे १९९३ला पहाटे शांतपणे त्यांची प्राणज्योत निमाली.

**प्रा. ग. प्र. प्रधान**

ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक, “समाजवादी” विचारवंत आणि सिद्धहस्त लेखक म्हणून प्रा. ग. प्र. प्रधान हे महाराष्ट्राला सुपरिचित आहेत. “स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत”, तसेच १९४० ते १९८० या कालखंडातील भारतीय राजकारणातील वेगवेगळ्या विचारधारांनी भारलेल्या सात निष्ठावान कार्यकर्त्यांच्या जीवनाचे चित्रण करणारी “साता उत्तरांची कहाणी” ही कादंबरी ही त्यांची विशेष गाजलेली पुस्तके. लोकमान्य टिळक, म. गांधी, जयप्रकाश नारायण, साने गुरुजी यांच्या जीवनाचा आणि कार्याचा परिचय करून देणारी पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. “साधना”, “नवभारत” आणि अन्य वृत्तपत्रांतून त्यांनी विपुल स्फुट लेखन केले आहे.

ना. ग. ऊर्फ नानासाहेब गोरे या थोर समाजवादी नेत्यांच्या सहवासात ग. प्र. प्रधान हे त्यांच्या विद्यार्थी दशेपासूनच आले. स्वातंत्र्य चळवळीत आणि समाजवादी चळवळीत नानासाहेब गोरे यांचे शिष्य व सहकारी म्हणून त्यांनी कार्य केले. नानासाहेब गोरे यांचे व्यक्तिमत्व, राजकीय व सामाजिक कार्य आणि पुरोगामी विचार, यांच्यावर प्रकाश टाकणारे हे वैशिष्ट्यपूर्ण पुस्तक. नानासाहेब गोरे यांचे राजकीय आणि सामाजिक कर्तृत्व, त्यांचे वैचारिक लेखन आणि ललित साहित्य यांचे सखोल विवेचन करताना प्रधानांनी तत्कालीन राजकीय व सामाजिक जीवनाचे वस्तुनिष्ठ चित्रही या पुस्तकात रेखाटले आहे.